# उत्तर लिखाण –

1) ↳ quates / key concept / – राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय व्यक्ती

2) ↳ Religious refferences – धार्मिक संदर्भ

3) ↳ Argument with example – युक्तीवाद सोबत उदाहरणे

4) ↳ उत्तराची सुरुवात – मुल्याच्या व्याख्येने करावी, quate ने करावी.

5) ↳ कायदे – भ्रष्टाचार, महिला – वित्तीय हानी, महिला, पर्यावरण

↳ आंतरराष्ट्रीय करार, दहशतवाद, आंतरराष्ट्रीय कायदे

6) ↳ प्रस्तावने नंतर उदाहरण टाळणे

7) ↳ प्रश्नात quate असेल तर उत्तराची सुरुवात quate ने करू नये.

8) ↳ महत्त्वाच्या व्यक्तीचे पाठ होणारे quate ★

9) ↳ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे नवोपक्रम

10) प्रत्येक प्रश्नात शीर्षक आणि उपशीर्षक असावेत

11) चालू घडामोडीतील आंतरराष्ट्रीय उदाहरणे

12) Aditional short formate

13) भारत / राज्य सरकारच्या नविन योजना

14) संविधानांच्या कलमांचे उल्लंघन

उदाहरणा स्वतंत्र

गुरु ठाकूर
↳ माणसाने माणसांशी माणसासम वागणे

↳ ARC –
↳ SDG

# केस स्टडी

↳ विकल्या तो भाग्यवंत

↳ SDG –

15) मुल्यानुसार / टॉपिक नुसार त्याचे समाजासाठी / सार्वजनिक आयुष्यातील फायदे / तोटे

16) समस्या → उपाययोजना

17) वैयक्तिक आयुष्यातील उदाहरणे.

18) भिन्न प्रकारचे data facts + निर्देशांक

19) Ideology - नीतिशास्त्र thinker

20) भारतीय सांस्कृतिक & विचारधारा

# Key terms - मुख्य संज्ञा

उदा - 4 'न' चे धोरण

नैतिक, न्यायिक, नाविण्य, निरंतर

# केस स्टडी

1) उपरोक्त केस स्टडी मधून प्रस्तावनेमध्ये थोडक्यात मांडा व मुल्यांना अधोरेखित करा.

2) उपरोक्त केस स्टडी मधून निर्माण होणारी नैतिक दुविधांची यादी.
↳ भावना

3) उपलब्ध पर्यायांची यादी -

4) पर्याय < फायदे - सकारात्मक (+ve) / तोटे - नकारात्मक (-ve)

~~प्रत्येक~~ 4

5) मांडलेल्या पर्यायांपैकी संतुलित / योग्य पर्यायाची निवड करणे व तो पर्याय पटवुन देणे

- Position -

6) स्वतःची case study मधील भुमिका (Position) ओळखणे.

7) विचारल्यास भागधारकांची नावे / भुमिका लिहणे.

8) तुमच्या क्रियेमधील आणि भुमिकेचे टप्पे (Step of Action)

~~9) अतिशय महत्त्वाच्या दीर्घकालीन स~~

9) अतिशय महत्त्वाच्या समस्येसाठी दीर्घकालीन उपाय सुचवणे (जमल्यास)

- सुचना - पर्याय लिहिल्यानंतर त्वरीत फायदे - तोटे लिहणे

10) case study मध्ये जो प्रमुख मुद्दा मांडलाय त्याच्या परिणामांची (consiquences) यादी करणे.

↳ निर्माण होणाऱ्या समस्यांची यादी

11) • उपाय व उदाहरणे देणे (वाळू माफिया - दुर्गाशक्ती नागपाल)

12) मुल्यांसोबत वाक्प्रचार / सुविचार / म्हणी / कविता / quote / चारोळी / संस्कृत श्लोक या स्वरूपात प्रस्तावना मांडणे.

13) केस स्टडी मध्ये केस ~~२३~~ स्टडी देणे ← उपायात्मक

14) Conclusion मध्ये 2-3 key words वापरणे

- मानसिक गुलामगिरीचे उच्चाटन

# प्रश्नांचे Pattern - (प्रकार)

1) quote based

↳

2) Plain questions

↳

3) quote + Plain questions

↳

4) Leading questions

5) Meaning / understanding based

↳ या प्रश्नात अर्थपूर्ण मांडणी आवश्यक ~~असते~~ जास्त मुद्दे लिहणे आवश्यक नाही.

6) Moral Teaching - महत्वाच्या व्यक्ती

↳ भक्ती चळवळीतील व धर्माच्या मुख्य मूल्यांची यादी व समकालीन उपयोगिता

7) closed terms / concepts

↳ स्पष्ट स्वरूपात भेद करणे आवश्यक

↳ आकलन आधारित लिखाण

8) Short Notes

# Case study – Types

1) आपत्ती व्यवस्थापन आणि तुमचे कर्तव्य / अधिकारक्षेत्र व व्यवस्थापन
2) वन, जैवविविधता व संवर्धन, आर्थिक हित आणि त्यांच्यातील द्वंद्व / दुविधा
3) धोरण निर्मितीमधील तुमची भुमिका & त्यामध्ये निर्माण होणारे अडथळे
4) व संस्थेच्या पदावर असताना निर्णय घेताना निर्माण होणारा दबाव द्वंद्व जे संघटनेचे हीत किंवा सामाजिक हित यांच्याबाबत असेल.
5) मनरेगा कर्मचारी / मजूर वर्गाच्या मुलभूत / मानवी हक्कांच्या संबंधीत.
6) राष्ट्रीय सुरक्षेच्या संबंधित मुद्दे. उदा सीमा सुरक्षा, दहशतवाद, सायबर सुरक्षा
7) समकालीन मुद्दे. drugs trials (लसीची चाचणी)
8) नक्षलवाद व शहरी नक्षलवाद – चळवळी या संबंधीत
9) व्यावसायिक नितीमत्ता व त्यासंबंधीत मुद्दे
10) नितीशास्त्रामधील मुलभूत मुल्यांना अधोरेखित करणारे प्रश्न
11) राजकीय व्यवस्था व प्रशासकीय व्यवस्था यातील संघर्ष
12) कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारे लैंगिक अत्याचार / हिंसाचार

जातीव्यवस्थेचे निर्मूलन करायचे असेल तर धर्माचे उच्चाटन केले पाहिजे. Dr B R. Ambedkar

PRAYAAS

| 7) Topic<br>- Sub topic | Demand<br>(मागणी) | changing |
|---|---|---|
| 1) Social media | challenges & issues | contemporary<br>(समकालीन) |
| 2) constitutional morality | Ⓐ significance of<br>• constitutional<br>i) Good governance<br>ii) Accountability | Mixing of topic |
| 3) International ethics | war & issues | dynamic topic<br>गतिमान |

# नितीशास्त्र म्हणजे काय नाही ?

1) हिंसा 2) अयोग्य 3) कायदे (धर्माचे कायदे) 4) धर्म . (सती प्रथा) 5) संघटना

6) मुल्ये 7) नितीमुल्ये (Morality)
- ↳ प्रत्येक समाजाने काय योग्य & अयोग्य हे ठरवलेले असते
- ↳ हि सापेक्ष आहेत. - ती बदलत असतात.
- ↳ व्यक्ती, समाज परत्वे बदलते.

8) तुम्हाला काय वाटत - व्यक्तीपरत्वे बदलते., स्वमत

9) समाजाला जे मान्य आहे ते / सामाजिक स्वीकाहार्यता
- ↳ उदा - नरबळी

- Moral Councionsness / नितिमत्तात्मक जागृक
  - ↳ भान असणे, समजणे
- ↳ सामाजमान्य मुल्यानुसार असणारी जाणीव व त्यानुरूप होणारी वर्तने
- Moral Instutionalism (नितीमुल्यात्मक अंतर्गत भावना)
- ↳ एखाद्या गोष्टीबाबत तुम्ही बांधत असलेला अंदाज → हे योग्य की अयोग्य.

# नितीशास्त्र

ethanutia - इच्छा मरण

१) नितीशास्त्र आपल्या निर्णयांचे तर्कसंगत औचित्य तपासते. कोणते कार्य नैतिकदृष्ट्या योग्य किंवा अयोग्य, न्याय किंवा अन्याय याचा अभ्यास करते किंवा यामध्ये मार्गदर्शक करते.

२) मानवी कृतीचा तीच्या योग्यतेच्या किंवा अयोग्यतेच्या दृष्टिकोनातून अभ्यास करणे आणि सामान्यत: अधिकार, कर्तव्य & निष्पक्षता इत्यादी बाबतीत मानवाने काय केले पाहिजेत याचे विज्ञान म्हणजे नितीशास्त्र

# नितीशास्त्र / नैतिकतेचे दोन प्रकार

**सापेक्ष नितीशास्त्र**

1) clearity नसलेल्या गोष्टी

2) समलैंगिक विवाह
- कायदेशीर मान्यता नाही
- गुन्हा म्हणून अमान्य

**निरपेक्ष नितीशास्त्र**

1) चुक म्हणजे चुक

उदा - हिरोशिमा व नागासिका दुर्घटना
- ठाम मत

# नितीशास्त्र आणि मानवी आंतरक्रिया (Human Interface)

1) स्वत:ची (स्वत: सोबत) आंतरक्रिया
- स्वत: / व्यक्तीच्या स्तरावर

2) सामाजिक आंतरक्रिया (social Interaction) - धर्म, शिक्षण, जाती

3) संस्था (organisation) - (संघटनात्मक मुल्य) - उदा कि:
- उदा - व्हिसलब्लोअर

4) Government & Administration - शासन & प्रशासन
- कार्यालयीन संस्कृती.

5) Global level (जागतिक स्तरावर)
- उदा - संघटना, करार

6) उदयास येणारे (emerging)
↳ उदा -- हवामान बदल, जागतिक दहशतवाद, सायबर गुन्हे, सामाजिक माध्यमे.

| Ethics (नितीशास्त्र) | Laws (कायदे) | Morality (नितीमत्ता) |
|---|---|---|
| अर्थ 1) ↳ तर्कआधारित, विवेक-आधारित, योग्य-अयोग्य | ↳ कोणत्याही देशाद्वारे, संस्थेद्वारे बनवलेल्या नियमांची यादी | ↳ समाजापरत्वे / नुरूप योग्य - अयोग्य यादी<br>↳ समाज सापेक्ष |
| 2) # Sources / स्त्रोत<br>↳ तर्क<br>↳ तत्वज्ञान | 2) संस्था<br>• ~~कुटुंब~~<br>• संविधान<br>• न्यायालयातून निर्माण होणारे कायदे | 2) स्त्रोत<br>• समाज<br>• संस्कृती<br>• धर्म<br>• कुटुंब |
| 3) अंमलबजावणी<br>↳ स्वत:<br>↳ आंतरीक बंधने | 3) अंमलबजावणी<br>↳ प्रशासकीय यंत्रणा<br>उदा - IPC. | 3) अंमलबजावणी<br>↳ सामाजिक संस्था<br>उदा - जातीव्यवस्था, कुटुंब, धर्म, शिक्षण, संस्कृती |
| 4) परिणाम<br>↳ पश्चाताप | 4) परिणाम<br>↳ शिक्षा - दंड स्वरूपात | 4) परिणाम<br>↳ बहिष्कार<br>↳ वाळीत टाकणे<br>उदा. संत ज्ञानेश्वर महाराजांचे कुटुंब |



# नितीशास्त्राची गरज

नितीमुल्य → नितीशास्त्र

↳ वैश्विक स्वरूपात अवलंबता येणारी गोष्ट

1) व्यक्तीला मार्गदर्शक तत्त्वांची यादी देणारा - योग्य - अयोग्य, न्याय - अन्याय

2) सामाजिक समतोल राखण्यासाठी

उदा. · गांधीजींचे अहिंसा तत्त्व

3) मानवी प्रतिष्ठेची (Human dignity) जाणीव करून देते.

उदा. गोपनियतेचा अधिकार - पुट्टास्वामी खटला

4) मुल्यात्मक स्पर्धात्मकता / द्वंद्व सोडवण्याकरता नितीशास्त्र मदत करते

उदा. · पुट्टास्वामी खटला < राष्ट्रीय सुरक्षा / वैयक्तिक गोपनियता

5) चारित्र्यामध्ये सकारात्मक बदल

↳ विशेषणांची उपमा

महात्मा जोतीराव फुले

6) अधिकार क्षेत्राच्या पलीकडे जावून कार्य करणे

(call beyond your duty)

H.W. - What do you mean by ethics. & give importan[ce] of ethics in human life - 10 M

# नितीशास्त्राची निर्धारके Determinent - एखाद्या घटनेवर प्रभाव टाकणारे कारणकारक घटक

## 1) वैयक्तिक निर्धारिके
↳ i) वैयक्तिक मुल्य
  उदा - गांधीजींचे अहींसा तत्व

ii) चारित्र्य /वर्तवणूक
  ↳ Roll models - कष्ट & मेहनत

iii) विवेक

उदा - गांधीजींची "आतला आवाज" ही संकल्पना
- T.N. शेशन यांचे निवडणूक आयोगातील कार्य

iv) Moral ~~res~~ reasoning (नितीमुल्यात्मक तार्किकता)

उदा - राजेंद्र भारूड यांचे कोविड काळातील ऑक्सिजन प्लांट उभारणी /निर्मितीचे कार्य.

## 2) सामाजिक निर्धारिके

↳ i) कुटूंबसंस्था - उदा - आई-वडिलांद्वारे सांगितल्या जाणाऱ्या कथा & बोध

ii) संस्कृती - उदा - अतिथी देव भव

iii) सहकारी गट (Pair group) - मानवी मुल्यांची जपनूक
  ↳ परस्पर सहकार्य, समन्वय, औदार्य (उदारता), प्रेम भावना., करूणा
  (निस्वार्थपणे इतरांना मदत करणे)

iv) धार्मिक संस्था - उदा - अष्टांगमार्ग

PRAYAAS

3) संस्था

↳ i) सहकारी संसा - "एकमेका सहाय्य करू, अवघे होऊ सुपंथ"

ii) कायदेशीर संस्था - नितीमुल्यांची / कायद्याची संहिता, कार्यालयीन संस्कृती, नेतृत्व प्रदान करते.

4) परिस्थिती नुरूप

↳ i) आपत्ती व्यवस्थापन

ii) ICU मध्ये बेड ची आवश्यकता - कोविड नंतर

ii) सायबर गुन्हे - सायबर सुरक्षा

ii) Data Privacy - Technology development नंतर

# मानवी वर्तनामध्ये नितीशास्त्राचा परिणाम अवलंब -

1) व्यक्तीच्या आधारावर

→ समाधानाची भावना - मानसिक स्तरावर

→ वैयक्तिक चारित्र्य चांगले असते - चारित्र्यवान व्यक्ती
  ↳ उदा. राम

→ व्यावसायिक उन्नती / प्रगती - उदा. टाटा

→ विश्वास (जास्त असतो)

2) संघटनात्मक स्तरावर → कार्यसंस्कृती सुधारते
  (उदा. सर्वाधिक भ्रष्टाचार - ट्रॅफिक पोलिस यंत्रणा)

→ जनतेसमोरील प्रतिमा / विश्वास  उदा. टाटा, अझीम प्रेमजी

→ नैतिकता नसेल तर → सामाजिक दिवाळखोरी
  ↳ उदा. - सहारा कंपनी, जिल्हा मध्यवर्ती बँक, सहकारी साखर कारखाने, सत्यम कंप्यूटर्स, ट्रॅफिक पोलिस

## 3) सामाजिक स्तरावर

→ i) सौदार्य, सहकार्य, परस्पर संबंध जपले जातील
↳ विविध धर्मांचे लोक सह-अस्तित्वात राहतात, पाणी फाऊंडेशन, भूदान चळवळ - विनोबा भावे

ii) नितिशास्त्र नाही
↳ विकास होणारी नाही
↳ सामाजिक भेद आणि संघर्ष. उदा. - मणिपूर - समानतेचे मुल्य / मानवतेचा ऱ्हास

- बिहार - जातीय जनगणना
  ↳ नैतिक राजकीय संस्कृतीचा ऱ्हास.

iii) राजकीय व्यवस्थेवरील लोकांचा विश्वास → समाजातील नैतिकता
उदा. - थेट लाभ हस्तांतर (DBT), RTI, ITR - faceless assesment system

## 4) राष्ट्रीय स्तरावर व आंतरराष्ट्रीय स्तरावर

→ i) देशाअंतर्गत सहकार्यात वाढ - उदा. युद्ध विराम
↳ आंतरराष्ट्रीय मानवतावादी किंवा नैतिक मुल्यांना आधार देण्याऱ्या संघटनेत वाढ - उदा. WHO, ILO (*International Labour organization)
→ ↳ शाश्वत विकास - पॅरिस अॅग्रीमेंट, equal but differentiated responsbility
→ ii) आपल्या राष्ट्राची प्रतिमा किंवा soft power
उदा. "वॅक्सीन मैत्री", G-20 - वसुधैव कुटुंबकम
↳ iii) International Sanctions / प्रतिबंध
उदा. - उत्तर कोरियाचे अमानवी शस्त्रास्त्र धोरण किंवा अमानवीय वृत्ती

PRAYAAS

# नितीशास्त्राचे आयाम / प्रकार
(Dimensions of Ethics)

1) वर्णनात्मक नितीशास्त्र -
(Descriptive Ethics)

↳ काय घडत आहे ? या प्रश्नावर आधारित
↳ सामाजिक मुल्य काय आहेत
↳ फक्त Describe करेल
↳ उदा - गर्भपाल - प्रत्येक धर्मात हे काय आहे ते सांगते.
↳ स्वरूपाचे वर्णन, नोंदणी करते.

i) अनुभवजन्य अध्ययन -
↳ माहिती गोळा करणे, सर्वेक्षण करणे -मतांची यादी.

ii) मुल्य तटस्थ दृष्टिकोन
↳ योग्य - अयोग्य स्वरूपात मांडणी न करता मुल्य तटस्थ दृष्टिकोनातून स्वरूपात मांडणी

उदा

iii) सांस्कृतिक सापेक्षितावाद -
↳ भिन्न संस्कृतिचे विशिष्ट मुल्यांवर मत घेतले जाते.

iv) ऐतिहासिक संवेदनशीलता नोदवणे.
उदा - जातीव्यवस्था, गुलामगिरी प्रथा.

v) सामाजिक स्थितीची नोंद
उदा मनुस्मृती

vi) सामाजिक वास्तवाची गतिशिलता दाखवणे / तपासणे
उदा - समलैंगिक विवाह




↳ सामाजिक मुल्यांचा ऱ्हास

2) आदर्शवादी नितीशास्त्र
(Normatic Ethics)

↳ "समाजात वर्तणुक कशी असायला हवी"




↳ मार्गदर्शक
↳ नितीमुल्यांची निर्मिती
↳ योग्य - अयोग्य
↳ आदर्श वर्तणुक - ग्राम पातळीवर - आदर्श

A) Deontologist
कर्तव्यवादी नितीशास्त्र
↳ एखाद्या गोष्टीचा परिणाम काय होणार हे महत्वाचे नसते.
↳ हेतू केंद्रस्थानी
↳ इमॅन्युअल कान्ट
(Categorative Imperative)
↳ कर्तव्याच्या आधारावर कार्य - डॉ. दुश्मनावर केलेले उपचार.

* हेतू → वैश्विक मुल्यांसाठी केलेले कर्तव्य
उदा - चौरीचौरा हत्याकांड - गांधीजी
- चे अहिंसा तत्व
↳ चळवळ बंद.

B) **परिणामवादी** (consequensialists)

↳ हेतूपेक्षा परिणामाला महत्व देतात

↳ उदा. मुलींच्या विवाहाचे वय "18"

↳ विवाह योग्य वयात तसेच शिक्षण व सक्षमीकरणाला चालना

"हरित क्रांती" - उत्पादन वाढवणे पण सोबतच राहणीमानाचा दर्जा सुधारला

i) Utilitarianism (उपयुक्ततावाद)

1) ↳ "अधिकतम लोकांचे अधिकतम सुख" – जेरेमी बेंथम

↳ थोड्यांचे नुकसान चालते पण अधिक लोकांचे कल्याण झाले पाहिजे

उदा. - टाळेबंदी (2020)

* - इंटरनेट बंदी < एकट्याचा अधिकार / सामाजिक संरक्षण

↳ अधिक हित

2) J. S. Mill

| सकारात्मक | नकारात्मक |
|---|---|
| ↳ मानसिक सुख | ↳ शारिरीक सुख |
| ↳ उच्च | ↳ कनिष्ठ |

**टिका**

1) वैयक्तिक अधिकारांचे हनन / अधोरेखित केले जात नाही.

उदा. इंटरनेट बंदी व इंटरनेटचा अधिकार.

2) अल्पसंख्यांक लोकांचे हित दुर्लक्षित होते.

उदा. - बाबरी मस्जीद खटला.

3) नैतिक कृत्यांचा / कर्तव्यांचा त्याग

उदा. - single use plastic

C) virtue Ethic (सद्गुणाधिष्ठित नितिशास्त्र.)

i) ↳ सदर क्रिया / कृत्य कोणती व्यक्ती करते यावर आधारित

उदा. - गांधीजी - वेगवेगळ्या चळवळी, उपोषण

- छ. शिवाजी महाराज - गनिमी कावा

ii) ॲरिस्टॉटल - Golden Mean सुवर्णमध्य

उदा. - Non Allignment movement (निर्दल चळवळ)

- पुणे करार (राखीव मतदार संघाऐवजी आरक्षित मतदार संघ)

iii) व्यक्ती स्वतः समाजासाठी एक उदाहरण ठरतो

उदा. - महात्मा जोतिबा फुले

- बाबा आमटे.

iv) ज्या वेळेस एखाद्या विषया - बाबत कोणतेही मुल्य / मत नसते त्या वेळी एक व्यक्ती मुल्यांची व मतांची ओळख / जाणीव करुन देणे

M.P. उदा. - कैलास सत्यार्थी - नोबेल Price winner
बालमजुरी - (save the childhood movement)

अधिभौतिक नैतिकशास्त्र (Meta)

↳ origin - एखाद्या गोष्टीचे मुळ / उत्पत्ती कुठे झाली, कशा स्वरूपात झाली हे शोधते.

↳ का?

↳ उपायात्मक

[उदा] - राजाराम मोहन रॉय - सती प्रथा ↳

i) नैतिक वस्तुनिष्ठता / वास्तववाद

[उदा] - सत्यमेव जयते.

ii) नैतिक सापेक्षतावाद.

[उदा] - समलैंगिक संबंध - धर्मानुसार बदल.

iii) भावनिक / अधिनैतिकता -

↳ भावनेनुसार बदलते.

iv) मार्गदर्शक अधिनितीशास्त्र

प्रश्न - Consequences of Ethics in Human Action - 4/2014

असेल तर & नसेल तर

* Deontological (कर्तव्यवादी)

Means (साधन) ← → Goals (साध्य)

| आधार | वर्णनात्मक | आदर्शवादी | अधिभौतिक |
|---|---|---|---|
| केंद्रबिंदू | काय घडत आहे | काय करायला हव | मुल्यांची उत्पत्ती कशी झाली |
| स्वरूप | अनुभवजन्य माहितीचे संकलन | मार्गदर्शक तत्वांची यादी प्रदान करते | मुलभुत मुल्यांचे मुल्यांकन |
| दृष्टिकोन | केवळ क्रियांची तुलना न करता वर्णन करणे | मुल्यात्मक नियमांची कर्तव्यांची दिशा ठरवली जाते. | मुल्यांचे विश्लेषण केले जाते - नैतिक मुल्य हे वस्तुनिष्ठ आहे की व्यक्ती सापेक्ष याचे वर्णन व संस्कृतिच्या |
| न्यायिक तपासणी | नाही | आदर्शमुल्यांच्या आधारावर तपासली | मुल्यांच्या आधारावर माहित नाही ते तपासत उत्पत्तीच्या आधारावर तपासली जाते. |

# परिणामवादी

1) उपयुक्तावाद < जेरमी, मिल

2) राज्यआधार परिणामवाद (Mohist)

↳ ज्या कोणत्याही कृत्याचा परिणाम राज्यासाठी सकारात्मक होईल ते योग्य असते.

उदा - रशिया - युक्रेन युद्धादरम्यान भारताद्वारे ऊर्जा सुरक्षिततेच्या कारणावरून केली जाणारी तेल खरेदी.

- कौटिल्य

3) व्यक्तीवादी नितीशास्त्र (Ethical Egoism)

↳ जो व्यक्ती कार्य करतोय, त्याच्या साठी सकारात्मक परिणाम होत असेल तर & दुसऱ्यासाठी नकारात्मक परिणाम झाला तरी चालेल.

↳ व्यक्तीगत हितासाठी केली जाणारी कार्य.

↳ स्वकल्याणामध्ये वृद्धी ज्या क्रियांमधून घडते अशा क्रियांचा समावेश

उदा - व्हिसलब्लोअर - मनाला होणारे मानसिक समाधान

- एखाद्या गुन्ह्यांमध्ये माफीचा साक्षीदार होणारा साक्षीदार

- पर्यावरण संवर्धन.

4) परोपकारी नितीशास्त्र (Altruistic)

↳ जो व्यक्ती क्रिया करतो त्याला त्याचा लाभ न होता ज्याला मदत करतो त्याला लाभ होतो.

उदा - नोबेल जनक - अल्फ्रेड नोबेल (डायनामाईट शोध)

- पाकिस्तान - बांग्लादेश फाळणी

- वॅक्सीन मैत्री

- दुष्काळामध्ये तुकाराम महाराजां-कडून सावकारीचा त्याग.

~~5) व्यवहारीक~~

5) व्यवहारवादी नितीशास्त्र

↳ सारासार विचार करून केलेले कार्य - अनुभवातून परिणाम ओळखणे / माहिती मिळते

↳ परिस्थिती सोबत जुळवून घेता येते.

↳ परिस्थितीनुरूप -

उदा - प्रदुषण नियंत्रणासाठी दिल्लीतील सम - विषम गाडी नं. प्लेट पद्धत.

2) लसीकरण प्रक्रिया

3) कोविड - 19 - लॉकडाऊन

4) # उपयोजित नितीशास्त्र (Applied Ethics)

↳ वास्तविक जीवनामध्ये नैतिक मुल्यांचे किंवा मार्गदर्शक तत्वांचे अवलंब करणे. याच्या अंतर्गत वर्णनात्मक नितीशास्त्र, आदर्शवादी नितिशास्त्र, अधिनितिशास्त्र यातील

संकल्पना वास्तव रुपात उपयोजित केल्या जातात.

## 1) जैवनितीशास्त्र -

-> जैवनितीशास्त्र ही उपयोजित नितीशास्त्राची अशी शाखा आहे जी विज्ञान, वैद्यकीयशास्त्र, आरोग्य, जैवतंत्रज्ञान & मानवी जीवन यामध्ये आंतरक्रिया घडवून आणते.

**जैवनितीशास्त्र**

1) व्यक्तीची आरोग्य स्वायत्तता केंद्रस्थानी ठेवणे.
[उदा] - Covid-19 लसीकरण

2) हितकारिकता
↳ रूग्णांचे आरोग्य हित महत्त्वाचे
[उदा] - सरोगसी कायदा - स्त्रीभ्रूण हत्या
Food fortification

3) अहिंसा - हिंसाचार रोखणे

4) न्याय -
जैवनितीशास्त्रातून प्राप्त होणाऱ्या मोबदल्याचे न्यायिक वितरण
[उदा] - बौद्धिक संपदा अधिकार (IPR)

कॉर्पोरेट नितीशास्त्र
↑
व्यावसायिक नितीशास्त्र




# जैवनितीशास्त्र कोठे अवलंब केले जाते.

#1) गर्भपाताचा हक्क (Abortion)

i) ↳ जीवीताचा हक्क (अर्भक) - Art 21

ii) ↳ मातेचा लैंगिक / प्रजोत्पादनाचा हक्क
↳ कौटुंबिक दबाव
↳ पितृसत्ताक व्यवस्था - मुलगा आपत्य अट्टहास

iii) ↳ लैंगिक अत्याचारातून मुक्तता

iv) ↳ बालकाच्या आरोग्यानुसार घेतला जाणारा निर्णय - व्यवहारवादी

v) ↳ बालक किंवा मातेच्या आरोग्यास धोका असल्यास - व्यवहारवादी

Indian Medical termination ~~Act~~ ~~30~~ of Pregancy Act.

#2) इच्छामरण (Ethanutia)

↳ i) प्रतिष्ठीत मरण / सन्मानजनक मृत्यू

→ 1) सक्रीय इच्छामरण (Active)
↳ विष किंवा औषध देवून मरण

→ 2) असक्रिय इच्छामरण (Passive)
↳ चालू वैद्यकीय उपचार थांबवणे
भारतात - अरुणा शानबाग

↳ ii) अवयवदान / अवयवतस्करी

↳ iii) संपत्तीवाद / आर्थिकवाद यामध्ये होते.

# सक्रिय इच्छामरणाला परवानगी देणे देण्याचे +ve व -ve परिणाम.

**+ve** (सकारात्मक)

1) रुग्णालय / दवाखाने यामध्ये बेड चे प्रमाण स्थिर.

2) औषध / आरोग्य उपचाराचा आर्थिक भार कमी होतो.

3) अवयव दान

**-ve** (नकारात्मक)

1) सामाजिक मुल्यव्यवस्थेचा ऱ्हास
[उदा] - गुन्हेगारीत वाढ

2) धार्मिक संबंध -
[उदा] - जीवंत समाधी, सालेखना (जैन धर्म)

3) सामाजिक असंतुलन - मनोरुग्णांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढेल.

4) आत्महत्येची साखळी तयार होईल

# 3) (organ Transplantation) - अवयव प्रत्यारोपण

**+ve** (सकारात्मक)

1) पिडीतांचे आरोग्य वाढेल

2) ज्याच्याकडून अवयव घेतोय त्याची परवानगी (सद्गुणाधिष्ठीत)

3) परवानगीशिवाय अवयव घेतले
↳ परिणामवादी < उपयुक्ततावादी, व्यवहारवादी

**-ve** (नकारात्मक)

1) परवानगीशिवाय केलेली क्रिया
↳ कर्तव्यवादी नितीशास्त्राच्या विरोधात

2) मानवी अवयवांची तस्करी
↳ सक्तीने

3) सक्तीने अवयव दान करुन भिक मागण्यास प्रवृत्त करणे (Art 23 चे उल्लंघन)

- कायदा - Transplantation of Human organs & Tissue Act 1994

PRAYAAS

## 4) Genetic Engineering -

↳ मानवी हस्तक्षेपांद्वारे जनुकीय संरचनेमधील सकारात्मक अथवा नकारात्मक बदल

**+ve** (सकारात्मक)

1) जैविक / जनुकिय स्तरावर केलेली सुधारणा - उत्पादनात वाढ

उदा. BT Cotton - कर्तव्यवादी नितीशास्त्र

~~Gene Baby / D~~

2) जनुकिय दुर्मिळ आजारावर उपचार (सद्गुणाधिष्ठीत)

3) आर्थिक फायदा

∟ चीन Genetic plants

**-ve** (नकारात्मक)

1) Gene Baby / Designer Baby

2) जैवविविधतेला धोका - आक्रमक प्रजाती

3) नविन Invasive species (आक्रमक) तयार होतील

4) बायो वेपन / जैविक शस्त्र म्हणून याचा वापर

## 5) आरोग्य क्षेत्रामध्ये कृत्रिम प्रज्ञेचा वापर -

**+ve**

1) गांधीजींच्या अंत्योदय (समाजातील सर्वात गरीब व्यक्तीचे कल्याण) मुल्यांचा अवलंब करून दुर्गम भागात उपचार पुरवठा.

2) काही भविष्यकालीन आजारांचे निदान

**-ve**

1) 'Data security' धोक्यात येईल

↳ व्यक्तीची आरोग्य माहिती गोपनियतेच्या भंग

उदा - आयुष्यमान कार्ड.

2) मानवी संवेदनशीलतेचा अभाव

3) तांत्रिक त्रुटी - जीविताचा हक्क हेरावून घेवू शकतात

4) आरोग्य सेवकांच्या रोजगार जाणे

5) जीवितहानी होईल - चुकीच्या औषधाचा वैद्यकीय पुरवठा

6) खाजगी क्षेत्राचा

## 6) सरोगसी

1) मातेची स्वायत्तता -

2) आपत्याच्या जिवीताच्या हक्क

3) कर्तव्यवादी नितीशास्त्रानुसार सरोगसी कर्तव्याच्या भुमिकेतून झाली असेल तर ती नैतिक मानली जाते याउलट ती उपभोक्तावादी किंवा परिणामवादी स्वरूपाच्या आर्थिक रूपात झाली असेल तर ती नकारात्मक मानली जाते.

4) जनुकीय पालकांचे वारसा हक्क नियमन

5) सरोगेट आईच्या हक्कांचे संरक्षण - जैविक हक्क

i) भारतामध्ये Sarogacy Regulation Act 2022 के दुवारे व्यावसायिक सरोगसीवर बंदी आणली आहे.

6) महिलांचे वस्तुनिकीकरण झालेले दिसते.

## ★ 7) Public Health Emergencies - सार्वजनिक आरोग्याची आपत्ती

1) सार्वजनिक स्तरावर आकस्मित स्वरूपात निर्माण झालेली आरोग्याची समस्या जीच्या परिणामी असंख्य नागरिकांच्या जीविताला धोका / जोखीम निर्माण होते.

(जागतिक आरोग्य समस्या.

1) कारणे

i) नैसर्गिक कारणे - हवामान बदल, अतिवृष्टी, रोगराई, भुकंप

ii) मानवनिर्मित - गॅस गळती (भोपाळ दुर्घटना), बायो वेपन्स अस्वच्छता.

# नैतिक मुद्दे

1) सार्वजनिक सुविधांची टंचाई - प्रशासकीय / राजकीय अपयश

2) दुजाभाव / असमानता -- (श्रीमंत - गरीब दरी) - न्यायिक वितरण न होणे
↳ कर्तव्यवादी नितीशास्त्रापेक्षा आर्थिक हिताचा अवलंब
[उदा] - कोविड-19 - रेमडीसिव्हीर

3) आर्थिक घोटाळ्यांमध्ये वाढ - संसाधनांचा गैरवापर

4) वैद्यकीय नितीशास्त्राचा अवलंब न करणे.
↳ वैद्यकीय उपकरणांची / साधनांची कमतरता
[उदा] - ऑक्सीजन पुरवठा कमी - covid-19

5) संशोधनाचा अभाव
↳ वॅक्सीनची जलद निर्मिती - परिणामावर भर

6) वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सार्वजनिक स्वास्थ्य यांच्यात द्वंद्व निर्माण होते [उदा] - यंत्रबंदी, लॉकडाऊन

7) सार्वजनिक स्वास्थ्यामध्ये नकारात्मक अतिरेकी राष्ट्रवादाला चालना
[उदा] - अमेरिका फर्स्ट - वॅक्सीन

8) पारंपारिक संरचना

↳ Shadow Pandamic - उपेक्षित घटकांमध्ये आरोग्याची समस्या

# केस स्टडी
↳ नंदुरबार जिल्ह्यांमध्ये IAS राजेंद्र भारूड यांनी यांचे कोविड काळातील ऑक्सिजन प्लांट निर्मितीचे कार्य.

# जैवनितीशास्त्र - जागतिक करार

1) Universal Decleararation on Bio-Ethics & Human Rights
- जैवनितीशास्त्र आणि मानवी अधिकार यांचा जागतिक करार.
  ↳ UNESCO - 2005

2) Helsinki Declaration.
  ↳ World Medical Association (1964)
  ↳ वैद्यकीय संशोधनाशी संबंधीत - Human Body trials

3) Nuremberg Code. (1947) —
  ↳ मानवी शरीरावर आधारित संशोधनाशी संबंधीत.

4) Belmont Report -

## Enviornment Ethics - पर्यावरणीय नितीशास्त्र

↳ "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

↳ "एखादी गोष्ट तेव्हाच योग्य असते, जेव्हा ती जीव समुहाच्या अखंडतेचे, स्थैर्याचे आणि सौंदर्याचे रक्षण करते. याउलट या तत्त्वाच्या विरोधात असणाऱ्या क्रिया अनैतिक ठरतात.
— अल्डो लिओपोल्ड

↳ "There is a no planet B"

# पर्यावरणीय नितीशास्त्राची मुलतत्त्वे -

i) ↳ सद्य पिढीच्या गरजांची पुर्तता करुन भविष्यातील पिढीसाठी पर्यावरण जतन करणे → शाश्वत विकास. [341] -SDGs Goal

ii) Polluter Pay - प्रदुषक नुकसान भरपाईचे ~~तत्~~ तत्व
[341] - कार्बन Credit

iii) सावधगीरीचे धोरण (Precousory Principle)

↳ एखादी क्रिया होण्याआधी काळजी घेणे

iv) ~~Stwe~~ Stewarship (राखणदार, संरक्षणकर्ते, देखरेख करणे)

↳ पर्यावरणीय घटक हे मानवी उपभोगासाठी नसून मनुष्यावर पर्यावरणीय संवर्धनाचे उत्तरदायित्व आहे असे मानणारी संकल्पना

↳ मनुष्य हा पर्यावरणाचा भक्षक नसून रक्षक आहे.

v) प्रकृती - भारतीय संस्कृतीतील प्रकृतीची रचना

↳ जितकी गरज असेल तेवढेच घेणे

↳ नैसर्गिक चक्राशी समतोल

# पर्यावरणीय नितिशास्त्रातील प्रमुख सिद्धांत -

1) मानवी केंद्रीत सिद्धांत - (Antropocentric)

↳ बरोबर, चुक परिस्थितीवर अवलंबून असते.

↳ पर्यावरणीय घटक हे साधन म्हणून कार्यरत असते.

~~पर्यावरण केंद्रीत दृष्टिकोन~~ -

↳ उपभोगाचे साधन मानवी विकास, उदा - वाधवाण बंदर (डहाणू, पालघर), आरे कार शेड

किनाऱ्यावर नसून → ऑफशोर बंदर

समुद्राच्या आत — कृत्रिम बेटावर बांधले जाईल

2) पर्यावरण केंद्रीत दृष्टिकोन -

↳ इथे कोणताही निर्णय पर्यावरणीय संवर्धनातून घेतले जाते.

↳ उदा - Slient vally Movement (चळवळ) -

- नर्मदा बचाव आंदोलन

3) जीवकेंद्रीत दृष्टिकोन (जीवकेंद्रीतता)

↳ भुता परस्पर जडो मैत्र जीवांचे

↳ प्रत्येक जीव महत्वाचा आहे., सर्व जीवांना जगण्याचा अधिकार आहे.

↳ जीवाची सेवा हीच शिवाची सेवा - ~~धर्म~~ - लिंगायत समूह.

PRAYAAS

↳ उदा - नितिशास्त्र नसेल - कस्तुरी मृग तस्करी - जीव हे उपभोगाचे साधन

↳ पेटा संस्था, जलकट्टूवाद, बैलगाडा शर्यत

**केस स्टडी -**

↳ महाराष्ट्रात बैलगाडा शर्यतीवर लावलेल्या निर्बंधामुळे खिल्लार प्रजातीचे संवर्धन - अमोल कोल्हे.

## 4) ईश्वर केंद्रीत (Theocentric)

↳ या अंतर्गत जीवसृष्टीचे दैवीकरण केले जाते आणि जीवसृष्टीचे संवर्धन हे धार्मिक कार्य म्हणून अवलंबले जाते

↳ उदा - देवराई प्रकल्प - सयाजी शिंदे
- बिश्नोई समाज काळवीटाला महत्त्वाचे मानतात.
- टोटनवाद , सरणा जमात - वृक्षांना देव मानते. धाकड समाज
- बैलपोळा - सरणा - जमात

**केस स्टडी**

- इंदापूरतील मधील हरणेश्वर गाव - या गावामध्ये हरणांचे संवर्धन करत असतात.

## 5) Eco Feminism - स्त्री पर्यावरणवाद

↳ महिलांच्या अधिक सहभागामुळे चळवळी प्रसिद्ध

↳ पर्यावरणीय चळवळींमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग आणि पर्यावरणीय संवर्धन

उदा - चिपको चळवळ , ग्रेटा थनबर्ग

PRAYAAS

# भारतीय स्वरूपातील पर्यावरणवाद -

1) संस्कृती व धर्म

↳ पर्यावरणाचे संवर्धन करणारे — अहिंसा,
"भुता परस्पर जडो, मैत्र जीवांचे"
(पर्यावरण व मनुष्य यांच्यात
परस्पर संबंध)

2) कायदा व संविधान -

↳ पर्यावरण संवर्धन कायदा, WPA

↳ Art-21, Art-48, Art-51A

3) न्यायव्यवस्था

↳ न्यायव्यवस्थे द्वारे मिळणारे युक्तीवाद - खटले.

• i) M.C. मेहता विरुद्ध भारतीय संघराज्य

युक्तीवाद -

↳ 1) व्यावसायिक पर्यावरणीय नितीशास्त्र

2) संस्कृती आणि पर्यावरणीय संवर्धन

ii) Indian Council for Enviornment विरुद्ध Union of India and Legal Action

↳ प्रदुषकाद्वारे नुकसान भरपाईचे तत्व (Pollutters Pay Principle)

iii) वेल्लोर सिटीजन वेलफेअर फोरम विरुद्ध भारतीय संघराज्य

↳ शाश्वत विकास हे मुलभूत संवैधानिक तत्व आहे असे मानण्यात आले आहे. — सावधगिरीचे धोरण.

iv) नर्मदा बचाओ आंदोलन विरुद्ध भारतीय संघराज्य, 2000

↳ पर्यावरणीय विस्थापित, आणि पर्यावरणाचे हक्क
पुनर्वसन हक्क

PRAYAAS

२) मोहम्मद सलीम विरुद्ध उत्तराखंड राज्य (2017)
↳ गंगा आणि यमुना या नद्यांना जीविताचा हक्क

4) आंतरराष्ट्रीय - राष्ट्रीय पुढाकार -
↳1) Loss And Damage Fund (COP-28)
2) चित्त्यांचे पुनर्वसन / पुनर्परिचय
3) सतोयामा (Satoyama) - जपानी उपक्रम - पर्यावरण संवर्धन
4) ग्रीन इस्लाम - इंडोनेशिया - पर्यावरणपूरक
5) Industrial Symbiosis - डेन्मार्क
(परस्पर पूरक सहवास)

# पर्यावरणीय समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपाय / मार्ग

1) वृक्ष, जलस्त्रोत, पूर्ण पर्यावरण याला स्वत:मध्ये साध्य मानणे केवळ उपभोगाचे साधन म्हणून न समजणे. (पर्यावरण केंद्रीत)
उदा - गंगा & यमुना या नद्यांना जीविताचा दर्जा मिळाला.

2) सध्य पर्यावरणीय घटकांचे पुनर्वसन आणि विस्थापितांचे हक्क
उदा - समृद्धी महामार्ग - बिबटे, हरिण पुनर्वसन
ग्रीन कॉरिडॉर (उडीसा) (मयूर बंज) - हत्तींसाठी - (Project Elephant)

3) नैसर्गिक चक्राचा समतोल पुनर्स्थापित करणे.
उदा - केन बेतवा - नदी जोड प्रकल्पामुळे पन्ना व्याघ्र प्रकल्पातील
↳ वाघांच्या निसर्ग चक्रावर परिणाम

4) Enviorment Impact Assesment
(पर्यावरण प्रभाव मुल्यांकन)
↳ सदर प्रकल्पाचे पर्यावरण प्रभाव मुल्यांकन करून विवेकआधारित निर्णय घेणे - (व्यवहारवादी)
उदा - ~~vizingjam~~ Vizhinjam Port Project.
जैतापूर, पोस्को प्रकल्प - बंद पडला आहे.

# 1

5) भविष्यकालीन आपत्तींचे प्रभावी मुल्यांकन आणि आपत्ती व्यवस्थापन नियोजन

उदा - ताडोबा अभयारण्यामध्ये उन्हाळ्यापुर्वी पाणवठ्यांची निर्मिती.

↳ प्राण्यांबद्दल सद्भावना, प्रेम, करुणा

6) वृक्षतोड -

↳ गरजेइतकी वृक्षतोड आणि वृक्षांची पुनर्लागवड

उदा - चंदीगड - Compansatory a forestration scheme

↳ भविष्यातील वृक्षतोड प्रतिबंध

7) जैवविविधतेच्या संवर्धनासाठी पर्यावरण विरोधी क्रियांवर निर्बंध करणे.

उदा - मासेमारी संवर्धन / पर्यावरणीय निर्बंध.

- प्राण्यांच्या अवयवांच्या तस्करीवर निर्बंध - World wide Fund.

8) Reduse, Reuse, Recycle (3R) (कमी करणे, पुनर्वापर, पुनर्निर्मिती)

उदा - ई-कचरा पुनर्वापर कचरा, ई-वेस्ट (2022)

- International Solar Alliance (आंतरराष्ट्रीय सौर आघाडी)

## 3) सायबर नितिशास्त्र

मुळ प्रश्न हा नाही की, मशीन (यंत्र) विचार करु शकते की नाही मुळ प्रश्न मानसाच्या विचारांवर आहे किंवा मानसाच्या विचार करण्याच्या क्षमतेवर आहे. — B. F. Skinner

- "तंत्रज्ञान हे हा बहुपयोगी नोकर /सेवक आहे. परंतू घातक मालक आहे"

- "जास्त अधिकार जास्त जबाबदरी घेऊन येते"

# सायबर नितीशास्त्राचे मुलतत्वे-

1) <u>गोपनियता</u> - एखाद्या व्यक्तीची गोपनिय माहिती आणि त्याची डिजिटल सचोटी (intigreaty)

उदा. 1) फेसबुक अकाउंट हॅक होणे
2) पुट्टस्वामी खटला - गोपनियतेचा अधिकार (Art 21)
3) ई-आधार




2) सुरक्षितता - (सायबर)
↳ गोपनियता अभेद असली पाहिजेत
↳ पासवर्ड संरक्षण

3) सचोटी -
↳ माहितीची अचुकता आणि वैद्यता (माहिती पडताळता आली पाहिजेत)

उदा. - डिजिलॉकर, आधार मास्क

4) पारदर्शकता -
↳ ~~अपारदर्शक~~ अपारदर्शक असणारे घटक → Deepwabe

↳ AI तंत्रज्ञान हे पारदर्शकतेच्या अभावामुळे ब्लॅक बॉक्स ठरत आहे

5) उत्तरदायी -
↳ खाजगी सायबर कंपन्या त्यांचा मोबदला समाजातुन प्राप्त करत असलात. तसेच त्यांच्याकडील माहिती ही सामुदायिक मालकी आहे किंवा ते सामुदायिक मांडवल आहे. अशा सर्व कंपन्या समाजास

उत्तरदायी असतात.

उदा> फेसबुक मिडीया ट्रायल

6) निष्पक्ष / न्यायिक -

↳ माहितीच्या आधारावर किंवा यंत्रणेच्या आधारावर भेदभाव न करणे

उदा> - डिजिटल डिवाइड, (अपा
(डिजिटल अपारथेड)
└ अमेरिकेतील वर्णभेद गुलामगिरी संबंधित

# सायबर नितीशास्त्रातील मुख्य मुद्दे / समस्या / द्वंद्व -

1) गोपनियता विरुद्ध राष्ट्रीय सुरक्षितता

↳ उदा - पेगासस प्रकरण
- फोन टॅपिंग प्रकरण (2019)

2) AI द्वारे दुजाभाव किंवा भेदभाव

उदा - i) ॲमेझॉन ची AI आधारित पदभरती यंत्रणा, लिंग आधारित भरतीस प्राधान्य देत आहे

ii) AI हे अल्गोरिदम आधारित आणि भेदभाव जन्य माहितीपुरवठ्या वर अवलंबून असल्याने आढळले.

उदा - चॅटजीपीटीद्वारे निर्माण झालेले पिक्चर / फोटो.

• सायबर गुन्हे / सायबर सुरक्षिततेचे मुद्दे -

1) KYC Fraud
2) online Bill भरताना होणारे सायबर गुन्हे.
3) मोबाईल बँकिंग आणि सुरक्षा
4) मोफत Wi-Fi चे धोके.
5) कुरिअर Fraud
6) Address verification Fraud
7) स्पुफिंग सायबर क्राइम
8) डेटिंग ॲप .... की ट्रॅप
15) Child Pronography
9) व्हॉईस क्लोनिंग फ्रॉड
10) वन रिंग कॉल फ्रॉड
11) डिजिटल अरेस्ट
12) डिजिटल स्वाक्षरी - सुरक्षितता
13) हनिट्रॅप (सेक्सटॉर्शन सायबर क्राईम)
14) पॉन्झी फ्रॉड (भ्रांतवंचक घोटाळा)

PRAYAAS

3) फसवणूक करणारी माहिती आणि खोट्या बातम्या-

- परिणाम - 1) सामाजिक सुरक्षा धोक्यात येते
- 2) एकात्मिता, सौहार्य धोक्यात येते.
  मित्रत्व, एकोपा
- 3) व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्यावर होणारे परिणाम
  - मानसिक संतुलन बिघडते, मानसिक आरोग्य बिघडते, नैराश्य उदासिनता
- 4) जनविश्वासावर परिणाम -
  - कॅब्रीज ॲनॅलॅटिकल स्कॅंडल
- 5) चुकीच्या माहितीमुळे सामाजिक ध्रुवीकरण, तेढ आणि काही बाबतीत मॉब लिंचिंग होऊ शकते.
  उदा - पालघर साधु हत्या प्रकरण (2020)
- 6) Boycot culture (बहिष्कार)

4) सायबर बुलिंग & छळवणूक -

- परिणाम - i) Trolling culture - सामाजिक प्रतिष्ठित विरुद्ध
  Troller

5) डार्कवेब

- असे व्यवहार जे सामाजिक / समाज माध्यमांवरून किंवा गोपनिय संकेतस्थळावरून केले जातात ज्याला शासकीय यंत्रणा जागतिक संस्था किंवा राज्य अधिकृतता देत नाही तसेच अशी कृत्य कायदे विरुद्धी मानली जातात किंवा यापुढे जाऊन अशा कृत्यांना निती संमत ठरवता येत नाही.

उदा - 1) अवैद्य शस्त्रास्त्रांचे तस्करी
2) अंमली पदार्थांची तस्करी
3) मानवी तस्करी, मानवी अवयवांची तस्करी

- परिणाम -
1) मानवता नष्ट होते 2) नैतिकदृष्ट्या अमानवी व्यवहारांना चालना

5) आर्थिक हित विरुद्ध मानवी मुल्य - द्वंद्व

6) **बौद्धीक संपदा हक्क** - (Intellectual Property Rights)

↳ कलाकार, चित्रपट दिग्दर्शक, पुस्तक लेखक यांच्या मुळ कलाकृती अवैद्यरित्या विक्री केली जाते (Pairated copies)

↳ 29.3 % महिलांचे डिजिटल समावेशन भारतामध्ये झालेला आहे - डिजिटल Devide

# आंतरराष्ट्रीय करार

1) बुडापेस्ट येथील ~~साबर~~ सायबर क्राइम करार, 2000

2) पॅरिस कॉल फॉर ट्रस्ट & ~~साय~~ सिक्युरीटी इन सायबर के स्पेस

3) Global Digital compact

4) AI Principle & Privacy Guidlince

5) ~~In~~ ENISA – युरोपिय युनियन

6) AI Governance - ऑस्ट्रेलिया

7) Safe secure & ~~a~~ trust worthy AI, USA.

4 प चे धोरण
- → पारदर्शकता
- → प्रतिबंधीतता - गुन्हे
- → पुरकता (सुरक्षा)
- → प्राधान्यता - महिला

8). राष्ट्रीय सायबर अपराध रिपोर्टिंग पोर्टल

- POCSO e-box

↳ भारत

4) व्यावसायिक नितीशास्त्र (Business Ethics) - CSR - 336

i) कॉर्पोरेट प्रशासन

↳ "एकमेका सहाय्य करु अवघे होऊ सुपंथ"

Defination - कॉर्पोरेट प्रशासन म्हणजेच एखाद्या खाजगी कंपनीमधील व्यवस्थापक (बोर्ड), (भागधारक) आणि इतर समावेशक यांतील परस्पर हिताचे संबंध आणि जबाबदारपूर्ण पारदर्शक आणि भविष्यनिष्ठ निर्णयांची निर्मिती

- "Good Ethic is Good Business" – Peter Drucker
  "चांगली नितिमत्ता हाच चांगला व्यवसाय"

- "जो व्यवसाय केवळ पैसाच कमवतोय तो दरिद्री व्यवसाय आहे
  –हेन्री फोर्ट

- "दीर्घकालामध्ये भांडवलापेक्षा चारित्र्य महत्वपूर्ण ठरतोय" – जॉन Bogle

# कॉर्पोरेट प्रशासनाचे महत्व

1) लोक हिताचे निर्णय घेतील –

2) ज्या अंतर्गत विस्तृत स्तरावर, सामाजिक, पर्यावरणीय आणि भागदारकांच्यावरील परिणामांचा विचार केला जाईल

उदा - i) TCS Foundation पर्यावरणीय कार्य

ii) वनतारा – Rellience Foundation

iii) FORD CSR

iv) 'ESG' Framework

2) कॉर्पोरेट भ्रष्टाचारावरील प्रतिबंध –

उदा - i) सत्यम घोटाळा

ii) Kingfisher Company

PRAYAAS

3) गुंतवणूकदारांमध्ये विश्वासाची निर्मिती करणे & प्रोत्साहन देणे

↳ "स्वहित v/s सामाजिक हित सदर द्वंद्वाची सोडवणूक करण्यात मदत.

↳ शाश्वत आणि दीर्घकालीन वृद्धीची हमी

4) जनसामान्यांमध्ये व्यावसायिक प्रतिमा उंचावणे आणि जनविश्वासाची निर्मिती करणे

उदा - टाटा Trust

5) कामगारांमध्ये स्वाभिमानाची भुमिका निर्माण करणे / प्रतिष्ठा निर्माण करणे.

उदा - "टाटा नमक देश का नमक"

" अमुल दुध पिता है इंडिया"

6) संपत्तीचे पुनर्वितरण - समाजात

↳ Art 39 B चे वास्तविकीकरण

↳ SDG-10 (जागतिक समानता)

↳ लोकांमध्ये दानशूरता निर्माण करण्यास प्रोत्साहन देणे.

उदा - देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे घेता घेता देणाऱ्याचे हात घ्यावे. -

7) भौतिक वृद्धीला मर्यादा निर्माण करून नैतिक वृद्धीमध्ये वाढ

↳ अनुकंपावादी भांडवलवादामध्ये वाढ - (नारायणमुर्ती)

- लाभ, पृथ्वी, नागरिक यांच्या हिताचा समतोल

# कॉर्पोरेट नितिशास्त्राचे / व्यावसायिक नितीशास्त्राचे आधारस्तंभ

1) पारदर्शकता -

↳ आर्थिक उलाढाल संभाव्य धोके यांची माहिती खुल्या स्वरूपात उपलब्ध असणे.

उदा - सार्वजनिक लेखापरिक्षण (Auditing)

2) जबाबदारी / उत्तरदायीत्व -

↳ खाजगी व्यावसाय हा भागदारकांना, समाजाला, ग्राहकांना, पर्यावरणाला & शासनाला उत्तरदायी असला पाहिजेत

उदा - i) अमुल सहकारी मॉडेल (प्रतिमान)

ii)

3) नियमन (Regulation) -

↳ पर्यावरणीय धोक्यांवर, अमानवीय आणि अनैतिक धोक्यांवर नियंत्रण असणे

उदा - राज्य प्रदुषण नियंत्रण महामंडळ

राष्ट्रीय प्रदुषक नियंत्रण महामंडळ

e.g) कामगार कायदे (2020) द्वारे कामगारांच्या मुलभूत मानवी हक्कांचे संरक्षण.

# मुलभुत यंत्रणा (Key

## कॉर्पोरेट नितीशास्त्रासाठी मुलभुत यंत्रणा -

1) संचालक मंडळ - (Board of Director)

↳ Bor ↳ निर्णयामध्ये व्यापकता, सर्वसमावेशकता आणि न्यायिकता निर्माण करणे

2) सामाजिक लेखापरिक्षण किंवा बाह्य निरीक्षण.

↳ वित्तीय विवरणी (Financial statement) - च्या निर्मितीमध्ये सहभाग आणि परिक्षण

3) नियामक व्यवस्था (आराखडा)

↳ जसे की RBI, SEBI, FEMA, Capitation commission of India (भारतीय स्पर्धा आयोग)

# कॉर्पोरेट प्रशासनासमोरील आव्हाने -

1) मालकी हक्क आणि नियंत्रणाचे अतिकेंद्रीकरण -
↳ कंपनीच्या निर्णय प्रक्रियेवर कुटुंबांचा प्रभाव असणे.
उदा - जींदाल . रतन टाटांचे नॅनो उत्पादनाचे धोरण.

2) संपूर्ण स्वतंत्र संचालक मंडळाचा अभाव -
↳ बऱ्याचदा संचालक मंडळामधील सदस्यांचे व्यवसाया अंतर्गत आर्थिक हितसंबंध असतात, परिणामी निर्णयाची तटस्थता राखली जात नाही

3) कुमकुवत स्वरूपातील नियमन -
↳ शासकीय धोरणांचा आणि नैतिक आचरणाचा पूर्णपणे अवलंब करण्यात असमर्थ ठरणे.
उदा - किंगफिशर - विजय मालिया प्रकरण
- युनियन कार्बाईट - भोपाळ गॅस दुर्घटना & सुरक्षा प्रणालीचे अपयश

4) अल्पभागधारकांच्या सुरक्षिततेचा मुद्दा -
↳ आर्थिक मोबदला वित्तीय हानी आणि निर्णय प्रक्रिया यांमध्ये अल्प भागदारकांना डावलले जाते.
उदा . DSK (MH)

5) Insider Trading आणि फसवणूक -
↳ अनेकदा कंपनी अंतर्गत महत्वाच्या स्थानावर असणाऱ्या अधिकाऱ्यांद्वारे कंपनीची गोपनिय माहिती, आर्थिक व्यवहार यांची विक्री किंवा स्वलाभासाठी उपयोग केला जातो.

6) अल्पकालीन, दीर्घकालीन पर्यावरणीय हानी - केस स्टडी बेस्ड

↳ • ग्रीन वॉशिंग -

जेव्हा एखादी कंपनी किंवा व्यवसाय आपले उत्पादन पर्यावरणपूरक असल्याचा दावा करतो आणि ग्राहकांची फसवणूक. दिशाभूल तसेच आर्थिक मोबदला प्राप्त करतो तेव्हा त्यास ग्रीन वॉशिंग असे म्हणता येईल

उदा - वोल्कस वॅगन प्रदुषण घोटाळा

7) संचालक मंडळाकडे कौशल्याचा अभाव असणे.

उदा - AI तंत्रज्ञानाच्या वाढता वापर.

8) परोपकार केवळ श्रीमंत व्यक्तीच करू शकतात अशी भावना निर्माण होणे हा CSR च्या प्रभावातून झालेला परिणाम आहे.

↳ Corporate Social Responsibility
कंपनीची सामाजिक जबाबदारी

9) Crony capital -

↳ CSR चा वापर खाजगी कंपन्यांद्वारे Crony capital च्या स्वरूपात करून Brand image ची निर्मिती केली जाते.

# उपाय

1) कंपन्यांद्वारे शाश्वत कार्ये जसे की युवकांना कौशल्ये प्रदान करणे, दारिद्र्यातील तसेच वंचित घटकातील नागरिकांना शिक्षण प्रदान करणे - सदर प्रक्रियेसाठी प्रशासन प्रोत्साहन देऊ शकते.

उदा - ~~Faur~~ FORD CSR - डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाच्या प्रसार करणे. शासन

2) शासन आकांक्षी जिल्हा कार्यक्रम प्रभावीपणे राबवण्यासाठी CSR ला दिशा देऊ शकते.

PRAYAAS

• जरी व्यवसायांच्या मुलभूत हेतू आर्थिक मोबदला निर्माण करण्याचा असला तरी देखील गांधीजींचे विश्वस्त प्रतिमान समाजपूरक आणि सामाजिक कल्याणकेंद्रीत कार्य करण्याचे ~~आव्ह~~ आवाहन कंपन्यांना करते.

# CSR चे उदाहरणे (कंपनीची सामाजिक जबाबदारी)

1) Indian oil परिवर्तन कार्यक्रम -
↳ तुरुंगातील कैद्यांच्या जीवनात परिवर्तन आणण्यासाठी

2) विप्रो केअर - शिक्षण, प्राथमिक आरोग्य केंद्र, पर्यावरण क्षेत्रात मोलाचे योगदान

3) सुनहेरा कल - ITC

4) आदर पुनावाला - पुणे महानगरपालिका कचराव्यवस्थापनातील यांत्रिकीकीकरण

# कॉर्पोरेट नितीशास्त्रातील महत्वपूर्ण समित्या आणि त्यांच्या सुचना -

1) कुमार मंगलम बिरला - (1999)
↳ स्वतंत्र संचालक असणे आवश्यक आहे. तसेच लेखापरिक्षण समितीची स्थापना आणि तिची कार्य.

2) नारायण मुर्ती सामिती (2003)
↳ या समितीने कॉर्पोरेट क्षेत्रामध्ये व्हिसलब्लोअर यंत्रणेची निर्मिती करण्याचे सुचविले तसेच जोखीम व्यवस्थापन यंत्रणा भागधारकांच्या हितासाठी महत्वपूर्ण असल्याचे मानले

3) J.J. इराणी समिती - (2005)
↳ CSR हे कंपन्यांवर नैतिकदृष्ट्या बंधनकारक असावे. ज्याच्या परिणामी 2013 साली कंपनी ॲक्ट अंतर्गत CSR चा समावेश झाला.

4) उदय कोटक समिती -(2017) — SEBI ने स्थापन केला
↳ कंपनीच्या स्वतंत्र संचालक मंडळावर महिला संचालक अनिवार्य असतील

OECD - Organisation for Economic cooperation & Development

# आंतरराष्ट्रीय

1) OECD द्वारे कॉर्पोरेट प्रशासनाची मूलभूत तत्त्वे, 1999

2) किंग रिपोर्ट - द. आफ्रिका -
↳ Tripple Bottom line Approch - तिहेरी तळरेषा दृष्टिकोन
↳ 3P – People, Planet & Profit
समाज, पृथ्वी, मोबदला

# कॉर्पोरेट प्रशासनाला अधिक मजबूत करण्यासाठी इतर आवश्यक मुद्दे.

1) कॉर्पोरेट प्रशासनासाठी नैतिक संहितेचे कायद्यात रूपांतरण करणे
2) कंपनी अंतर्गत व्हिसलब्लोअरला संरक्षण आणि प्रोत्साहन देणे.
3) कंपनीतील कर्मचारी आणि भागधारक यांना नैतिक प्रशिक्षण आणि जागरूकता वाढवण्यास प्रोत्साहन देणे. याद्वारे नितीमत्ते-बाबत संवेदनशीलता निर्माण करणे आवश्यक मानले जाते.
4) खाजगी सार्वजनिक भागीदारीसाठी विश्वासार्ह वातावरण निर्माण करणे या अंतर्गत प्रशासन, उद्योग, नागरी समाज आणि समुदाय यांच्यामध्ये समन्वय निर्माण करणे.

# नागरी समाज.

PRAYAAS

सिंहासन-चित्रपट

5) राजकीय नितीशास्त्र - Political Ethics

↳ राजकीय नितीशास्त्र म्हणजेच नैतिक मुलतत्त्वे, नैतिक विचारधारा यांचा अवलंब करून राजकीय निर्णय, प्रशासन आणि जनव्यवस्था हाताळणे होय. याद्वारे निर्मित सत्ता सचोटी, न्यायिकता, उत्तरदायित्व आणि जनहित यांना केंद्रस्थानि ठेवते.

- "नितीशास्त्राशिवाय असणारे राजकारण म्हणजेच चेतनाविहीन शरीर आहे" — गांधीजी

"राजकारणी केवळ पुढच्या निवडणूकीचा विचार करतो, पण दुरदृष्टी असलेला नेता पुढच्या पिढीचा विचार करतो" - जेम्स clerk

# राजकीय नितीशास्त्राची मुलभूत मुल्ये.

1) सचोटी / सत्यनिष्ठा (integrity)

↳ विचार, आचार यांच्यादरम्यान असणारे साम्य म्हणजे तुमची सत्यनिष्ठा होय.

[व्यक्ती जसा विचार करतो, जसा बोलतो तसाच वर्तन करतो का? याचे परिक्षण सचोटी अंतर्गत केले जाते]

उदा. - लाल बहादूर शास्त्री - रेल्वे अपघातामुळे यांनी रेल्वे मंत्री पदाचा राजीनामा दिला.

2) उत्तरदायित्व -

↳ राजकीय नेते हे सर्वप्रथम त्यांच्या कृतीसाठी जनतेला उत्तरदायी असतात

उदा. माहितीचा अधिकार कायदा, 2005

3) पारदर्शकता -

↳ निर्णय प्रक्रिया आणि धोरण निर्मितीमध्ये असणारी पारदर्शकता किंवा खुलेपणा.

उदा - आंध्रप्रदेशचे ई-खरेदी यंत्रणा

4) न्यायिकता : (Justic) - पक्षपात विरहीत

↳ राजकीय नेत्यांच्या कार्यामध्ये असणारी तटस्थता & समानता-पूर्वक वागणूक -

5) जनहीत / जनसेवा - (Public Interest)

↳ व्यक्तीगत हीता ऐवजी सामुहीक कल्याणाला प्राधान्य देणे

[उदा] • राज्यधोरणाची मार्गदर्शन तत्वे यातील कल्याणकारी राज्याचे धोरण.

6) तत्वनिष्ठा -

↳ राजकीय नेत्यांची विशिष्ट विचारधारेप्रती नैतिक स्वरूपातील वचनबद्धता म्हणजेचे तत्वनिष्ठा होय.

भारतात पहिला संगणक, मिश्र अर्थव्यवस्था - राजीव गांधी संजय राऊत

7) दुरदृष्टी -

↳ राजकीय नेत्यांनी जनहीताच्या दृष्टीने भविष्यनिष्ठ आणि समाजावर दीर्घकालीन बदल घडवून आणणारे निर्णय घेणे आवश्यक असते.

# राजकीय नितीशास्त्राचे महत्व -

1) राजकीय नैतिकता प्रशासनामध्ये जनविश्वासाची निर्मिती करते

सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास

[उदा] - अटलबिहारी वाजपेयी , नागरी सनद

• जनसुनवाई - हमारा पैसा, हमारा हिसाब

↳ RTI Act.

2) धोरण निर्मितीमध्ये नैतिक & सामाजिक मुल्यांचा अंतर्भाव होणे

[उदा] - जागस लोकपाल लोकायुक्त कायदा, 2013

नारी शक्ती वंदन अधिनियम

गांधीजींचे ग्राम स्वराज - स्वयंशासनाचे धोरण.

3) भ्रष्टाचार आणि सत्तेच्या गैरवापराला आळा घातला जातो.

उदा - हाँगकाँग येथील Independent commission against corruption

- लोकपाल लोकायुक्त

4) यादवारे न्याय आणि समानतेची रुजवणूक वाढेल

उदा - विनोबा भावेंची भूदान चळवळ

5) लोकशाही आणि संविधानिक मुल्यांचे जतन

उदा. अटल बिहारी वाजपेयी - यांच्या विरोधात जेव्हा अविश्वास ठराव मांडण्यात आला तेव्हा Fair निवडणूक ही देशासाठी अतिरीक्त वित्त खर्च निर्माण करणारी होईल हे मांडताना पार्टीया आएँगी, जाएँगी. सरकार बनेंगे बिघडेंगे लेकीन देश का लोकतंत्र अमर रेहना चाहिए हे वाक्य

6

6) राजकीय धोरण निर्मितीमध्ये जनसहभागाच्या समावेश.

उदा - My Gov.in, पंचायत राज्य व्यवस्था

7) राजकीय नेतृत्वावरील प्रामाणिकतेमुळे विश्वासार्हता वाढते.

उदा - पं. जवाहरलाल नेहरूंचे अलिप्तवादी चळवळीमधील भूमीका.

↳ नेतृत्वाची जागतिक प्रतिमा उंचावते.

# समस्या -

1) राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि कायदेशीर नैतिकतेचा ऱ्हास

↳ जसे की 2019 च्या लोकसभेतील खासदारांपैकी 43 % सदस्यांवर गुन्ह्यांची नोंद आहे.

2) भ्रष्टाचार आणि आर्थिक सत्तेद्वारे प्रशासकीय व्यवस्थेची गुणवत्ता ढासळणे. उदा - 2G Spectrum, common wealth Game घोटाळा

3) वोट बँक / मतांचे राजकारण आणि अस्मितेच्या ध्रुवीकरणाचे राजकारण

उदा - जातीय राजकारण, भाषेच्या आधारावर ध्रुवीकरण

4) अवैध्य राजकीय निधी आणि त्याचा गैरवापर

उदा - Crony capitalism, निवडणूक रोखे.

5) ~~स्व~~ पक्षांतर आणि राजकीय घोडेबाजार -

उदा - आयाराम गयाराम -चे राजकारण - तत्वनिष्ठेची कमतरता.

↳ DMK आणि AI DMK - पक्षफुटी

6) भाईभतीजा वाद (नेपोटीझम) आणि घराणेशाही

↳ भारतात अनेक राजकीय पक्ष हे कुटुंब आधारीत आहेत

उदा - समाजवादी पार्टी

7) सभागृहाची मर्यादा आणि प्रतिष्ठा यांचा भंग

8) लोकप्रिय धोरणांचा अनैतिक राजकारणांसाठी / सत्तेसाठी वापर करणे (रेवडी कल्चर)

उदा - लाडकी बहीण योजना, महतारी वंदन योजना (ओडिसा)

9) समाजमाध्यमांद्वारे खोट्या बातम्या, अफवा किंवा मतपरिवर्तन करणे

↳ प्रोपागंडाचे राजकारण

उदा - हिंदुत्वाचे राजकारण




10

# राजकीय नितीशास्त्रासाठी नैतिक उपाय-

1) बंधनकारक नैतिक संहितेची निर्मिती करणे-
   ↳ 2002 मध्ये लोकसभा नितीशास्त्र समितीची निर्मिती

2) निवडणूक यंत्रणेमध्ये पारदर्शक परिवर्तन घडवणे.
   ↳ उदा - उपायस्वरूपात VV पॅट सारखी यंत्रणा वापरणे.

3) स्वच्छ राजकीय निधीसाठी प्रोत्साहन देणे जसे की सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोख्यांवर बंदी घातली आहे.

4) पक्षांतर्गत लोकशाही सुनिश्चित करणे
   उदा - आम आदमी पक्ष - सहभागात्मक निर्णय प्रक्रिया

5) राजकीय नेत्यांचे नैतिक आणि मुल्य आधारित संवेदनशील प्रशिक्षण करणारी यंत्रणा उभारणे. जसे की नागरी सेवेसाठी असणारी LBSNAA, यशदा (MH) - राज्य नागरी सेवेसाठी

6) व्हीसलब्लोवर यंत्रणा & RTI यंत्रणा यांना अधिक सक्षम करणे.

7) गुन्हेगारी खटल्यातील व्यक्तीला राजकारणामध्ये सहभागी न करणे

8) नागरी सनद आणि सामाजिक लेखापरिक्षण यांचे संस्थात्मीकरण करणे
   उदा आंध्रप्रदेशमधील मनरेगा प्रकल्पांचे सामाजिक लेखापरिक्षण.

9) डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब करणे
   ↳ जसे की - ई-लोकपाल

10) नैतिक राजकारण्यांना पारितोषिक स्वरूपात प्रोत्साहन देणे.
   उदा - संसदरत्न पुरस्कार, रेमन मॅगसेसे पुरस्कार

PRAYAAS

# आंतरराष्ट्रीय पुढाकार -

1) संयुक्तराष्ट्र भ्रष्टाचारविरोधी करार, 2003

2) युरोपियन परिषदेची "GRECO" – भ्रष्टाचारविरोधी

3) G20 Anti Corruption working Group

4) नॉर्डिक नैतिक ~~etc~~ तज्ञ AI संघ

# खाजगी आणि सार्वजनिक संबंधातील नितीशास्त्र -

1) खाजगी संबंधातील नितीशास्त्र" - Ethics in the Private Relationship.

"नितीशास्त्र विरहीत प्रेम हा हक्क दर्शवितो तसेच प्रेमविरहीत नितीशास्त्र संशय निर्माण करते"

"नात्याची खरी ताकद ही परिपूर्णतेमध्ये नाही तर परस्पर आदर आणि क्षमाशिलतेमध्ये आहे" – दलाई लामा

"वैयक्तिक संबंधामध्ये आदर हा दर्जाच्या आधारावर प्राप्त होत नाही तर तो समानानुभूती आणि सत्य यातून कमविला जातो

# खाजगी नितीशास्त्र - अर्थ – Quote ~~मध्ये~~ use

↳ सार्वजनिक नितीशास्त्राच्या पलिकडे जरी खाजगी नितीशास्त्र हे अनौपचारिक स्वरुपाचे असले तरी त्यामध्ये विश्वास, प्रेम आदर, परस्पर सहकार्य आणि निष्ठा या मुल्यांचे सर्वोच्च महत्त्व असते.

• गोष्टीच गोष्टी.

# खाजगी संबंधातील नितीशास्त्राची मुलभूत मुल्ये -

1) प्रेम आणि काळजी -

↳ आपल्या जवळच्या व्यक्तीबाबत किंवा तिच्या भविष्याबाबत तसेच कल्याणाबाबत चिंता बाळगणे वेळप्रसंगी भावनिक आधार देणे आणि दयाभाव ठेवणे

2) प्रामाणिकपणा आणि सत्यनिष्ठा - या अंतर्गत संवादामध्ये पारदर्शकता ठेवणे, चुका मान्य करणे आणि कठीण प्रसंगातही सत्यवान असणे

3) सभ्यता आणि शिष्टाचार

↳ शब्दात आणि वर्तनात आदरभाव राखणे. दैनंदिन आंतरक्रियांत अपमान किंवा अनादर टाळणे

4) वडिलधाऱ्यांचा आदर करणे -

↳ कुटुंबातील ज्येष्ठ सदस्यांचे त्याग, योगदान आणि प्रतिष्ठेचा स्वीकार करणे; स्त्री आणि पुरुष सदस्यांमध्ये समतेची भावना ठेवणे. समान संधी & वैयक्तिक निवडींचा आदर सुनिश्चित करणे

5) समर्पण आणि वचनबद्धता -

↳ अडचणींमध्ये कुटुंब आणि मित्रांच्या पाठी उभे राहणे. आश्वासने आणि वचन पूर्ण करणे.
जबाबदाऱ्या

6) वेळ संसाधने, भावना आणि जबाबदाऱ्या वाटून घेणे.

7) गोपनियता आणि निष्ठा -

↳ घनिष्ठ संबंधांमध्ये सामायिक केलेल्या संवेदनशील बाबींमध्ये गोपनियता आणि निष्ठा राखणे

8) क्षमाशिलता -
↳ कटूता वाढवण्याऐवजी संघर्ष मिटवण्याची तयारी ठेवणे

# खाजगी जीवनातील नितीशास्त्राचे महत्व -

1) नात्यामध्ये एकमेकाप्रतीचा आदर & प्रामाणिकपणा यांच्यात वाढ होईल

2) नात्यांमध्ये समानतेची भावना & परस्पर प्रतिष्ठेचे जतन होईल

उदा - निर्णय प्रक्रियेमध्ये पती-पत्नीचा समान सहभाग

3) नात्यांमध्ये भावनिक स्थिरता आणि भावनिक शांतता निर्माण होते.

उदा - तंट्यांचे निवारण विचारविमर्शाने सोडवणे.

4) नात्यांबद्दलची जबाबदारी आणि उत्तरदायीत्वामध्ये वाढ होते.

उदा - वृद्ध आई-वडिलांचे संगोपन - श्रावणबाळ

5) क्षमाशिलता & करुणा वृद्धिंगीत होते.

उदा - आईवडिलांद्वारे केली जाणारी क्षमा.

6) वैयक्तिक आयुष्यात वृद्धी, संपन्नता & समाधानामध्ये वाढ होते

उदा - नात्यांमध्ये कृतज्ञतापुर्ण वर्तवणूक ठेवणे

7) सार्वजनिक नितीमत्तेची पायाभरणी करण्यामध्ये योगदान-

PRAYAAS

# सार्वजनिक जीवनातील नितीशास्त्र -

- सार्वजनिक जीवनातील सर्वात मोठी संपत्ती ही जनतेचा विश्वास आहे & सचोटी शिवाय तो प्राप्त होत नाही - अर्थर पेज.

# नोलन समितीची सार्वजनिक जीवनातील नितीमुल्ये -

U.K. - 1995 - U.K प्रशासनाने प्रशासकीय सुधारणांना केंद्रस्थानी ठेवून लॉर्ड नोलन यांच्या अध्यक्षतेखाली नोलन समितीची स्थापना केली. यांनी 7 मुलभूत नितीतत्त्वे दिली आहेत.

1) निस्वार्थता (selflessness)
कोणत्याही प्रशासकीय निर्णयामध्ये स्वहीताऐवजी बृहत (विस्तृत) सार्वजनिक हिताचा विचार केंद्रस्थानी असणे आवश्यकता आहे (उपयुक्ततावाद)

2) सचोटी :- (integrity)
↳ विचार, संवाद आणि कृती यांतील साधर्म्य
↳ जैसा बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले - संत तुकाराम

3) वस्तुनिष्ठता - (objectivity)
↳ निर्णय प्रक्रिया ही पक्षपात विरहीत, गुणवत्ता आधारित, पारदर्शक & पुराव्यांच्या आधारे घेतली जावी

4) निर्णयातील खुलेपणा / पारदर्शकता -
↳ निर्णयप्रक्रीयेमध्ये पारदर्शकता निर्माण करण्यासाठी नागरीकांचा सहभाग, माहितीची उपलब्धता आणि कारणमिमांसा करणे आवश्यक असते.

5) नेतृत्व -
↳ नेतृत्वाने कायम सर्व नैतिक मुल्यांचा (समावेशन करून) अंमलबजावणीसाठी पुढाकार घेणे आणि परिणामांची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असते.
↳ नेतृत्व थोडक्यात ते असते जे योग्य भुमिका जाणते आणि ते पारही पाडते.

६) प्रामाणिकपणा-
↳ म्हणजे खाजगी हीत स्पष्ट करणे किंवा सार्वजनिक कर्तव्यांच्या आड खाजगी हीत येणार नाही याची दक्षता घेणे & याद्वारे जनतेचा स्वत:वरील & व पर्यायाने प्रशासनावरील विश्वास वाढवणे.

७) उत्तरदायित्व. (Accountability)
↳ कोणत्याही क्रीयेसाठी होणाऱ्या परिणामांसाठी जनतेला उत्तरदायि असणे.

# इतर मुल्ये -
१) प्रतिसादात्मकता (Responcivness) -
↳ योग्यवेळेमध्ये & संवेदनशीलपणे नागरीकांच्या गरजा आणि तक्रारी यांचे निवारण करणे.
↳ कायदे आणि सुव्यवस्था तसेच संविधान यांतील मुल्यांच्या, नियमांचा आदर राखून कार्य करणे

२) न्यायिकता -
↳ मुलभूत & नागरी अधिकारांमध्ये समता निर्माण करणे. तसेच वंचित & दुर्बल घटकांबाबत न्यायपूर्ण वर्तवणूक ठेवणे

# परिणाम - लाभ /महत्व
# नागरिकांचा प्रशासनाबाबतीचा विश्वास वाढेल. याअंतर्गत पारदर्शकता & विश्वासार्हता याच्यामध्ये वाढ होईल.
उदा - आपत्तीच्या प्रसंगी अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीमुळे नागरीकांचा प्रशासनावरील विश्वास वाढेल.

२) उत्तरदायित्व - याअंतर्गत व्यक्ती अथवा संस्था आपल्या कृतीबाबत व त्यांच्या परिणामांबाबत अधिक जागरुक होतात.

३) याअंतर्गत प्रशासकीय न्यायिकतेमध्ये वाढ होईल. सार्वजनिक जीवनात नितीशास्त्र नागरीकांमधील भेदभाव & पक्षपात यांना आळा घालते.

उदा - थेट लाभ हस्तांतर

4) प्रशासनातील पारदर्शकतेमध्ये वाढ :- सार्वजनिक जीवनातील नितीमत्ता प्रशासनांतर्गत मुक्तता किंवा खुलेपणा निर्माण करेल, परिणामी फसवणूक व खोट्या अफवा यांवर नियंत्रण साधेल.

उदा - RTI.

5) लोकशाही मूल्यांचे जतन-

उदा - निवडणूक प्रक्रियेदरम्यान निवडणूक अधिकाऱ्यांद्वारे पारदर्शकपणे पार पडली जाणारी निवडणूक / कर्तव्य

6) प्रतिसादात्मक परस्पर संवाद -
नितीमत्तापूर्ण वातावरणामुळे प्रशासन आणि नागरीक यांच्यामध्ये परस्पर सुसंवाद आणि माहितीची देवाणघेवाण होते.

# खाजगी आणि सार्वजनिक जीवनात : नितीशास्त्रातील परस्परसंबंध




नैतिक दुविधा, सहकार्य, परस्पर प्रभाव द्वंद्व

→ काही मुलभूत मुल्य सर्वप्रथम खाजगी जीवनामध्ये निर्माण होतात आणि सार्वजनिक जीवनावर त्यांचा प्रभाव दर्शवितात.

1) चारित्र्याचे सातत्य -
→ जो व्यक्ती वैयक्तिक आयुष्यामध्ये प्रामाणिक, सचोटीपूर्ण, करूणामय न्यायिक आणि आदरार्थी स्वरूपाचा आहे तो सार्वजनिक जीवनामध्येही समान मुल्ये प्रकर्शीत करतो.

2) मुल्यात्मक पाया (Moral Foundation)
↳ खाजगी जीवनातील नितीमूल्ये सार्वजनिक जीवनासाठी नैतिक पाया स्वरूपात कार्य करतात.

3) भावनिक बुद्धीमत्ता-
↳ स्वत:च्या व इतरांच्या भावना जाणने व त्यांचे सुयोग्यरित्या व्यवस्थापन करणे शक्य होते.

उदा - कार्यालयीन ठिकाणी वैयक्तिक आयुष्यातील तणाव विसरून कार्य करणे.

4) सातत्य आणि सचोटी-
↳ जो व्यक्ती वैयक्तिक आयुष्यात नितीपूर्ण वर्तन करतो, तो सार्वजनिक आयुष्यातही त्याच नितीमुल्यांच्या आग्रह धरतो.

4) सार्वजनिक आदर & विश्वासार्हता-
↳ खाजगी आयुष्यातील उच्च नितीमुल्ये & विचार असणाऱ्या व्यक्तीकडे समाज आदरपुर्वक आणि मानसन्मानाच्या स्वरूपात पाहतो. याउलट वैयक्तिक नितीमुल्यांचा ऱ्हास झालेल्या व्यक्तीकडे संशयाच्या स्वरूपात पाहिले जाते.

5) हितांचे द्वंद्व-
↳ जेव्हा वैयक्तिक आयुष्यातील घटक सार्वजनिक निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकतात. त्यावेळेस हितांमधील द्वंद्व निर्माण होते. जसे की भाईभतिजावाद (Nepotism), घराणेशाही

6) प्रशासनामध्ये आदर्श ठरणे-
↳ नितीमत्तापुर्ण वर्तवणुकीमुळे प्रशासन व प्रशासनबाह्य व्यक्तींसाठी सदर व्यक्ती संदर्भसमुह म्हणुन कार्य करते.
उदा - तुकाराम मुंडे, अशोक खेमका, श्रीकर परदेशी, नेल्सन मंडेला

# संघ

# सार्वजनिक आणि खाजगी आयुष्यातील द्वंद्व - अनेकदा वैयक्तिक हीत किंवा नितीमुल्ये ही सार्वजनिक जबाबदारी आणि उत्तरदायित्व यांदरम्यान अडथळा निर्माण करते. अशा प्रसंगी व्यक्तीची निष्ठा-भावनिक बंध आणि सार्वजनिक जबाबदाऱ्या यांमध्ये समतोल निर्माण करणे & आवश्यक ठरते किंवा कठीण होते.

1) कौटुंबिक हीत विरूद्ध सार्वजनिक कार्य -

उदा - कंत्राट वाटप, पदभरती, पदोन्नती या अंतर्गत पक्षपाती भुमिका घेणे.

2) राजकीय दबाव विरूद्ध लोकशाही मुल्य -

↳ या अंतर्गत राजकीय नेतृत्वाच्या अनैतिक पुर्तता करत असताना सार्वजनिक आणि लोकशाहीभिमुख मुल्यांचा त्याग करावा लागतो

उदा - चारा घोटाळा.

केस स्टडी - सार्वजनिक वाहनांचा, वाहतुक यंत्रणेचा & सुविधांचा राजकीय नेत्यांद्वारे गैरवापर & त्यास नोकरशाहीची मदत

3) न्यायदानाची प्रक्रिया आणि पारदर्शकता.

↳ अनेकदा न्यायनिवाडा किंवा निर्णय प्रक्रिया पार पाडताना व्यक्तीच्या जवळचे किंवा संबंधीत नातेवाईक अशा न्यायनिवाड्याच्या परिणामी लाभ किंवा वंचितता अनुभवतात अशा वेळी सदर व्यक्तीने / अधिकाऱ्याने या न्यायनिवाड्याच्या प्रक्रियेपासून स्वतःला दूर ठेवणे.

4) भावनिक तटस्थता विरुद्ध भावनिकता -

↳ अधिकारी अथवा व्यक्तीच्या कार्यामध्ये वैयक्तिक भावना अडथळा निर्माण करू शकतात

उदा - पारपंथी, समलैंगिक संबंधातील व्यक्ती यांबाबत वैयक्तिक आयुष्यात नकारात्मक विचार असल्यास सार्वजनिक भूमिकांमध्ये कार्यक्षमता राखली जात नाही.

5) सांस्कृतिक मुल्य विरुद्ध संविधानिक मुल्य -

↳ व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्यातील भाषा, खाद्यसंस्कृती, जातीय संरचना यांवरील मतांचा सार्वजनिक कार्यक्षमतेवर नकारात्मक प्रभाव पडू न देणे

उदा - संविधानिक कलम (350) - (हिंदी भाषेचा प्रसार & प्रचार) या विरुद्ध त्रिभाषा सुत्रास व्यक्तीचा विरोध

6) गोपनियता वि. सार्वजनिक उत्तरदायित्व -

↳ सार्वजनिक व्यवहारामध्ये राष्ट्रीय सुरक्षितता, सार्वजनिक हीत किंवा संशोधनात्मक गोपनियता अनेकदा पाळणे महत्वाचे ठरते, परंतु याच्या गैरफायदा घेऊन भ्रष्टाचार, अनैतिक व्यवहार यांमध्ये वाढ होते - अशा वेळी व्यक्तीसमोर जनतेला उत्तरदायित्व किंवा कार्यालयीन गोपनियता या दोन मुल्यांमध्ये द्वंद्व निर्माण होते.

उदा - DRDO - हनी ट्रॅप प्रकरण

---

# उपरोक्त द्वंद्वासाठी उपलब्ध उदाहरणे.

1) विनोबा भावे यांनी सार्वजनिक हीतासाठी जमिनदारांचे वैयक्तिक हीत डावलून भूदान चळवळ उभी केली, जी पुढे ग्रामदान मध्ये विकसीत झाली

2) मानव-प्राणी संघर्ष याअंतर्गत शेतकऱ्याने केवळ स्वहिताचा विचार न करता संपूर्ण सजीव सृष्टीच्या हिताच्या दृष्टिने, इलेक्ट्रीक कुंपन नाकारून पर्यायी कुंपन व्यवस्थेचा विचार करणे

PRAYAAS

3) अमेरिकेप्रमाणे . अमेरिका First असे स्वयंकेंद्री संकुचित धोरण न बाळगता जर्मनी सारखे विस्थापितांना स्वीकारणार वसुधैव कुटुंबकम केंद्रीत धोरण स्वीकारणे

4) शुटींगच्या सेटवर दिग्गज कलाकारांनी योग्य वेळेमध्ये पोहचणे या अंतर्गत वैयक्तिक सुविधा, वैयक्तिक जीवन यांपलिकडे संपूर्ण समुहाच्या विचार समाविष्ट करणे आवश्यक आहे

---

*) द्वंद्व निर्माण होण्यामागे उर्वरीत कारणे -

7) प्रशासकीय धोरण अथवा संरचना यांबाबत स्पष्टता नसणे.
↳ अधिकाऱ्यांना त्यांच्या अधिकार क्षेत्रामध्ये असणाऱ्या भुमिका & कार्य यांची जाणिव नसणे

8) अधिकारी किंवा व्यक्ती यांच्या वैयक्तिक आयुष्यातील विचारधारा आणि दृष्टिकोन यांचा नकारात्मक परिणाम

आपण कोण आहोत हे न सांगता केलेली कृती

9) नागरी सेवकाची अनामिकता-
↳ अधिकारी आपल्या अधिकार क्षेत्रातील कार्य हे वैयक्तिक प्रसिद्धीसाठी नव्हे. तर सार्वजनिक जबाबदारीच्या स्वरूपात करणे अपेक्षित आहे अन्यथा राजकीय नेतृत्व आणि सदर अधिकारी यांदरम्यान श्रेयवादाची चढाओढ होऊ शकते.

10) नियम आधारित वि. कार्य आधारित भुमिका-
उदा -) मिशन कर्मयोगी

→) एखादी व्यक्ती एखाद्या शासकीय योजनेच्या अंतर्गत पात्र असू शकते परंतु काही किरकोळ कागदपत्रांची पुर्तता न करू शकल्याने सदर योजना नाकारली जाते.

↳ नियम वि. जनहित
↳ लोकशाही दृष्टिकोन / वृत्ती वि. नोकरशाही दृष्टिकोन / वृत्ती

3) अमेरिकेप्रमाणे अमेरिका First असे स्वयंकेंद्री संकुचित धोरण न बाळगता जर्मनी सारखे विस्थापितांना स्वीकारणारे वसुधैव कुटुंबकम केंद्रीत धोरण स्वीकारणे

4) शुटींगच्या सेटवर दिग्गज कलाकारांनी योग्य वेळेमध्ये पोहचणे या अंतर्गत वैयक्तिक सुविधा, वैयक्तिक जीवन यांपलिकडे संपूर्ण समुहाच्या विचार समाविष्ट करणे आवश्यक आहे

---

# ➤ द्वंद्व निर्माण होण्यामागे उर्वरीत कारणे -

7) प्रशासकीय धोरण अथवा संरचना यांबाबत स्पष्टता नसणे.
↳ अधिकाऱ्यांना त्यांच्या अधिकार क्षेत्रामध्ये असणाऱ्या भुमिका व कार्य यांची जाणीव नसणे

8) अधिकारी किंवा व्यक्ती यांच्या वैयक्तिक आयुष्यातील विचारधारा आणि दृष्टिकोन यांचा नकारात्मक परिणाम

(आपण कोण आहोत हे न सांगता केलेली कृती)

9) नागरी सेवकाची अनामिकता-
↳ अधिकारी आपल्या अधिकार क्षेत्रातील कार्य हे वैयक्तिक प्रसिद्धीसाठी नव्हे, तर सार्वजनिक जबाबदारींच्या स्वरूपात करणे अपेक्षित आहे अन्यथा राजकीय नेतृत्व आणि सदर अधिकारी यांदरम्यान श्रेयवादाची चढाओढ होऊ शकते.

10) नियम आधारित वि. कार्य आधारित भुमिका -
(उपा) → मिशन कर्मयोगी
→ एखादी व्यक्ती एखाद्या शासकीय योजनेच्या अंतर्गत पात्र असू शकते परंतु काही किरकोळ कागदपत्रांची पुर्तता न करू शकल्याने सदर योजना नाकारली जाते.
↳ नियम वि. जनहित
↳ लोकशाही दृष्टिकोन / वृत्ती वि. नोकरशाही दृष्टिकोन / वृत्ती

PRAYAAS

ii) वैयक्तिक हितापेक्षा संस्थेच्या हिताला महत्व देणे.

उदा - कोविड काळामध्ये प्रशासनाच्या भुमिकेला केंद्रस्थानी ठेवून अधिकाऱ्यांद्वारे केलेले कार्य

# सार्वजनिक & वैयक्तिक आयुष्याच्या द्वंद्वातून बाहेर पडण्याचे मार्ग.

1) पारदर्शकता आणि खुलेपणा.

↳ i) कार्यालयीन कामकाजावेळी वैयक्तिक हीत उघड & स्पष्ट ठेवणे

ii) वैयक्तिक द्वंद्वांची किंवा अपेक्षित द्वंद्वांची यादी निर्माण करणे

iii) संस्थे अंतर्गत खुल्या स्वरूपाचे वातावरण निर्माण करणे.

उदा - अधिकाऱ्याद्वारे स्वतःची मालमत्ता जाहिर करणे (नेत्यांद्वारे निवडणुकीदरम्यान उघडी केली जाणारी संपत्ती)

iv) न्यायनिवाडा अथवा निवड प्रक्रीयेपासून तटस्थ राहणे (एखाद्या विशिष्ट बाजूला पाठिंबा न देणे / कोणत्याही वादात हस्तक्षेप न करणे)

↳ याअंतर्गत वैयक्तिक कुटूंबातील अथवा ओळखीच्या व्यक्तीच्या न्यायालयीन खटला किंवा निवडप्रक्रीयेतून स्वतःला दूर ठेवणे

2) संस्थात्मक स्थरावरील उपाय

i) नैतिक समित्यांची निर्मिती करणे

ii) लोकपाल किंवा लोकआयुक्त नियुक्ती / स्थापन करणे / निरीक्षण समित्याची. यासोबत भरारी पथक नेमणे

iii) आचारसंहिता आणि नैतिक संहितेची निर्मिती करणे.

3) प्रशिक्षण आणि जागृकता निर्माण करणे.

i) व्यक्तीसाठी संवेदनशील कार्यशाला अथवा जबासना / प्रशासन च्या स्थरतीवरील प्रशिक्षण यंत्रणा निर्माण करणे.

ii) व्हिसलब्लोअर संरक्षण यंत्रणा निर्माण करणे.

# नैतिक द्वंद्व सोडविण्याचे टप्पे -

1) नैतिक द्वंद्व ओळखणे अ- याअंतर्गत द्वंद्वात्मक मुल्यांची नोंद करणे.

2) माहितीचे संकलन करणे - कोणताही निर्णय घेण्याआधी सदर निर्णयाशी संलग्नीत आपेक्षित माहिती तसेच पुर्वग्रह टाळण्यासाठी उपयुक्त लेखाजोखा सोबत बाळगणे
माहितीची अचुक, क्रमवार & तपशीलवार नोंद

3) माहितीच्या आधारे पर्यायांचे मुल्यांकन करणे -
↳ याअंतर्गत नितीशास्त्राच्या विविध मुल्यांचा जसे की कर्तव्यवादी नितीशास्त्र, उपयुक्ततावादी नितीशास्त्र, व्यवहारवादी नितिशास्त्र यांचा पर्यायांच्या मुल्यांकनासाठी वापर करणे.

4) सल्लामसलत करणे -
↳ वरीष्ठ, कार्यालयीन सहकारी किंवा विषयतज्ज्ञ यांच्याकडुन सदर विषयावरील निर्णयाबाबतचे मार्गदर्शन घेणे.

5) निर्णय घेणे & निर्णयाची सर्वस्वी जबाबदारी स्वीकारणे -
↳ ~~अश~~ याअंतर्गत निर्णयाचे परिणाम & निर्णयाचे पाठबळ उभे करणे ही सर्वस्वी सदर अधिकाऱ्याची जबाबदारी असेल

6) निर्णयावरील प्रतिक्रीया नोंदवणे किंवा परीणामांचा आढावा घेणे

# शासकीय आणि अशासकीय पुढाकार

1) Art of Living ची कार्यशाळा
2) ~~विपक्ष~~ विपश्यना
3) ईशा Foundation चे शासकीय प्रशिक्षण यंत्रणासोबतचे कार्य
4) संयुक्त राष्ट्र भ्रष्टाचार विरोधी करार, 2003
5) दुसरा प्रशासकीय आयोग, 2009

6) लोकपाल आणि लोकआयुक्त

7) Integraty Pack

8) व्हिसलब्लोअर संरक्षण कायदा

9) जपानचे नितीशास्त्र मंडळ

10) ब्राझीलचे ट्रस्ट आणि इंटिग्रेटी धोरण

11) स्वीत्झरलॅंडमधीलआराउ शहरातील अर्थसंकल्पामध्ये जनसहभागाची भुमिका

12) जागतिक आरोग्य संघटना -(WHO)- Workplace Well being framework.

# मानवी मुल्ये (Human values)

"यशस्वी व्यक्ती होण्यापेक्षा, मुल्यवान व्यक्ती होण्याचा प्रयत्न करा"
- आईनस्टाईन

मुल्य

1) मानवी मुल्य

2) आर्थिक मुल्य
(↳ किंमत)
(व्यावसायिक मुल्य)

व्यक्ती सापेक्ष
3) व्यक्तीचे मुल्य/ अस्तित्वाचे मुल्य
↳ भावनिक मुल्य

व्याख्या

↳ मानवी मुल्ये ही मूलभूत मार्गदर्शक तत्वे किंवा असा विश्वास आहे जो व्यक्तीच्या वर्तवणुकीला, संबंधांना आणि निर्णय प्रक्रियेला प्रभावित करतो.

+ve ← मानवी मुल्ये → -ve

| +ve | -ve |
|---|---|
| - दया | - लोभ |
| - करुणा | - राग |
| - प्रेम | - द्वेष |
| - अहिंसा | - तिरस्कार |
| - शांतता | - हिंसा |

# मानवी मुल्यांचे आधार / स्त्रोत -

* मानवी मुल्यांचे वर्गीकरण
* मुल्यांच्या स्वरूपानुसार मुल्यांचे वर्गीकरण

1) नैतिक मुल्य -

↳ व्यक्तीला आयुष्यात योग्य - अयोग्य निर्णय घेणे यांमध्ये निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शक ठरणारी मुल्ये म्हणजेच मानवी नैतिक मुल्ये हो

## I) प्रामाणिकपणा (Honesty)

" विवेकाच्या पुस्तकातील पहिला धडा हा प्रामाणिकपणाचा आहे"
– थॉमस जेफर्सन

• Wisdom – शहाणपणा

**व्याख्या**

↳ प्रामाणिकपणा म्हणजे व्यक्तीची अशी वैशिष्ट्ये ज्या अंतर्गत खरेपणा पारदर्शकता आणि निष्पक्षता त्याच्या बोलण्यातून, विचारातून आणि कृतीतून स्पष्ट होते

### # पार्श्वभूमी / सिद्धांत / माहिती -

i) कर्तव्य आधारीत नितिशास्त्र - याअंतर्गत खरे बोलणे हे मानवाचे मूलभूत कर्तव्य आहे.

ii) ॲरिस्टोटल - मानवाच्या चारित्र्यातील प्रामाणिकपणा हा महत्वाचा रत्न / घटक आहे

### # उपघटक

↳ i) खरे बोलणे / विश्वासार्हता - कोणताही जबाब किंवा कथन हे पुराव्यांआधारे किंवा सत्यता पडताळून करणे

ii) पारदर्शकता -

↳ निर्णय, विचार आणि बोलण्यातील स्पष्टता, कोणतेही छुपे उद्दीष्ट न ठेवता कृती करणे

iii) सातत्य

↳ वागणे आणि बोलणे यामधील सातत्य

iv) धैर्य -

↳ कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता सत्यासाठी संघर्ष करणे

PRAYAAS

उदाहरणे

1) कर्णाने मैत्रीसाठी दाखवलेला प्रामाणिकपणा - दुर्योधन
2) T.N. शेषन यांनी निवडणूक आयुक्त म्हणून राजकीय दबावाविरोधी केलेले कार्य
3) महात्मा गांधीजींचा सत्य या मूल्याप्रतीचा प्रामाणिकपणा

# महत्त्व

1) व्यक्तीचा स्वाभिमान आणि नैतिक क्षमता वृद्धिंगीत होते.
2) मानवी संबंधांमध्ये विश्वास निर्माण होतो.
3) व्यक्तीला मानसशास्त्रीयदृष्ट्या शांतता आणि स्थैर्य प्राप्त होते.
4) प्रशासनाबाबतची जनमानसातील प्रतिमा सुधारते तसेच अधिकृतता वाढते
5) प्रशासनामध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व अशा मुल्यांचा अंतर्भाव (समाविष्ट) होतो.
6) सत्तेचा दुरूपयोग आणि भ्रष्टाचार यांवर नियंत्रण साधता येते
7) निर्णयप्रक्रीया अधिक व्यापक आणि नियमांना धरून अधिकृत केली जाते.

# ऱ्हास झाल्यास परिणाम -

1) भ्रष्टाचार आणि भाईभतीजावाद यांसारख्या घटकांत वाढ होईल (क्रोनी भांडवलवाद)
2) जनमानसांचा सदर व्यवस्थेवरील विश्वास ढासळेल.
3) राजकीय सत्ता, प्रसार माध्यम आणि प्रशासन यांची नैतिक पातळी ढासळणे उदा - Paid News, राजकीय पक्षांचा घोडेबाजार सातत्याने होणारे पक्षांतरण
4) राजकीय धोरणांमध्ये सातत्य आणि विचारधारांचा अभाव जाणवतो जसे की आकडेवारीमध्ये फेरफार करणे, चुकीचे अहवाल प्रासिद्ध करणे

# पुढाकार (Initiative) आणि उपाय -

1) RTI, 2005 - (माहितीचा अधिकार, 2005)

2) लोकपाल - लोकायुक्त कायदा, 2013 - सदर कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आणि सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणे.

3) व्यावसायिक स्तरावर - व्यावसायिक नैतिक संहिता मार्गदर्शिकाच्या स्वरूपात कार्य करू शकते

[उदा] - SEBI मार्गदर्शक तत्वे

4) नैतिक प्रशिक्षण - Infosys, TCS यांद्वारे नैतिक नेतृत्व प्रशिक्षण

## #) सचोटी - (Integrity) - सत्यनिष्ठा / एकनिष्ठा




" जेव्हा कोणी आपल्याला पाहत नाही हे माहित असतानाही योग्य कृती करणे म्हणजे सचोटी होय" - C.S. Levis

• व्याख्या

↳ कृतीचे मुल्यांकन केले जात आहे की नाही याचा विचार न करता योग्य कृती करणे याला सचोटीने केलेले कार्य म्हणतात

" ज्ञानाविना असणारी सचोटी कमकुवत व निरोपयोगी आहे, परंतु सचोटीविना असणारे ज्ञान हे अधिक धोकादायक आहे"

# उपघटक -

i) सातत्य -

↳ बहुभिन्न स्थितीमध्ये (वेगवेगळ्या परिस्थितींमध्ये) समान नैतिक मुल्यासाठी समान स्वरूपात कृती करणे.

ii) नैतिक धैर्य -

↳ योग्य मुल्यांसाठी अडथळा किंवा विरोधाचा सामना करणे.

iii) पारदर्शक -

↳ व्यक्तीच्या हेतूमध्ये आणि कृतीमध्ये पारदर्शकता असणे आवश्यक आहे.

# उदाहरणे

1) एकलव्य - याने द्रोणाचार्यांना केवळ गुरू मानले नाही; तर कृतीमध्येही ते आचरणात परिवर्तित केले.

2) कवी कलश - संभाजीमहाराजांसाठी त्यांचे योगदान

3) रमेश घोलक - छत्रा जिल्हा झारखंड येथे स्वातंत्र्यानंतर सर्वप्रथम यशस्वीरित्या निवडणूक राबवली

4) ई श्रीधरण - दिल्ली मेट्रोचे कार्य करताना कार्यातील सचोटी, सातत्य आणि प्रामाणिकपणा यांमुळे स्वतःची मेट्रो मॅन अशी ओळख निर्माण केली.

5) सरदार वल्लभभाई पटेल - भारताच्या एकीकरणामध्ये भूमिका

# सचोटीचे महत्त्व -

1) सचोटी व्यक्तीचे नैतिक दुहेरी स्वरूप टाळते. याचाच अर्थ व्यक्ती वैयक्तिक आणि सार्वजनिक आयुष्यात समान मूल्यांप्रती समान भूमिका दाखवतो / दर्शवितो (नितीमूल्य सातत्य :) Moral consistency)

2) व्यक्तीचे निर्णय हे वैयक्तिक भूमिकेतून नसून पदाच्या गरिमेनुसार आणि नियमानुसार होतील.

3) जनसामान्यांचा व्यवस्थेबाबतचा विश्वास वाढेल

4) नैतिक नेतृत्व निर्मितीसाठी व्यक्ती आदर्श प्रतिमा ठरेल.

5) नोकरशाही अंतर्गत नैतिक धैर्याची निर्मिती होईल.

उदा - अशोक खेमका - वारंवार होणाऱ्या बदल्यांनंतरही नैतिक मूल्यांप्रती असणारी सचोटी

PRAYAAS

6) व्यक्तीच्या निवडप्रक्रीयेमध्ये आणि कार्यप्रक्रीयेमध्ये न्यायिक मुल्यांचा समावेश होईल

# सदर मुल्याचा ऱ्हास झाल्यानंतर निर्माण

1) लोकांचा विश्वास कमकुवत होईल. उदा.- 2G स्पेक्ट्रम घोटाळा, चारा घोटाळा यांमुळे प्रशासनाबाबत नागरिकांची नकारात्मक भुमिका

2) राजकीय स्वार्थी स्तुप्त हेतूंमध्ये वाढ होईल, जसे की कॉर्पोरेट लॉबी, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, जातीचे राजकारण

3) भ्रष्टाचाराचे सांस्कृतिकिकरण - "चलता है" दृष्टिकोन, टेबलाखालून लक्ष्मीदर्शन, चहापाणी

4) विवेकाधारीत निर्णयांमध्ये व्यक्ती सापेक्ष भ्रष्ट विचारांचा अंतर्भाव
उदा - कोविड काळातील भ्रष्टाचार किंवा आर्थिक गैरव्यवहार

5) जेव्हा प्रशासनातील सचोटी नष्ट होते, तेव्हा अल्पकालीन स्वहीतासाठी दीर्घकालीन समाजहीत डावलले जाते.

c> "न्याय म्हणजे प्रत्येक व्यक्तिला त्याचा योग्य हक्क मिळेल ही सततची आणि अढळ इच्छा" - अल्पियन

III) न्यायिकता (Fairness) ⟷ पक्षपातविरहीतता म्हणजे Non-Partisionship
↳(न्यायिकता / न्यायपुर्ण वागणुक) (राजकीय संदर्भात वापरली जाणारी संकल्पना)

" निष्पक्षता म्हणजे केवळ समानता नव्हे, तर व्यक्तीच्या गरजेनुसार त्यास आवश्यक असणाऱ्या घटकांचा पुरवठा यामध्ये समाविष्ठ असतो " - शेक Riordan

| Fairness (न्यायिकता) | Impartiality (निष्पक्षता) | Non-Partisionship (पक्षपातविरहीत) |
|---|---|---|
| ↳ केवळ न्याय नव्हे, तर व्यक्तीसाठी पुरक असलेला न्याय करणे व अशावेळी इतरांवर अन्याय न करणे<br>उदा - भा. सकारात्मक आरक्षण धोरण | ↳ कोणत्याही दोन घटकांमध्ये भेदभाव अथवा दुजाभाव न करता समान स्वरूपात उपभोगांची अथवा सुविधांची विभागणी करणे.<br>उदा - दोन भावांमध्ये जमिनीची समान विभागणी. | ↳ प्रशासनात कार्य करत असताना कोणत्याही राजकीय विचारधारेने प्रभावित न होता किंवा स्वतःची राजकीय विचारधारा उघड न करता कार्य करणे. |

# सिद्धांत / पार्श्वभूमी

१) ॲरिस्टोटलची वितरणात्मक न्यायाची भुमिका (Distributive Justic)
→ समानांप्रती समान आणि असमानांप्रती असमान भुमिका बाळगणे

२) जॉन रॉल्स यांची न्यायाची भुमिका - या अंतर्गत संस्थात्मक स्तरावर संधीची समानता उपलब्ध होणे आवश्यक मानले गेले आहे.

# मुलभूत घटक - न्यायिकता:

१) कोणत्याही व्यक्तीच्या, संस्थेच्या बाबतीत दुजाभाव न होणे
२) लोकांना त्यांच्या गरजेनुसार आणि स्थितीनुसार घटकांचा पुरवठा करणे.
३) कायदेशीर आणि नैतिक मूलतत्त्वांना दृढ करणे
४) व्यवस्थेची खुल्या स्वरूपातील पुनर्रपडताळणी
५) तुमच्या निर्णयामध्ये सातत्य असले पाहिजेत

# उदाहरणे

१) अन्नधान्य वितरण व्यवस्था (PDS) - Public Distribution System
२) समान परंतू भिन्न जबाबदारीचे तत्व (संयुक्त राष्ट्र पर्यावरण परिषदेचे तत्व) - (पॅरिस शिखर परिषद)

# न्यायिकतेचे महत्व -

१) न्यायपुर्ण वातावरणामुळे समाजामध्ये संघर्ष कमी होऊन सहकार्यात वाढ होते - उदा - दक्षिण - दक्षिण सहकार्य
२) न्यायिकता भावनिकतेच्या पलीकडे जाऊन समाज मूल्यांकनाची संधी उपलब्ध करते.

3) प्रक्रियेतील न्यायपूर्णता आबाधित राहते
• योग्य पदनियुक्ती, योग्य पदोन्नती, योग्य निर्णयप्रक्रिया

# न्यायिकता नसेल तर निर्माण होणाऱ्या समस्या -

1) संस्थात्मक भेदभाव - कायद्याची निवडक अंमलबजावणी धर्म, जात, लिंग अथवा व्यक्तिगत यांदरम्यान तणाव निर्माण करतात

2) नेपोटीझम (भाईभतीजावाद)

3) कल्याणकारी योजना, वोट बँक च्या राजकारणाने प्रभावित होतात

4) नागरीकांचा व्यवस्थेवरील विश्वास उडतो

8 10 ते 6 8

# उपायात्मक घटक -

1) समानतेचा मुलभूत अधिकार - कलम 14-18

2) VIPRO & INFOSIS या कंपन्यांदरम्यान निष्प. निर्णय मुल्यांकण यंत्रणा

IN)
# निस्वार्थता (selflessness) -

" निस्वार्थता म्हणजे असे नैतिक मुल्य ज्याअंतर्गत वैयक्तिक हितापेक्षा सार्वजनिक हित महत्वाचे मानले जाते आणि कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता केलेले कार्य याअंतर्गत समाविष्ट होते "

" स्वतःला शोधण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे इतरांच्या सेवेत स्वतःला समर्पित करणे"। - गांधीजी

" जे जीवन इतरांसाठी नाही ते जीवनच नाही - मदर तेरेसा

"स्वत: आधी जनसेवा" - भारतीय प्रशासकीय सेवा

# प्रशासकीय यंत्रणेतील महत्त्व -




1) आपत्ती व्यवस्थापन

↳ वैयक्तिक सुरक्षेचा & गरजांचा त्याग करून आपत्ती प्रभावित भागामध्ये सेवा बजावणे.

2) दिलेल्या प्रशासकीय योगदानाबाबत / कार्याबाबत कोणतीही अनामत रक्कम, अघोषित मोबदला न स्वीकारणे

3) वैयक्तिक दिनचर्या, कौटुंबिक आयुष्य यांमध्ये तडजोड करून ~~काम~~ वेळप्रसंगी कार्यालयीन वेळ वाढवणे

उदा - मानजी द मांऊटन मॅन, (आमस्ट्रॉग पामे - ईशान्य भारतामध्ये 100 किमी रस्ता नागरी सहभाग & स्वखर्चाने निर्माण केला)

v) # अभियोग्यता (Probity) - (एखादे कार्य प्रभावी, योग्य & दर्जेदार पद्धतीने करण्याची क्षमता, पात्रता, कौशल्य & तयारी)

↳ प्रशासना अंतर्गत कार्यामध्ये सर्वोच्च सत्यनिष्ठा अथवा सचोटी, योग्यता आणि नैतिकतेचा शिस्तबद्ध अवलंब जे नितीशास्त्रा-अंतर्गत त्रिकालबाधित मानले जाऊ शकते. (काळ बदलला तरी स्थिर राहते.) (जे मूलभूत तत्त्व आहे)

(Quote)

" अमेरिकन संविधानाचे मूलभूत तत्त्व - जनकार्यालय हा जनविश्वास आहे."

" सुशासनाचा खरा आत्मा हा अभियोग्यतेत आहे"

# अभियोग्यतेचे प्रशासनातील वापर / महत्त्व.

1) अधिग्रहण - कोणत्याही शासकीय कंत्राटा अंतर्गत फेरफार न करणे आणि योग्यतेच्या आधारावर लिलाव पार पाडणे

↳ याअंतर्गत निवड प्रक्रिया ही दर्जानिहाय्य स्वरूपाची असते.




2) नोंद करणे - या अंतर्गत प्रशासकीय पदावरून घेतलेल्या निर्णयांची, त्यासाठी मार्गदर्शक ठरलेल्या घटकांची अराजकीय स्वरूपात नोंद करणे.

# उदाहरणे -

1) हरित क्रांती - M.N. स्वामीनाथन

2) शुभ्रा क्रांती - वर्गीस कुरीयन (धवल क्रांती)

3) A.P.J. अब्दुल कलाम - वैज्ञानिक कार्य

4) मेट्रो मॅन - ई.श्रीधरण

5) माणिक सरकार - त्रिपुराचे माजी मुख्यमंत्री

VI)

# विश्वास - Truth / Faith / Trust - (सत्य) -

" सत्य म्हणजे घटकात्मक वैधता, शब्दांमधील पारदर्शकता, कागदपत्रांमधील विश्वासार्हता आणि जनसंवादामधील स्पष्टता"

(Quote)

1) " सत्यमेव जयते "

2) "यतो धर्मस्ततो जया" - जिथे सत्य आहे तिथे विजय आहे

## * प्रशासनातील सत्याचे महत्त्व -

1) माहितीच्या (RTI) अधिकाराअंतर्गत प्रशासनातील पूर्ण माहिती कोणताही फेरबदल न करता पुरवणे

2) चौकशी समितींच्या अहवाला अंतर्गत प्रक्रियेची योग्यता राखणे

3) अहवाल निर्मिती – अधिकाऱ्यांद्वारे प्रशासकीय पदावरून अथवा समिती अध्यक्ष पदावरून निर्माण केलेले स्पष्ट, पारदर्शक & वस्तुनिष्ठ अहवाल

4) जनसंबोधन (Public Statement) - जनतेला एखादी घटना, एखादा प्रकल्प यांबाबत योग्य आणि कालाधीत (वेळेनुसार) माहिती उपलब्ध करणे.

उदा - नक्षलभागातील जिल्हाधिकाऱ्यांचे कार्य *

VII)

## # कार्यक्षमता / योग्यता (Competency)

" कार्यक्षमता म्हणजे व्यक्तीच्या प्रशासकीय कार्यामधील आणि भूमिकेमधील आवश्यक ज्ञान, कौशल्य & मेहनत यांचा सुवर्णमध्य होय "




(Quote)

" सर्वसाधारण गोष्टी असाधारणपणे करणे म्हणजे योग्यता होय "

- जॉन गार्डनर

PRAYAAS

# प्रशासनातील वापर /महत्त्व - ☆

1) अर्थसंकल्पनिर्मिती अंतर्गत वित्तिय स्वरूपातील उच्च न्याय ज्ञान वितरणात्मक न्याय साध्य करते."

[उदा] - गोपाळकृष्ण गोखले

2) शहर व्यवस्थापन - या अंतर्गत शहरी सुविधांच & व्यवस्थांच्या ज्ञान असणे आणि त्यानुसार आराखडा निर्माण करणे आवश्यक मानले जाते.




3) डिजिटल गव्हर्नन्स - (ई-प्रशासन)

↳ सॉफ्ट स्किल्स, तंत्रज्ञानाचे ज्ञान

↳ सुशासन निर्मितीत यश

[उदा] -

1) ई श्रीधरण - मेट्रो मॅन

2) सचिन तेंडूलकर - क्रिकेट

3) झाकिर हुसेन - तबला वाजवणे

VIII)

# वस्तुनिष्ठता (objectivity) -

" वस्तुनिष्ठता म्हणजे तथ्य, नियम आणि पुरावे यांच्या आधारावर भावनिक भेदभाव न करता घेतलेला निर्णय प्रशासनातील वस्तुनिष्ठता होय"

(Quote)

↳ "व्यावसायिकतेचा मूलभूत आधार वस्तुनिष्ठता आहे"

# प्रशासनातील वापर /महत्त्व -

1) भुमि अधिग्रहणाची प्रक्रिया- अराजकीय आणि वैज्ञानिक मूल्यांचा आंतर्भाव करून करणे.

वस्तुनिष्ठता - प्रभावी निर्णय, पारदर्शकता, जबाबदारी, निःपक्षता

2) एखाद्याची बदली करणे.

उदा

1) तुकाराम मुंडे
2) 1991 चे • खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचे धोरण
3) सेन्सॉर बोर्ड अं० अंतर्गत प्रमाणपत्र वितरण करणे

# अनामिकत्व (Anonymity) - अज्ञात, स्वतःची ओळख न उघड करता एखादे कार्य करणे

" अनामिकत्व म्हणजे संस्था अथवा शासकीय स्तरावरून कार्य करताना तटस्थ आणि अदृश्य स्वरूपातील भुमिका निभावणे आणि हे करताना श्रेयवादाचा अट्टहास न बाळगणे."

Quote

" तुमच्या कार्याने बोलले पाहिजेत तुम्ही नव्हे"

" नागरी सेवा ही संस्था आहे व्यक्ती नव्हे"

उदा # व्हिसलब्लोअर

# प्रशासकीय महत्त्व / वापर -

1) प्रसारमाध्यमांमधील चमकुगीरी टाळणे

उदा - वैयक्तिक मुलाखती किंवा वैयक्तिक यश यांवर भाष्य करणे

2) कार्यालयीन कामकाज - कागदपत्रांवर सह्या करणे म्हणजे ब्रँडींग नव्हे

PRAYAAS

3) राजकीय कार्यक्रम किंवा निवडणूक यांमध्ये वैयक्तिक सहभाग टाळणे.

# करुणा (compassion) :

i) # दया (Pity) - एखाद्या व्यक्तीच्या समस्येचे दुरून निरीक्षण करणे. या अंतर्गत अधिकाऱ्याला भावनिक बंध आणि मदतीची इच्छा अपेक्षित नसते.

उदा- किती वाईट हे आयुष्य! → भिकारी

ii) # सहानुभूती (Sympathy) -

↳ एखाद्या व्यक्तीच्या त्रासदायक परिस्थितीला ओळखणे आणि त्याबद्दल चिंता व्यक्त करणे. या अंतर्गत तुम्ही चिंताजन्य किंवा दिलासादायक शब्द वापरता परंतु पूर्णपणे भावनिकदृष्ट्या या अंतर्गत समाविष्ट नसता

iii) # समानानुभूती (Empathy) -

↳ याअंतर्गत व्यक्ती स्वतःला इतरांच्या ठिकाणी स्थानापन्न करून समस्येचे अथवा वेदनेचे आकलन करतो. (इतरांच्या भावना जशाच्या तशा जाणणे यात अनिवार्य आहे)

iv) # करुणा (Compassion) -

↳ तुम्ही व्यक्तीच्या वेदना जाणता त्याच्याशी भावनिक बंध निर्माण करता आणि त्या वेदनांचे निराकरण करण्याचे प्रयत्न सुद्धा करता.

" जिथे शक्य आहे तिथे करुणा दर्शवा आणि हे कायमच शक्य आहे " - दलाई लामा.

# प्रशासनातील महत्त्व
— अल्पसंख्यांकाना योग्य न्याय
— स्त्रियांचे संरक्षण
— प्राणीमांत्रावर दया

i) बालसंरक्षण कायद्यांची हाताळणी - यात लैंगिक हिंसाचार, बालकामगार तसेच बालमनोविकार यांचा समावेश होता.

4) कारागृह कैद्यांप्रती समानानुभूती ठेवून तसेच कारागृह चे स्वरूप हे सुधारगृहांमध्ये रूपांतर करणे

उदा - दिल्ली तिहार जेल - UP.

उदा - डॉ. के. विजयकुमार - नक्षलप्रवण क्षेत्रामध्ये आदिवासी आणि नक्षलवाद्यांच्या पुनर्वसनासाठी महत्त्वाची भूमिका

- कंपॅशिनेट कोझीकोडे - IAS Prasant Nair
  - भूक निर्मूलन या व्यापक विषयाअंतर्गत चालवलेली मोहिम

14) # पारदर्शकता (Transperency) -

- पारदर्शकता ही नैतिक बंधनाचे असे स्वरूप आहे ज्या अंतर्गत निर्णय प्रक्रिया आणि कृती या खुल्या, पडताळण्यायोग्य & दृश्यनिय स्वरूपात सामान्य जनतेला उपलब्ध असणे अनिवार्य मानले जाते.

"पारदर्शकता अधिकृततेला जन्म देते" - जे. मॅक्सवेल

15) # सहिष्णुता (Tolerence) -

- सहिष्णुता म्हणजे इतरांचे वैविध्यपूर्ण विचार, संस्कृती आणि वर्तन यांना स्विकारण्याची तयारी दर्शविते आणि यादरम्यान संघर्ष टाळते.

तुझे मत मला पटत नाही, परंतु तुझे मत मांडण्याच्या अधिकाराचे मी मरेपर्यंत रक्षण करेन - व्हॉल्टेअर

- भारतीय संविधानाच्या मूलभूत मूल्यांमधील धर्मनिरपेक्षता हे तत्व सहिष्णूतेतून निर्माण झाले आहे.

या सोबतच
- गांधीजींचे सर्वधर्म समभाव
- अकबराचे सुल-ए-कुल & दिन-ए-इलाही
- अशोकाचे धम्म

# प्रशासकीय महत्व - 
- लोकशाही मुल्यांचे जतन
- संघर्ष व्यवस्थापन

1) जनसंवाद :- नागरिकांच्या द्वेषाच्या, समस्यांचा आणि असंतोषाच्या सामना करण्याची क्षमता

2) सामुहिक हिंसाचार हाताळणी - दंगली हाताळण्यासाठी उपयोगी

3) शासकीय समितींच्या इतर सदस्यांच्या विचारांचा & मतांचा स्वीकार करणे.
- सेवाभावी प्रशासन - Citizen centric Govt. पाया
- टीम व्यवस्थापन

16)
# उत्तरदायित्व (Accountability) -

↳ उत्तरदायित्व म्हणजे कार्यालयीन स्तरावर सार्वजनिक सेवेतील अधिकारी त्यांचे निर्णय, कृती आणि परिणाम यांप्रती जनतेला उत्तर देण्यास बांधिल असतात.

"उत्तरदायित्व विरहीत नोकरशाही ही फ्रॅंकनस्टेन यांच्या राक्षसाप्रमाणे आहे" - मॅक्स वेबर

* प्रशासनातील महत्व / सकारात्मक वापर -

1) पर्यावरण प्रभाव मुल्यांकन

2) अनियंत्रित सत्तेवरील निर्बंध.

17)
# जबाबदारी (Responsibility) -

↳ जबाबदारी ही कर्तव्यआधारीत नितीशास्त्राचा आयाम आहे & या अंतर्गत एखादी कृती करणे हे नैतिक आणि व्यावसायिक कर्तव्य मानले जाते

"सत्ता ही जबाबदारी घेऊन येते"

* प्रशासनातील महत्व -

1) जिल्हाधिकाऱ्याच्या स्वरूपात नैसर्गिक आपत्तीच्या दरम्यान पुनर्वसन आणि नुकसानभरपाई वेळेत करणे हा जबाबदारीचा भाग आहे

"call beyond duty" - कामाच्या पलीकडे जाऊन कर्तव्य बजावणे

2) प्रशासकीय तक्रार निवारण यंत्रणा

-> नागरीक & संस्था यांच्यात संवाद साधून समस्यांचे निराकरण करण्याची एक प्रक्रिया

15)

# दुरदर्शीपणा (Prudence) - विवेक

↳ दुरदर्शीपणा अंतर्गत भविष्यातील दीर्घकालीन संभाव्य धोक्यांचा, समस्यांचा आणि परिणामांचा विचार करून नियोजन करणे

"दुरदर्शीपणा ही अशी कला आहे ज्यामध्ये योग्य वेळी योग्य गोष्टीची निवड केली जाते"

— भविष्यकालीय व्यय (खर्च) आणि लाभ यांचे आकलन करणे.

* Spirit of service (सेवेची / कार्याची चेतना)

* Devotion to duty (कार्याची समर्पितता ; निष्ठा)

* Workmanship (कारागिरी)

↳ ही नैतिक उत्तरदायित्वाची / वचनबद्धतेची अशी भावना आहे, ज्याअंतर्गत केवळ कार्याची पुर्तता नव्हे तर त्याचे सर्वोच्च प्रमाणिकपणे आणि समर्पित वृत्तीने कार्यपुर्तता करणे अपेक्षित आहे.

# प्रशासनातील वापर -

1) आरोग्य अधिकारी यांनी कोविड काळात निभावलेले कार्य - कोविड योद्धे

उदा - 26/11 हल्ला - समर्पित वृत्ती

महाभारत - निष्काम कर्मयोग



PRAYAAS

## 19) # Rule of Law - कायद्याचे राज्य

↳ कायद्याचे राज्य म्हणजे सर्वांसाठी कायद्याची अंमलबजावणी समान स्वरूपात करणे यासोबतच प्रशासकीय स्तरावरून केलेली अंमलबजावणी ही कायदेशीर, तार्किक आणि नियंत्रित असावी. त्यासोबतच ती अतिरेकी स्वरूपात नसावी.

"जिथे कायदा संपतो, तिथे शोकांतिका सुरू होते" – जॉन लॉक

"कायदा हा राजांचा राजा आहे" – कौटिल्य

### * प्रशासनातील वापर -

1) फौजदारी कायद्यांची संहिता / अंमलबजावणी

## 20) ## कार्यक्षमता (Efficiency) :-

$$\frac{\text{परिणाम}}{\text{व्यय / गुंतवणूक}} = \frac{\text{Output}}{\text{Input}} = \text{Efficiency}$$

[उदा] - रावण हा कार्यक्षम होता, कुशल होता पण नैतिक नव्हता

↳ कार्यक्षम म्हणजे अल्प नुकसानामध्ये आणि कमीत कमी गुंतवणुकीमध्ये सर्वाधिक उत्पन्न निर्माण करण्याची क्षमता होय.

"कार्यक्षमता म्हणजे जे कार्य घडत आहे त्याला अधिक फायदेशिर स्वरूपात करण्याची क्षमता" – पिटर ड्रकर

[उदा] - पारंपारिक प्रशासनाऐवजी ई-प्रशासनाचा अवलंब

2 'ज' - जलद & जनहित साध्य करणे

↳ संजय कुमार IAS - बिहार → ई-ऑफिस (प्रशासनातील दिरंगाई कमी करण्यासाठी)

21) # नेतृत्व (Leadership) -

↳ नेतृत्व क्षमता म्हणजे इतरांना प्रोत्साहित करणे, मार्गदर्शन करणे आणि परिणामी संस्था किंवा संघटना यांचे समान /सामायिक ध्येय प्राप्त करणे.

"नेतृत्व ते असते जे मार्ग जाणते, मार्गाने जाते आणि मार्ग दाखवते" — जॉन. सी. मॅक्सवेल




* प्रशासनातील महत्त्व -

↳ प्रशासकीय स्तरावर आपत्ती व्यवस्थापना दरम्यान प्रशासनाचे ध्येय, धोरणे ठरवणे

22) # शौर्य (Courage) -

↳ ॲरिस्टॉटलच्या सद्गुणाधिष्ठीत नितीशास्त्र याअंतर्गत शौर्य हे मुलभूत मुल्य आहे.

"शौर्य म्हणजे केवळ भिती नसणे नव्हे तर त्या भितीवर मात करणे देखील अपेक्षित आहे"

"शौर्य म्हणजे अशी नैतिकक्षमता किंवा दृढता जी स्वतःच्या मुलभूत तत्वांच्या संरक्षणासाठी दबावांचे सामना करण्याचे धाडस प्रदान करते"

उदा - दुर्गा शक्ती नागपाल यांची वाळू माफिया विरुद्धची कारवाई

# कार्याची गुणवत्ता (Quality of Service) -

23) # Service delivery - सेवेची पुर्तता

↳ कार्याची गुणवत्ता म्हणजे प्रशासकीय सुविधा यांची पुर्तता / पुरवठा हा योग्य वेळेत सर्वसमावेशकपणे, सुलभतेने, सर्वोच्च दर्जाने आणि नागरीकेंद्रीत स्वरूपात पुरवणे होय.

"मानवाची सेवा हीच ईश्वरसेवा आहे" – स्वामी विवेकानंद

उदा - प्रशासनाअंतर्गत सिंगल विंडो (single window) व्यवस्था राबवून जलद आणि कार्यक्षम पद्धतीने कार्याची पुर्तता करणे

24) # संविधानिक नैतिकता (Constitutional Morality) -

↳ संविधानिक नैतिकता म्हणजेच अशी मुलतत्त्वे किंवा नियम ज्यांचा अवलंब संविधानिक मुल्यांना किंवा घटकांना अनुसरून केला जातो. या सोबतच सदर अवलंब संविधानाच्या अलिखित अन्वयार्थाशी समन्वय साधतो. ज्याचा अवलंब प्रशासकीय यंत्रणा तसेच सामान्य नागरीक या दोघांद्वारे होणे अपेक्षित आहे.

"संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नाही तर एक जीवन-वाहिनी आहे." – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

उदा - IAS कन्नन गोपीनाथ यांनी संविधानिक मुल्यांचा ऱ्हास होत असल्याने त्याच्या निषेधार्त राजीनामा दिला आहे

25) # दयाभाव - (Kindness) - (दयाळूपणा) / (ममत्व)

↳ दयाभाव म्हणजे अशी नितीमत्ता ज्या अंतर्गत करूणेचा अंतर्भाव होतो. इतरांसाठी अपेक्षाविरहीत कार्य केले जाते ज्याच्या सर्वसाधारण परिपेक्ष इतरांच्या कल्याणामध्ये, सामाजिक संवर्धनामध्ये होतो

" भुला परस्पर पडो मैत्र जीवांचे" –

" दयाभाव ही अशी भाषा आहे जी बहिरा व्यक्ती सुद्धा ऐकू शकतो आणि अंध व्यक्ती पाहू ही शकतो " – मार्क ट्वेन

" जो जे वांछिल, तो ते लाहो "

* प्रशासनातील वापर / सकारात्मक अवलंब –

↳ प्रशासना अंतर्गत अधिकाऱ्यांद्वारे प्राणीमात्रांच्या दैन्यि दयनीय अवस्थेबाबत सदर दयाभाव दाखवणे

↳ अभयारण्य अंतर्गत वनसंरक्षक अधिकाऱ्यांद्वारे पाणवठ्यांची उपलब्धता करून देणे

उदा हरित मार्ग (Green corridor)

↳ प्रशासकीय अधिकाऱ्यांद्वारे कार्यालयात येणाऱ्या वृद्धांप्रती दर्शविलेले ममत्व

उदा – IPS किरण बेदी - तीहार तुरूंग मानवतावादी सुधारणा

26)

# प्रेम (Love) -

↳ प्रेम म्हणजे असे नैतिक मूल्य ज्यांअंतर्गत इतरांसाठी काळजी, इतरांचे भले व्हावे ही सद्भावना, इतरां इतरांच्या चारित्र्याचा सन्मान व्हावा, आदर व्हावा हे अपेक्षित आहे '




* प्रश्न

| स्वातंत्र्यानंतर + संविधान | हरितक्रांती | 1991 LPG | Post Covid Internet AI |
|---|---|---|---|

"जिथे प्रेम आहे, तिथे जीवन आहे" — गांधीजी

उदा – मदर तेरेसा - गरिब शोषित, वंचित यांच्यासाठीचे कार्य
- सिंधु ताई सपकाळ.
- बाबा आमटे

27)
# तिरस्कार / द्वेष - (hatred)

↳ द्वेष म्हणजे नकाराची तीव्र भावना जी एखादा व्यक्ती किंवा एखाद्या समूहाप्रती तिरस्कार निर्माण करते. ज्याच्या परिणामी पुर्वग्रह, अन्यायता आणि अनैतिकता निर्माण होते.

# तिरस्काराचे सकारात्मक पैलू

1) सांप्रदायिक भेदाप्रती असणार तिरस्कार
2) जाती व्यवस्थेच्या विरुद्धात असणारा तिरस्कार
3) अन्याया विरुद्धात —॥—
4) दहशतवादा विरुद्ध असणारा तिरस्कार
(white कॉलर दहशतवाद – दिल्ली बॉम्बस्फोट, 2025)

(जेव्हा तिरस्कार स्वतःच्या कृत्यांबद्दल निर्माण होतो त्यावेळेस तो पश्चातापा मध्ये परिवर्तित होतो)

"अंधाराचा नाश अंधाराने होऊ शकत नाही त्याला प्रकाशाची आवश्यकता असते. तिरस्काराचा नाश तिरस्काराने होऊ शकत नाही त्याला प्रेमाची गरज आहे" — मार्टिन लूथर किंग

28)
# conscience विवेक

↳ सद्सद विवेक हा व्यक्तीचा असा आतला आवाज आहे जो बाह्य नियमांच्या पलीकडे योग्य आणि अयोग्य यांमध्ये निवड करण्याची संधी उपलब्ध करतो

" या कोर्टपेक्षा न्यायाचे सर्वोच्च कोर्ट आहे ते म्हणजे विवेकाचे कोर्ट " — महात्मा गांधी

# प्रशासकीय उपयोजनामध्ये अधिकाऱ्यांद्वारे राजकीय अनैतिक निर्देशांचे पालन टाळणे

29) # क्षमाशिलता (Forgiveness) - उदा - नेल्सेन मंडेला यांनी तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांच्या विरुद्ध झालेल्या नकारात्मक वर्तणुकीला राष्ट्रहितासाठी क्षमा केल्याचे आढळते

↳ क्षमाशिलता म्हणजे असे नैतिक कार्य ज्या अंतर्गत व्यक्ती स्वतः विरोधात एखादी चुक जरी झाली असेल तरी समोरच्या व्यक्तीप्रती नाराजी न बाळगता शांतीपूर्ण संबंध प्रस्थापित करतो

" दुर्बल व्यक्ती क्षमा करु शकत नाही कारण क्षमा करणे हा बलवानांचा गुण आहे " — महात्मा गांधी.

" क्षमाशिलता ही प्रासंगिक किंवा दुर्मिळ भावना नव्हे तर व्यक्तीचा कायम स्वरूपी असणारी वृत्ती / अभियोग्यता आहे " - मार्टिन लुथर किंग

उदा -1) वरिष्ठांनी प्रशासकीय स्तरावर कनिष्ठ कर्मचाऱ्यांकडून झालेल्या प्रामाणिक चुकीला माफ करणे

2) A.P.J. अब्दुल कलाम यांनी एका कनिष्ठ सहकाऱ्यामुळे वैज्ञानिक प्रकल्प अपयशी ठरल्यानंतर हे अपयश तुझे नव्हे तर संपूर्ण समुहाचे आहे असे संबोधले होते.

30) # Gratitude - कृतज्ञता - केलेल्या उपकारांची जाण ठेवणारा

कृतघ्न - केलेल्या उपकारांची जाण न ठेवणारा

↳ उदा - 1) विजयी संघाच्या कर्णधाराद्वारे इतर संघातील खेळाडूंच्या योगदानाबाबत कृतज्ञता ठेवणे किंवा आभार व्यक्त करणे

2) लाल बहादूर शास्त्री यांद्वारे " जय जवान, जय किसान " हे कृतज्ञपर वाक्य.

PRAYAAS

31) # Self Dicipline - स्वयं - शिस्त

↳ स्वयं शिस्त म्हणजे व्यक्तीची अशी क्षमता ज्याद्वारे तो स्वतःच्या चेतना, भावना आणि वर्तनावर नैतिक आणि व्यावसायिक ध्येय प्राप्तीसाठी नियंत्रण साध्य करू शकतो.

" जो व्यक्ती स्वतःवर विजय प्राप्त करतो तो सर्वात शक्तीशाली योद्धा आहे " — कनफुशीअस

32) # Punctuality - वक्तशीरपणा -

↳ वक्तशीरपणा म्हणजे व्यक्तीची अशी सवय ज्यामध्ये वेळेचे भान आहे आणि मुदतपुर्व कार्य करण्याची क्षमता आहे. जे व्यावसायिक नितीशास्त्रामध्ये इतरांच्या वेळेचा & नियमांचा आदर राखते

" एक मिनिट उशिरा येण्यापेक्षा 3 तास ब आधी आलेले केव्हाही चांगले
— सेक्सपेअर

33) # Perseverance - सातत्य (consistency) / diligence - चिकाटी

↳ सातत्य (चिकाटी) म्हणजे असे नियमित प्रयत्न किंवा कष्ट जे ध्येयाला पुरक आहेत आणि असंख्य अडथळ्यांवर मात करून केले जात आहे.

उदा - IAS अरूणा सुंदरा राजन - डिजिटल इंडिया अभियान या अंतर्गत सातत्यपूर्ण प्रयत्न केल्याचे आढळते.

34) # शांतता (Peace) -

↳ शांतता म्हणजे अशी अवस्था ज्याद्वारे सुसंवाद, हिंसाचार विरहीतता किंवा असे अहिंसा यांचा समतोल प्रशासनामध्ये न्याय & नितिमत्ता रूजवतो

उदा विश्वशांती साठी संयुक्त राष्ट्र संघटना विविध उपक्रमांचे आयोजन करते.

SDG - 17 }
MDG - 8 } जागतिक शांतता आणि सहकार्य

2) कलम (51) - जागतिक शांतता - (DPSP)

3) कलम 51(A) - मूलभूत कर्तव्य

4) अलिप्तवादी चळवळ शीत युद्धाच्या काळामध्ये जागतिक ध्रुवीकरणा दरम्यान जागतिक शांततेला प्रस्थापित करेल

5) अणु करार - Non Polyfrision treaty - अणु ऊर्जेचा वापर शांततापूर्ण पद्धतीने विकासासाठी केला जाईल

Q.] "Forgiveness is not an occasional Act. It is a permanent attitude" Martin Luther King.

# सर्वसाधारण मुल्यांचे मानवी जीवनातील महत्व :

1) व्यक्तीच्या चारित्र्याला अर्थ आणि सक्षमता मुल्यांद्वारे प्राप्त होते

2) तुमच्या निर्णयामध्ये मुल्यांचे आणि विश्वासाचे प्रतिबिंबित्व दिसून येते

3) शाश्वत विकास आणि सामाजिक न्याय साध्य करण्यामध्ये मुल्यांचे महत्व हे आंतरपिढीय स्वरूपाचे आहे.

4) जीवनाची दशा किंवा दिशा ठरवण्यामध्ये मुल्यांची भुमिका महत्त्वपूर्ण आहे.

5) मुल्य ही वैयक्तिक आणि सार्वजनिक नितिमत्ता यांना जोडणारे दुवा आहेत. –

↳ व्यक्तीच्या आंतरमनातील दृढ मुल्य खाजगी आणि सार्वजनिक आयुष्यातील सातत्य आबाधीत राखतात.

6) मुल्यांच्या प्रभावामुळे व्यक्तीच्या अंतर्गत भ्रष्टाचार विरोधी तीव्र नकारात्मक अभिवृत्ती (Attitude) निर्माण होते.

7) मुल्यांच्या परिणामी मानवी प्रतिष्ठेचे आणि मुलभूत अधिकारांचे संरक्षण आणि जतन होते. यामुळेच व्यवस्था दबावातही नक्कीक वर्तन दर्शविते.

PRAYAAS

8) मुल्य हे प्रक्रियात्मक कार्यक्षमता आणि सामाजिक न्याय यांच्यामध्ये समतोल साधून कल्याणकारी योजना आणि संसाधनांचे न्यायिक वितरण घडवून आणतात

★ समकालीन /प्रासंगिक महत्व - • मुलभूत मानवी मुल्यांच्या परिणामी प्रशासनाच्या अंतर्गत संबंधामध्ये सुधारणा साध्य होते

9) अशी मुल्ये प्रशासना अंतर्गत अल्गोरिदमचे नैतिक परिक्षण करून कल्याणकारी ध्येय, धोरणे आणि डिजिटल पाळत/देखरेख नितीपुर्ण करतात.

10) तसेच मुल्य समकालीन प्रशासनाला AI आधारीत योजनांचा अंदाज बांधण्यास व निवडण्यास मदत करतात. (चाळणी प्रक्रिया पार पाडण्यास मदत करतात)

11) मुल्य विरहीत प्रशासन AI व्यवस्थेला पुर्वग्रह दुषितमतांनी प्रभावित करू शकते.

12) मुल्य प्रशासकीय अधिकाऱ्यांना सर्वभागधारकांना ओळखण्याची संधी देतात. ज्या अंतर्गत निशब्द & अदृश्य समुह सुद्धा येतात

13) नवोन्मेष /नवकल्पृती - 14) पदाची गरिमा राखला येते

निशब्द & अदृश्य. (Slient or Invisible groups)

↳ सर्वसाधारण वंचितांना लागू आहे.

# मुल्यांपुढे निर्माण होणारे अडथळे किंवा समस्या -

1) मूल्यांमध्ये असणारी सांस्कृतिक आणि सामाजिक वैविधता मुल्यांच्या अर्थामध्ये व्यक्ती सापेक्षता निर्माण करते.

2) सामाजिक नितिमत्ता - समाजातील काही घटक किंवा गट काही मुल्यांचा अर्थ खुपच आक्रमक स्वरूपात घेतात.

उदा - खाप पंचायत - संस्कृतीचा अर्थ - पुरुषप्रधानतावादी

3) सामाजिक आदर्शांकडून मुल्यांची अवहेलना.

4) उदा - धर्म गुरूकडून लैंगिक अत्याचार

4) अंतर्निहीत / छुपे हेतू - अनेकदा काही सामाजिक घटकांसाठी संघर्ष करणाऱ्या संघटना छुपे हेतू किंवा अनैतिक मुल्यांची उपासना करतात

उदा - स्वयंसेवा संस्थांचे (NGO's) झालेले व्यावसायिकीकरण

5) - बायकॉट संस्कृती
(बहिष्कार)

↳ बायकॉट संस्कृती ही विचारांच्या आधारावरील सहिष्णुता आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील बंधन दर्शविते.

6) सातत्याने होणाऱ्या बदल्यांच्या परिणामी अधिकाऱ्यांना नैतिक मुल्यांचा अंतर्भाव करणे अथवा मुल्यांच्या आधारावर प्रदर्शन करणे कठीण जाते

उदा - अशोक खेमका

7) राजकीय नेत्यांच्या अवैध गरजा पूर्ण करण्यासाठी दबाव तंत्र निर्माण होते.

8) मुल्य रूजवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध नसणे - सदर व्यवस्थेची गरज म्हणजेच स्वतंत्र नागरी सेवा बोर्ड स्थापन करण्याची आवश्यकता सुप्रीम कोर्टने सुद्धा अधोरेखित केली आहे.

9) गुन्ह्यांनुसार आणि बदलणाऱ्या स्थितीनुसार सापेक्ष कायद्यांची अनुपस्थिती

10) काही पदांना संविधानिक संरक्षण नसल्याने समस्या निर्माण होतात.

11) नैतिक साक्षरतेचा अभाव प्रशासनाला नागरीककेंद्री करण्यात असक्षम ठरतो

12) प्रशासनापर्यंत नागरीकांची मते पोहचवण्यात येणारे अडथळे.

3) राजकारणाचे गुन्हेगारीकरण

4) अधिकाऱ्यांद्वारे संसाधनांचा उपयोग खाजगी कार्यासाठी केला जातो.

5) जी. पी. सिन्हा नुसार —

↳ 1) पद आणि जबाबदारीचे गांभीर्य नाही
2) आरामशीर कार्यपद्धती
3) कार्यालयीन वेळा न पाळणे
4) औदासिन्य आणि अकार्यक्षमता

**) नैतिक मुल्यांचा अंतर्भाव करण्यामध्ये कुटुंब आणि शिक्षण संस्थांची भुमिका -

## A) कुटुंबाची भुमिका

1) सामाजिकीकरणाच्या प्राथमिक स्त्रोत - हिंदु धर्मातील गर्भ संस्कार कौटुंबिक संस्काराची प्राथमिक पायरी आहे.

2) सांस्कृतिक आणि नितीमत्तात्मक परंपरेचे वहन
↳ कथा, पुराणे, धर्म, रीतीरिवाज

3) भावनिक बुद्धीमता आणि करुणा रुजवण्यामध्ये कुटुंब सहकारी महत्त्वपूर्ण भुमिका बजावतात

4) कुटुंब नैतिक द्वंद्वांच्या प्राथमिक टप्प्यांवर दृढ मुल्यांचा अंतर्भाव करतात जसे की
उदा - परिक्षेत कॉपी करु नये, नेहमी खरे बोलावे, वडिलधार्‍यांचा मान ठेवावा

## B) समाजाची भुमिका -




1) सामुहीक नैतिक मानकांचे दृढीकरण -
↳ नियमावली देते.

2) समाज हा समवयस्क गटांच्या माध्यमातून सामाजिक साखळी निर्माण करतो. - सहकार्याची भावना

3) समाजमाध्यमांची भुमिका:
↳ समाज माध्यमे सामाजिक संपर्क अधिक व्यापक करुन मुल्य रुजवतात जसे साहित्यांचे स्त्रोत, चित्रपट, सामुहीक वादविवाद, बातम्या

4) समुहाद्वारे स्वीकार्यता - या अंतर्गत समुह व्यक्तीला पारितोषिक अथवा शिक्षा देवून मुल्य रूजवतो.

5) समुदाय आधारित नैतिक शिक्षण -

↳ जसे की सामुहीक खेळ, सांस्कृतीक उत्सव, समुह आधारित उपक्रम (स्वच्छ भारत अभियान).

c] शिक्षण संस्थांची भुमिका -




1) शिक्षण व्यवस्था संरचित स्वरूपामध्ये मुल्य शिक्षण प्रधान करते.

2) शिक्षण व्यवस्था विद्यार्थ्यांमध्ये टिकात्मक परिक्षण करण्याची, मुल्यांकन करण्याची आणि नैतिक निवाडा करण्याची क्षमता विकसित करते.

उदा - राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार
- वादविवाद स्पर्धा

3) शिक्षकांचा प्रभाव -

↳ वक्तशिरपणा, सद्सद् विवेक, व्यावसायिकता यांसारखी अनेक मुल्य

4) शालेय संस्था सामाजिक जबाबदाऱ्यांचे भान निर्माण करतात.

उदा NCC, NSS (राष्ट्रीय सेवा योजना)

# मुल्यांचे गतिमान स्वरूप-

1) मुल्य काळानुसार आणि संदर्भानुसार विकसित होतात.

2) सामाजिक, आर्थिक & राजकीय बदलांद्वारे प्रभावित होतात.
↳ औद्योगिकीकरण, खाजगीकरण, शहरीकरण, लोकशाही.

3) सांस्कृतिक संवाद & जागतिकीकरणाच्या प्रभाव
↳ उदारीकरण

4) तांत्रिक प्रगती आणि मुल्यांना आकार
↳ चॅटजीपीटी

5) कायदेशीर आणि संस्थात्मक उपाय
↳ भारतीय संविधान - न्यायव्यवस्था

6) मुल्य प्रणालीमध्ये पिढ्यां अंतर मधील फरक

7) संकटे आणि प्रतिकुलतेला प्रतिसाद

8) गतिमान परंतु मुख्य मानवी तत्त्वांमध्ये रुजलेली
↳ प्रेम, शांतता, सहकार्य.

# मुल्यांचे संकट (crises of values)

# मुल्य संकट म्हणजे अशी परिस्थिती जिथे मूलभुत नैतिक तत्त्वांच्या ऐवजी इतर दुय्यम घटकांना मनुष्य स्वनियंत्रणाच्या अभावी प्राधान्य देतो आणि मूलभुत मुल्यांमध्ये तडजोड करतो

1) वैयक्तिक स्तरावर :-- i) वैयक्तिक महत्वकांक्षा अनैतिक स्तरावर वाढल्यानंतर

उदा - पेपर फुटी, कॉपी प्रकरण, शासकीय परिक्षेतील भ्रष्टाचार

ii) स्वार्थी वृत्तीचा उदय :-

उदा - 2G स्पेक्ट्रम घोटाळा

iii) आंतरीक नैतिक दिशादर्शक कमकुवत होणे :-

- सभोवतालचे अनैतिक वातावरण - भ्रष्टाचार
- मुलभूत मुल्ये शिक्षणाचा अभाव
- कौटुंबिक दबाव

iv) मानसिक तणाव आणि भावनिक थकवा -

2) सामाजिक स्तरावर -

↳ सामुदायिक एकजुटीचा क्षय होतो

- समाजात स्पर्धात्मकता वाढते, सामाजिक तेढ निर्माण होते किंवा शहरीकरण आणि व्यक्तिवादाच्या
- उपभोगवाद
- अनैतिक घटनांच सामान्यीकिकरण
- भ्रष्टाचार - "चलता है" दृष्टिकोन (situationship. living)
- मूलभूत नात्यामध्ये बदल - विवाह - सामाजिक करार

- वाढती आर्थिक असमानता आणि सामाजिक मूल्यांचा ऱ्हास
- "धर्म हा अफुची गोळी आहे आणि ती सामान्यांपुर्तित"-

- उच्चभ्रु वर्गातील अनैतिक रीतीरिवाजांचा समाजावर नकारात्मक परिणाम

  उदा - उच्चभ्रु समाज हा बंदिस्त कुपण समुह आहे

- अस्मितेच्या राजकारणामुळे सामाजिक विखंडणाचे प्रमाण -
  ↳ जातीय, धार्मिक आणि भाषिय दंगली

3) बौद्धिक स्तरावर - (Intellectual)
- नैतिक तकपेक्षा तांत्रिक कौशल्यावर अधिक लक्ष

  उदा - White कॉलर क्राईम (पांढरपेशीत समाजातील गुन्हे.

- बौद्धिक अप्रामाणिकपणा आणि फेरफार

  उदा - डेटा चोरी, डेटा फेरफार
  - बौद्धिक संपदा अधिकार

-

4) सांस्कृतिक स्तरावर-

- संस्कृती आणि परंपरेचे व्यावसायिकीकरण

  उदा - मंदिर बाह्य व्यावसायिकीकरण आणि मंदिराचे सुवर्णिकरण

- जागतिक प्रभावाखाली स्थानिक नैतिक प्रणालींचा क्षय -
- सांस्कृतिक एकसुरीपणा जागतिकीकरणानंतर स्थानिक मूलभूत मुल्यव्यवस्थेला आघात निर्माण करत आहे.

  उदा - मॅकडोनाल्डायझेशनची जीवनशैली

- सांस्कृतिक राजकारणामुळे अस्मितेचा मुद्दा

5) राजकीय स्तरावर -

- राजकीय नेतृत्वाचा ऱ्हास
  उदा - जनसामान्यातून नेतृत्व निर्मितीचा अभाव - कौटुंबिक आधारित पक्षरचना

- संविधानिक नैतिकतेचा दमन - राजकारणाचे गुन्हेगारीकरण, जातीचे राजकरण

- सार्वजनिक संस्थामधील उत्तरदायित्वाचा अभाव जसे की
  · Crony capitalism
  ↳ पक्षांतरचा मुद्दा -

- सार्वजनिक संस्थांमधील तटस्थतेचा क्षय
  उदा - कार्यकारी संस्था, न्यायसंस्था, वृत्त संस्था, काही स्वायत्त संस्था जस की लोकपाल

6) जागतिक स्तर -

- दहशतवाद आणि मानतावादी मुल्यांचा ऱ्हास
  उदा - दिल्ली व्हाईट कॉलर दहशतवाद, 2025

- अनैतिक जागतिक व्यापार व्यवस्था
  उदा - मानवी तस्करी, स्त्रीयांची तस्करी (Missing women) अवयव तस्करी,

- हवाला नेटवर्क, अंमली पदार्थांची तस्करी, शस्त्रास्त्रांची तस्करी, डार्कवेब

- विकसित & अविकसित राष्ट्रांमधील आर्थिक आणि संसाधनात्मक असमानता:
उदा - लसीचे राजकारण (अमेरीका फर्स्ट), टॅरीफ, कार्बन क्रेडिट,

PRAYAAS

प्रदुषणाची असमानता .

देशांचे होणारे सशस्त्रीकरण & प्रादेशिक वाद

# मानवी मूल्ये, महान सुधारक आणि विचारवंत यांच्या शिकवणी

1) गुरुनानक -

i) एक ओंकार - (Unity of God) - सहिष्णुता (इक ओंकार, ॐकार) contemporary relevance

↳ वैश्विकतावाद आणि सार्वजनिक एकात्मतेला आधार देते.

ii) किरत करो - प्रामाणिक कर्म - यामुळे प्रशासना अंतर्गत सचोटी, सत्यनिष्ठा आणि कार्याची प्रतिष्ठा राखली जाते

iii) वंद छको - sharing (सामायिकीकरण)

↳ लंगर नावाची सामाजिक एकात्मतेची संकल्पना सदर संकल्पनेतून तयार झालेली दिसते.

iv) कर्मकांड जातीव्यवस्था आणि लैंगिक असमानतेचा विरोध

v) नाम जपो - स्वयंम शिस्त, ~~सात्य~~ सातत्य & निष्ठेच प्रतीक आहे

2) महावीर -

i) अनेकांतवाद - ~~बहुता~~ बहुलतावादाचे प्रेरक, सामाजिक सहिष्णुता व एकात्मतेचा प्रेरक

ii) अहिंसा - वैश्विक युद्धजन्म परिस्थितीमध्ये शांतता निर्मिती करण्यासाठी, सांप्रदायिक तेढ सोडविण्यासाठी आणि सामुहिक दंगली रोखण्यासाठी

iii) सत्य -

iv) अपरिग्रह - संचय - अतिरिक्त संचय करू नये
(भ्रष्टाचार विरोधी मुल्य रूजवण्यासाठी, सत्तेचा ह्यास कमी करण्यासाठी)

v) स्वयं नियंत्रण - (स्वयं शिस्त)
↳ वैयक्तिक हित आणि सार्वजनिक हिताच्या संघर्षामध्ये स्वयं नियंत्रणाची गरज

3) चाणक्य -

1) Statemenshipt - राज्यआधारित (Mohist) / राजनयकर्ते -

2) योगाक्षेमा - कल्याणकारी राज्य किंवा जनकल्याणाचा धोरण

3) उत्तरदायित्व, स्वयं शिस्त, राजकीय दुरदृष्टी (धोरणात्मक (धुरीनत्व) दुरदृष्टी)
↳ राज्यनितीशास्त्रा अंतर्गत राजकिय नेतृत्व कसे असावे आणि राज्यांचे संरक्षण धोरण कशी असावेत
(सप्तांग सिद्धांत)

4) बफर स्टेट - संरक्षणात्मक दृष्ट्या महत्वाचे मानले गेले.

5) कौटिल्याचे - अर्थशास्त्र राजकीय व्यवस्थेची नैतिक संहिता प्रदान करते.

6) न्यायिकता

7) परराष्ट्र धोरण

8) साम, दाम, दंड, भेद

9) भ्रष्टाचार विरोधी

---

- चारवॉक संहिता - उपयुक्ततावाद (भौतिकवाद)
- ओशो
- चैतन्य महाप्रभू

PRAYAAS

द्वैत अद्वैत

शिवहोम शिवहोम - शंकराचार्य
आदि

## 4) संत कबीर दास -

i) निर्गुण निराकार -

- ज्याला काही आकार नाही, ज्याला कोणताही गुण नाही असा देव
  उदा - ओशो, सत्यशोधक समाज, ब्राम्हो समाज, दयानंद सरस्वती

ii) कर्मकांड विरोधी धोरण -

▲ शिव अहोम, शिव अहोम

iii) सत्य -

"न धर्मो, न पंथ
न चामों, न वर्णो"

-

## 5) तुलसीदास -

i) धर्म - (Duty - कर्तव्यवादी नितीशास्त्र)

ii) भक्ती (Deotion) - समर्पन - कार्याप्रती, कर्माप्रती

iii) करुणा

iv) मानवता

## 6) रविंद्रनाथ टागोर -

i) राज्यविरहीत समाज स्थापनेकडे कल

ii) मानवतेला राष्ट्रवादापेक्षा सर्वोच्च स्थान दिलेल आहे

iii) अमानतेच्या विरोध / विरुद्ध दाखवलेले

iv) शांतीनिकेतन - शिक्षण

v) विश्वभारती - वसुधैय कुटुंबकम, vi) सांस्कृतिक बहुलतावाद

vii) कवी, लेखक, विणकाम करणारे, चित्रकार, नक्षीकाम

viii) विचारांचे स्वातंत्र्य - सद्सद् विवेक, दुरदृष्टी, लोकशाही, सहिष्णुता.

7) राजाराम मोहन रॉय -

i) एकेश्वरवाद

ii) भारतीय बुद्धीप्रमाण्यवादाचे जनक
बुद्धी हे प्रमाण आहे - जे आहे जे दिसतय तेच सत्य

iii) समानतेच तत्व

iv) अमानविय हिंसाचारा विरुद्ध - सती प्रथा बंदी.

v) वृत्ती बदल, मत परिवर्तन - धार्मिक ग्रंथाच्या आधारावर
उदा - सती ही वेदांनी निर्माण केलेली प्रथा नाही
↳ लैंगिक न्याय, समानता

vi) साक्षरता & वृत्तपत्रांद्वारे ज्ञानाचा प्रसार केला

vii) पाश्चिमात्य शिक्षण
- पाश्चात्य मानवतावादी विचारांचा अंतर्भाव आढळतो

8) स्वामी विवेकानंद -

i) जनसेवा हे हिच ईश्वर सेवा. - रामकृष्ण मिशन

ii) विवेकवादाच्या स्वरूपामध्ये वास्तव आणि परमार्थ यांमधील
दुवा निर्माण करण्याचे काम करतात

iii) चारित्र्य निर्मिती -

iv) युवा शक्ती - स्वयं शिस्त, राष्ट्रवाद, नेतृत्व क्षमता, धैर्य, ज्ञातत्व

v) वैश्विकता & भारतीय संस्कृतीच जागतिक सादरीकरण

vi) सौम्य & शांततापूर्ण

PRAYAAS

9) श्री अरविंदो - (अरविंद घोष)

↳ The Devine life — Book

i) राष्ट्रभक्ती जगण्याचा मार्ग म्हणून स्विकारला.

ii) आध्यात्मिक राष्ट्रवाद ही संकल्पना मांडली.

iii) सार्वत्रिक विकास

iv) आत्मिक परिवर्तन - नैतिक प्रगल्भता प्रदान करते

v) नागरिक कर्तव्य - मुलभूत कर्तव्यावर प्रभाव.

10) महात्मा गांधी -

i) अहिंसा

ii) सत्य

iii) धर्म

iv) विश्वस्त व्यवस्था

v) सर्वोदय

vi) अंत्योदय

vii) सविनय कायदेभंग

viii) असहकार

ix) बहिष्कार

x) शांतिपूर्ण प्रतिकार

11) सर्वपल्ली राधाकृष्णन -

i) नैतिक ~~प्रक्रिय~~ कार्यकारणवाद याअंतर्गत व्यवस्थेतील करूणा & निर्णय प्रक्रियेतील तार्किकता यांचा समावेश होतो.

ii) शिक्षणातील गुणवत्ता - गुणवत्तापूर्ण शिक्षण जे नवपिढीमध्ये तार्किक मुल्यांचा अंतर्भाव करेल आणि त्याव्यतरीक मुल्य शिक्षणाचा शिक्षण व्यवस्थेमध्ये समावेश करण्याची सुचना राधाकृष्णन देतात.

iii) आध्यात्मिक मानवतावाद - व्यक्तीची मानवी प्रतिष्ठा जपण्यासाठी & सामाजिक सौहार्दता निर्माण करण्यासाठी.

iv) नववेदांतवादी - वेदांचे आधुनिक स्वरूपामध्ये & उदारमतवादी स्वरूपामध्ये अंतर्भाव करण्यावर आणि उपयोजन करण्यावर भर दिला जातो.

v) चर्चा & सहिष्णुता यांवर अधिक भर देतात - समुहाअंतर्गत सामुहिक हित संबंधाची निर्मिती & नियोजन प्रक्रियेमध्ये जन सहभाग

12) डॉ. बाबासाहेब आंबेडकर -

i) स्वातंत्र्य, समता, बंधुता
ii) शिका, संघटित व्हा, संघर्ष करा
iii) मानवी प्रतिष्ठा आणि जातीय निर्मूलन - मुखनायक, जनता, बहिष्कृत भारत यातून मानवी हक्कांना & कामगारांच्या हक्कांना न्याय मिळवून दिला. — स्वतंत्र्य मजूर पक्ष
iv) स्त्री हक्क - हिंदू कोड बिल
v) संविधानिक नैतिकता
vi) सकारात्मक भेद - समानांसाठी समान & असमानांसाठी असमान - ॲरिस्टोटल
vii) न्यायिकता

13) मौलाना अबुल कलाम आझाद - सौदी अरेबिया

- वर्धा शिक्षण समिती (गांधीजी) - यामध्ये यांचा सहभाग

3H चे धोरण - Hand, Head, Heart (मानवी मुल्य)

i) सहिष्णुता
ii) शिक्षण
iii) धर्मनिरपेक्षता - सर्व धर्म समभाव
iv) सामुहीक संतुलन

- अल हिलाल - वृत्तपत्र
(तार्किकता आधारित)

14) दीन दयाल उपाध्याय -

i) एकात्मिक मानवतावाद - भौतिक & नैतिक गरजांमधील समतोल तसेच स्थितीनुरूप प्रशासकिय यंत्रणेचे संवेदनशील विकेंद्रीकरण
ii) अंत्योदय - शेवटच्या व्यक्तीपर्यंतही कल्याणकारी योजना पोहचवणे

मानवी प्रतिष्ठा आधारीत कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे

iii) नैतिक विश्वस्त व्यवस्था निर्माण करणे.

iv) अध्यात्मिक राष्ट्रवाद - राष्ट्रभक्ती ही मानवी श्रद्धेशी संबंधीत बाब आहे जी राष्ट्रीय एकात्मतेला वृद्धींगत करते.

15) राम मनोहर लोहिया -

i) सामाजिक एकात्मता आणि एकता

ii) अभिजनवर्ग विरहीत धोरण - Anti VIP system

iii) विकेंद्रीकरण - आर्थिक & राजकीय स्वरूपातील विकेंद्रीकरण & परिणामी स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास

↳ आर्थिक लोकशाहीकडे जास्त कल.

iv) लैंगिक न्याय / समानता - मानवता & करूणा साध्य होते.

16) दलाई लामा - (तिबेटीयन ~~धर्म~~ बौद्ध धर्मातील पदवी)

i) वैश्विक शांततेचे आव्हान

ii) करूणा

iii) अहिंसा

iv) वैश्विक परस्परांव - ज्याद्वारे वैश्विक शास्त्रीय यंत्रणा & संस्था यातील सहकार्यातून जागतिक नैतिक उत्तरदायित्व साध्य होते.

उदा - पर्यावरण & स्थलांतरीत यांचे मुद्दे

v) जागरूकता / सजकता (Mindfullness)

↳ मानसिक अवस्था

↳ इतरांच्या आणि स्वतःच्या भावनिक व्यवस्थांमध्ये

vi) Mental Hygiene - मानसिक स्वच्छता - ध्यानधारणा आणि नैतिक चिंतन यांच्या स्वरूपामध्ये.

vii) प्रतित्या समुतपदा - परस्परांवलंबीत्व

viii) भावनिक परिसंस्था (Emotional ecology)

↳ द्वेष सामाजिक प्रदुषक आहे तर करूणा सामाजिक एकात्मिकरणाचे साधन आहे.

PRAYAAS

17) मदर तेरेसा -

i) निस्वार्थपणे सेवा प्रदान करण्यावर भर दिलेला आढळतो. समाजातील दुर्बल घटकांकडे मातृत्वाच्या भावनेतून पाहिलेले आढळते.

ii) सार्वजनिक आरोग्य & मानवी प्रतिष्ठा यांना प्राधान्य दिलेले आढळले

iii) आश्रमव्यवस्था

iv) Find your own culcutta - तुमच्या स्वतःच्या कोलकत्ता शोधा.
↳ तुम्हाला जर जनसामान्यांसाठी कार्य करायच आहे तर जिथे आहे तिथून सुरूवात करा

18) अमर्त्य सेन - vi) न्याय - कायद्याचा परिणाम किती न्यायिक आहे.

i) कार्यक्षमता दृष्टिकोन - कौशल्यपूर्ण शिक्षण

↳ कोणत्याही शिक्षण व्यवस्थेने केवळ पुस्तकी ज्ञान देण्याऐवजी व्यक्तीच्या कार्यक्षमतामध्ये सि वृद्धी घडवणारे शिक्षण प्रदान करणे आवश्यक आहे.

ii) व्यक्ति स्वातंत्र्य हा मुलभूत मानवी विकासाचा टप्पा आहे.

iii) सार्वजनिक तर्कशिलतेवर भर दिला. - व्य. & स. विचार करायला भाग पाडतो.

iv) सामाजिक निवड स्वातंत्र्यावर भर दिलेला दिसतो.

v) निती - तुमचा कायदा किती न्यायपूर्ण आहे.

19) A. P. J. अब्दुल कलाम -

i) वैज्ञानिक दृष्टिकोन - देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून विज्ञानाचा अवलंब करणे.

ii) शिक्षण - गुणवत्तापूर्ण शिक्षण, तार्किकता, कौशल्य

iii) सत्यनिष्ठा

वैज्ञानिक ज्ञानाचा आर्थिक लोभासाठी वापर न करण्याची क्षमता

iv) क्षमाशिलता - सहकार्याबाबतची

v) चारित्र्य - व्यक्तिच्या कर्तृत्वापेक्षाही व्यक्तीच्या चारित्र्याला त्याअन्वये

देशाच्या चारित्र्यासाठी आणि देशाप्रती कार्य करण्यासाठी क्षमता.

vi) चिकाटी आणि सातत्य - अग्नीपंख
(वैयक्तिक आयुष्यातील संघर्षगाथा)

vii) मिसाईल मॅन - नवोन्मेष, क्रियाशिलता, नवकल्पना
↳ इस्रो आणि पोखरण मधील कार्य

viii) दुरदृष्टी - भारत 2020 - भारताला महासत्ता करण्याचे स्वप्न
↳ राष्ट्रभक्ती.

ix) Indomitable - अदम्य - प्रचंड अडथळ्यानंतरही यश प्राप्त करण्याची उमेद.

20) नेल्सन मंडेला -

i) वर्णभेद - अपारथेड व्यवस्था
↳ यांनी वर्णभेदाच्या विरोधात अहिंसापुरक स्वातंत्र्यलढा उभा केलेला आढळतो.

ii) क्षमाशिलता

iii) बंधुत्व - वर्ण, भेद, जात या सर्वांपलीकडे वैश्विक बंधुत्वाची अपेक्षा केली जाते.

iv) मानवी अधिकार.
↳ संविधाना अंतर्गत मानव अधिकारांना सर्वोच्च स्थान दिल्याचे आढळते

v) मानवी प्रतिष्ठा आणि मानवी सन्मान यांना मूलभूत वैश्विक मुल्यांच्या स्वरूपात विस्तारित केले ज्याच्या परिणामी नेल्सन मंडेला यांना शांततेचे नोबेल पारितोषिक भेटले आहे.

vi) उबंटू - तुम्ही सर्व आहात म्हणून मी आहे.

vii) Rainbow Nation- सर्व • धर्म, जाती, लिंग यांच्यामध्ये समानता आणि परस्पर

21) कन्फ्युशिऑनिसम /कन्फ्युसिअस /कनफ्युशिअस

i) ली -Proper Conduct - योग्य क्रिया → कर्तव्यवादी नितीशास्त्र

ii) Filial Pity - सामाजिक जबाबदाऱ्या & आंतरपिढीय कल्याण

iii) सामुहीक सौहार्दता - संस्था अंतर्गत विश्वासार्हता विकसित करणे, समुहाअंतर्गत सामुहीक विकासासाठी नैतिक नेतृत्वाला दिशा प्रदान करणे.

iv) Ren (रेन) - परोपकाराची भावना ठेवणे.

22) Fukuzawa Yukichi -

i) आधुनिक नितीशास्त्राचे पुरस्कर्ते आहेत.

ii) पुरावा आधारित /प्रत्यक्ष आधारित प्रशासनावर भर

iii) शिक्षण आधारित विकासाला प्रोत्साहन दिले.

iv) स्वायत्तापूर्ण • नागरीकांची लोकशाहीतील स्थितप्रज्ञ भुमिकेला अधोरेखित केलेले आहे.

23) मार्टिन ल्युथर किंग Jr. -

i) वर्णव्यवस्था - अमेरिकेतील वर्णव्यवस्थेच्या विरोधात उभी राहिलेली चळवळ व तीचे नेतृत्व मार्टिन लुथर किंग यांनी केलेले आहे

ii) शांततापूर्ण & अहिंसेच्या स्वरूपात केलेला प्रतिकार आढळतो

iii) मानवी हक्कांसाठी संघर्ष केलेला आहे. यादरम्यान त्यांच I have Dream हे भाषण प्रचंड गाजले आहे जे मानवतावादी चळवळीच्या इतिहासातील (सुवर्ण) महत्वपूर्ण मानले जाते.

iv) कायद्याद्वारे न्यायनिर्मितीवर भर

v) प्रतिसादात्मक तक्रार निवारण यंत्रणेवर भर दिलेला आहे

24) ॲरिस्टोटल.

i)




ii) ~~स्वर्णमध्य~~ मध्यम मार्ग हाच उत्तम मार्ग आहे.
↳ प्रशासना अंतर्गत दोन तीव्र टोकांच्या भूमिकेच्या दरम्यान समतोल साधताना जो निर्णयाचा सुवर्णमध्य काढला जातो. त्याच दरम्यान सदर संकल्पनेचे उपयोजन करता येईल

iii) व्यवहारवादी दृष्टिकोन.

iv) ध्येय / हेतू (Telos) - प्रशासकीय कार्यामधील हेतूंची स्पष्टता & त्यानुरूप कार्य करण्याची क्षमता यावर हा घटक अवलंबून आहे.

25) इमॅन्युअल कांट -
↳ कर्तव्यवादी नितीशास्त्र (categorical imperative)
↳ याअंतर्गत साध्यापेक्षा ~~साध~~ नैतिक साधनाला अधिक महत्व असल.
व्यक्तीच्या कार्य करण्यामागे केवळ एकच हेतू असणे अपेक्षित आहे ते म्हणजे कर्तव्याचा हेतू

ii) प्रशासना अंतर्गत सदर नितीशास्त्राचा अवलंब केल्याने नियम आधारित कार्य, भ्रष्टाचार विरहीत प्रशासन & कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्यांची निर्मिती होवू शकते.

iii) सदर नितीशास्त्र वैश्विक मानकांचा स्विकार करते. जे जागतिक स्तरावरील शिष्टाचारास व मानवतावादास प्रेरित करते.

26) प्लेटो -

i) आदर्शवादी नितीशास्त्र

↳ प्रशासना अंतर्गत उच्च प्रशासकीय मानकांची अंमलबजावणी करण्यावर सदर नितीशास्त्राचा

ii) "Philosopher King" - तत्वज्ञ राजा

↳ प्रशासकीय यंत्रणे अंतर्गत सर्वोच्च पदावर असणाऱ्या अधिकाऱ्यांचे वर्तन हे एका तत्ववेत्याप्रमाणे असली पाहिजेत त्यासोबतच प्रशासनामध्ये ज्ञानाचा अवलंब करून नवोन्मेष निर्माण करण्याचे कार्य केले गेले पाहिजे. शासन व्यवस्था ही सर्वोच्च नैतिक पात्रतांची अपेक्षा करते ज्याद्वारे प्रशासन न्यायिक ठरते.

~~iii) समतावादी न्याय~~

iii) राज्यकर्त्यांसाठी सुद्धा शिक्षणाची तजवीज असायला हवी

v) शिक्षा ही परिवर्तनवादी असावे

iv)




↳ प्लेटो नुसार व्यक्तीच्या अंगी तीन गुण असतात तृष्णा, धैर्य, विवेक - प्रशासन कर्त्यांनी यातील धैर्य & विवेक या दोन मूलभूत मुल्यांचा अंतर्भाव अधिकाधिक करून समकालीन प्रशासकीय समस्यांचा निवाडा करावा.

27) सॉक्रेट्स /सॉक्रेटिस -

i) अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा स्विकार करून व्यवस्थेला उत्तरदायी करण्यावर & व्यक्तिमध्ये व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचे धाडस निर्माण करण्यावर सॉक्रेट्सचा भर होता.

i) नैतिक स्वयं परिक्षण यांचा अवलंब प्रशासनामध्ये अन्यायकारक अज्ञांची अंमलबजावणी करण्यावर अटकाव निर्माण करते.

iii) प्रशासनातील पारदर्शकता & त्यासाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्तिचे संरक्षण यांचा पुरस्कार समकालीन व्हिसलब्लोअर व्यवस्थेत आढळतो

iv) सॉक्रेटसनुसार ज्ञान हाच व्यक्तितील सर्वोच्च सद्‌गुण आहे

28) जॉन लॉक -

↳ नैसर्गिक न्यायाची / अधिकारांची संकल्पना

↳ जीवन जगण्याचा, स्वातंत्र्याचा & संपत्तीचा अधिकार यांचा समावेश होतो

↳ यांच्याच मुल्यांचा अंतर्भाव पुढे संविधानात्मक लोकशाहीच्या अंतर्गत कायद्यांचे राज्य मध्ये आढळतो.

ii) सामाजिक कराराचा सिद्धांत - लोककेंद्रीत

↳ ज्याच्या अनुषंगाने प्रशासनातील पारदर्शकता, उत्तरदायित्व प्रतिसादात्मकता लोकांचे प्रतिनिधित्व यांबाबत प्रशासनाने लोककेंद्री असणे ० अपरिहार्य मानले गेले आहे

↳ ज्याअर्थी शासन हे लोकांनी दिलेल्या अधिकारातून निर्माण झालेले आहे त्याअर्थी ते सामाजिक सत्तेचे मूर्त स्वरूप आहे.

iii) Limited Gov. (मर्यादित प्रशासन) - जे राज्यकर्त्यांच्या अनियंत्रित सत्तेला अटकाव घालते

iv) उदारमतवादाचा पुरस्कार प्रशासनाला तार्किकता, विज्ञाननिष्ठा & भेदभाव विरहीतता प्रदान करेल

29) जे. एस. मिल

i) उपयुक्ततावाद -

↳ मिल च्या उपयुक्ततावाद प्रशासना अंतर्गत धोरण निर्मिती दरम्यान अधिकतम लोकांच्या उच्च प्रतीच्या सुखांचा अट्टहास धरतो

व्यक्तिवादावर आणि सहिष्णुतावादावर भर असल्याने बहुलतावादी योजनांसोबत अल्पसंख्यांकांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करतो.

↳ मिल प्रशासना अंतर्गत कल्याणाचे बृहतीकरण (वाढ) सोबत नागरी स्वातंत्र्यालाही केंद्रस्थानी ठेवते. यासोबतच प्रशासनातील वस्तुनिष्ठता न्याय आणि उत्पाद यांचा आराखडा सकारात्मक करण्यावर भर देतो

30) मायकेल सँडल -

i) प्रशासना अंतर्गत नैतिक तर्कवादाच्या अवलंब ज्याद्वारे तांत्रिक तटस्थता निर्माण होऊन न्याय सद्गुण आणि सामाजिक कल्याण यांवर खुली चर्चा शक्य होते.

ii) प्रशासना अंतर्गत सहभागात्मक धोरण निर्मितीवर भर दिलेला आहे तसेच लोकांच्या सहभागासाठी जनचर्चा सत्र, जनमंत्र किंवा न्याय सभांचा स्विकार करण्याची सुचना पारदर्शकता प्रदान करते.

iii) जनसहभाग हा धोरण निर्मितीला नामनिर्देशित करणारा अपेक्षित आहे.

31) स्वामी दयानंद सरस्वती -

i) वैदिक तार्किकता - वेदांचा अन्वयार्थ तत्कालीन परिस्थितीनुरूप आणि ज्ञानानुरूप निर्माण करणे

ii) सत्य

iii) सामाजिक सुधारणा - जाती व्यवस्थात्मक भेद निर्मूलन, अस्पृश्यता निर्मूलन, स्त्रीयांना शिक्षणाचा अधिकार, सती प्रथा बंदी, आंतर जातीय विवाह

iv) एकेश्वर वादाचा पुरस्कार केला, मानवतावाद

v) कृण्वन्तु विश्वम आर्यम् - संपूर्ण जग हे सद्गुणा आधारित निर्माण करणे किंवा उदात्त स्वरूपाच्या विश्वाची निर्मिती करणे — मानवतेला सर्वोच्च स्थान द्यायचे.

vi) वैश्विक मानवी नैतिकता हे मानवतेचा विकास करण्याना आहे.

vii) सर्वोपकार - सर्वांचे कल्याण करणे.

32) थिरुवल्लुर -

i) अरम - सद्गुण किंवा धर्म - कर्तव्य सर्वात महत्त्वाचे

ii) oli / ओली - सद्बुद्धी किंवा अंतःप्रकाश

iii) ओप्पुरवु - परोपकार

iv) उल्लम - अंतःकरणाची पवित्रता

33) चार्वाक -

↳ लोकायत तत्वज्ञान / दर्शन /

↳ चार्वाक दर्शनिक

i) प्रत्यक्ष - फक्त डोळ्यांनी दिसते आणि अनुभवता येते तेच सत्य आहे - वस्तुनिष्ठता

ii) लोकायत - फक्त या जगातील जीवनावर भर दिला आहे
(This worldly)

~~सेयम् येव पुरुषार्थ~~

iii) देहम् एव पुरुषार्थ - देहच पुरुषार्थाचा आधार आहे

iv) प्रकृतीवाद - कोणत्याही अनैसर्गिक तत्वातून विश्वाचा उदय झालेला नाही

34) कोहलबर्ग - यांचे नितीमत्तेच्या विकासातील टप्पे -

1) परंपरापुर्व टप्पा / नितीमत्ता -

a) आज्ञापालन व शिक्षा टाळण्यासाठी नितीमत्ता निर्माण होते

b) व्यक्तिगत फायदा व देवाणघेवाण प्रवृत्तीचा विकास
↳ या अंतर्गत निर्माण होणारी नैतिकता या प्रश्नाभोवती असते.

ii) परंपरागत नितीमता -

a) चांगला मुलगा किंवा चांगली मुलगी म्हणून वागण्याचा प्रयत्न सदर वर्तणुक इतरांना आनंदीत करण्यासाठी असते.

b) कायदा व शिस्त पाळण्याची प्रवृत्ती दाखवते.

iii) परंपरेच्या पलिकडे जाऊन निर्माण होणारी नितीमता / उत्तरपरंपरागत नैतिकता

a) सामाजिक करार व व्यक्तिगत हक्कांतून निर्माण होणारी नितीमता ज्यामध्ये कायदे महत्वाचे असतातच परंतु लोकांच्या हितासाठी कायदे बदलले जातात.

b) सार्वत्रिक नैतिक तत्वे - ३ या अंतर्गत व्यक्ती आणि सामाजिक नियमांच्या पलिकडे जाऊन विवेकाला सर्वोच्च स्थान प्रदान करते.

# भाग – 2

## # अभिवृत्ती

↳ अभिवृत्ती ही एक मानसिक प्रवृत्ती आहे जी एखाद्या व्यक्तीचे वस्तू, घटना किंवा परिस्थितीबद्दलचे सातत्यपूर्ण मूल्यमापन करून सकारात्मक किंवा नकारात्मक प्रतिसाद दर्शविते

## # अभिवृत्तीचे प्रकार

- अभिवृत्तीची एकमेतीय आकृती

सकारात्म अभिवृत्ती — तटस्थता — नकारात्मक अभिवृत्ती

1 (प्रेम, आनंद) — 5 — 10

स्पष्ट भुमिका → ५ (दहशतवाद, हिंसाचार, रेप)

### 1) सकारात्मक अभिवृत्ती

↳ सकारात्मक अभिवृत्ती असलेला व्यक्ती परिस्थिती, लोक आणि घटनांकडे आशावादी आणि आत्मविश्वासाच्या स्वरूपात पाहतो यांतर्गत व्यक्ती बदलणाऱ्या आव्हानांसाठी किंवा परिस्थितीसाठी जुळवून घेण्याचा प्रयत्न करतो.

उदा - नवअधिकारी कार्यालयीन ठिकाणी अत्यंत महत्त्वकांक्षी आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करतो.

### 2) नकारात्मक अभिवृत्ती

नकारात्मक अभिवृत्तीमध्ये लोक किंवा परिस्थितीबद्दल निराशावादी व टिकात्मक दृष्टिकोन विकसित होतो.

उदा - एखाद्या नायकाचे चित्रपट न आवडल्यामुळे भविष्यातील चित्रपटांबाबत नकारात्मक अभिवृत्ती निर्माण होते.

↳ असे व्यक्ती अनेकदा शुल्लक गोष्टींवरून तक्रार करतात किंवा बदलणाऱ्या परिस्थितीचा तीव्र विरोध करतात.

3) तटस्थता / तटस्थ अभिवृत्ती -

↳ काही परिस्थितीबाबत किंवा घटकांबाबत व्यक्ती तीव्र सकारात्मक किंवा नकारात्मक भावना दर्शवित नाही यासाठी अनेक कारणे असू शकतात जसे की सदर घटकाबाबत ज्ञानाचा अभाव असणे, घटकाच्या पूर्ण व्याप्तीबद्दल अनभिज्ञता असणे किंवा निश्चित निदानाची उपलब्धता नसणे

उदा - ज्या नागरीकाला परराष्ट्र धोरणाविषयी स्पष्ट मत उपलब्ध नाही, तो तटस्थेची भुमिका घेऊ शकतो

# अभिवृत्तीचे घटक -

~~1) भावनिक घटक~~ ↳ (component or content of attitude)

1) भावनिक घटक (Affective component)

↳ अभिवृत्तीचा हा भाग एखादी वस्तू, व्यक्ती किंवा मुद्द्याबद्दल व्यक्तीला असलेल्या भावना किंवा भावनांचा संदर्भ देतो या भावना सकारात्मक जसे की प्रेम, आनंद किंवा नकारात्मक जसे की भिती, राग अशा स्वरूपात असू शकतात

2) संज्ञानात्मक घटक - (cognitive component) -

↳ या भागात व्यक्तीचे वस्तू किंवा विशिष्ट मुद्द्याबाबत तार्किक, ज्ञानात्मक आणि वैचारिक दृष्टिने सखोल ज्ञान निर्माण झालेले असते आणि यांच्या परिणामी व्यक्तीचा निर्णय हा पूर्वग्रह डावलून तसेच धार्मिक रूढी, परंपरा यांपलिकडे जाऊन अत्यंत वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असतो

उदा - ग्रीन टी च्या फायद्यांचे ज्ञान असल्यामुळे तिच्याबाबत निर्माण होणारा सकारात्मक दृष्टिकोन.

↳ याअंतर्गत अपेक्षा मुल्य प्रतिमान काम करते यालाच (Acceptence value model)

3) वर्तणात्मक घटक (Behaviorial component) - अनुभव

↳ या अंतर्गत व्यक्तीने भुतकाळातील अनुभवांचे संकलन करून ऐखाद्या घटक किंवा मुल्याप्रती सकारात्मक किंवा नकारात्मक अभिवृत्तीची धारणा निर्माण केलेली असते याचा थेट परिणाम भविष्यातील कृतीवर झाल्याचे दिसते

↳ या अंतर्गत लोक त्यांच्या स्वतःच्या कृतीचे निरीक्षण करून अभिवृत्ती विकसित करतात. बऱ्याचदा इतरांच्या अनुभवाचा समावेश देखील याअंतर्गत केला जाऊ शकतो

उदा (पुढच्यास ठेस, मागचा शहाणा)

- काही राजकीय पक्ष हे जाणीवपूर्व खोटे बोलतात. सत्तेवर आल्यानंतर आश्वासनांना पूर्ण करत नाहीत
- अफगाणिस्तानच्या तालिबानाबाबत जागतिक पटलावर निर्माण झालेली प्रतिमा

# अभिवृत्ती अन्तर्गत द्विधा अवस्था - (Attitudinal Ambivalence) (संभ्रमित)




↳ जेव्हा तीव्र सकारात्मक आणि तिव्र नकारात्मक असे दोन्ही मुल्यमापन एकत्र अस्तित्वात असतात तेव्हा द्विधा अवस्था निर्माण होते.

↳ द्विधा मनस्थितीच्या अभिवृत्ती अनेकदा अस्थिर असतात व परिस्थिती किंवा संदर्भाने त्यावर खुप प्रभाव पडतो

# Functions of attitude - अभिवृत्तीचे कार्य

1) ज्ञानार्जनात्मक कार्य (Knowledgebased Function)

↳ अभिवृत्ती माहितीचे आयोजन करून किंवा तिला सोप्या स्वरूपात मांडून व्यक्तीला अर्थ उलघडण्यास मदत करते.

↳ या अंतर्गत मानसिक शॉर्टकट निर्माण होतात, जे लोकांना प्रत्येक वेळी जास्त विचार न करता परिस्थिती, वस्तू किंवा लोकांचे त्वरीत मुल्यांकन करण्याचे परवानगी देते.

उदा - सरकारी नोकरी सिंड्रोम

2) उपयुक्ततावादी कार्य -

↳ अभिवृत्ती लोकांना जास्तीत जास्त फायदा मिळवण्यात आणि शिक्षा कमी करण्यास मदत करते.

उदा - लहान मुल्यांना अभ्यास करण्यासाठी पारितोषिकाचे ~~प्रश्न~~ प्रलोभन निर्माण केले जाते.

3) अहमवादी बचावात्मक कार्य / आत्मसन्मान संरक्षणात्मक कार्य -

↳ अभिवृत्ती व्यक्तीच्या आत्मसन्मानाचे संरक्षण करून स्वतःची कृती किंवा अपयश यांना योग्य ठरवून अपराधीपणा टाळण्यास मदत करते.

उदा - विद्यार्थ्याचा अभ्यास कमी पडला हे मान्य करण्याऐवजी पेपर अभ्यास क्रमाबाहेरील होता असा आरोप करणे

4) सामाजिक परिस्थितीशी संमिलीत करण्याचे कार्य (जुळवून)

↳ सदर अभिवृत्ती व्यक्तींना सामाजिक ~~घटक~~ गटांमध्ये जुळवून घेण्यास आणि आदरपुर्वक संबंध प्रस्थापित करण्यास सहाय्य करते.

उदा - अधिकाऱ्यांची नक्षलप्रवण क्षेत्रामधील नियुक्ती

~~# वृत्ती निर्मितीमधील घटक -~~

# अभिवृत्ती निर्मितीमागील घटक - (Behind the formation of attitude)

1) सामाजिक नियम आणि समवयस्कांचा दबाव-
उदा - आंतरजातीय विवाहांबाबतचे मत निर्मिती.

2) कायदेशीर आणि संस्थात्मक बंधने -
↳ व्यक्तीची अभिवृत्ती विचारात न घेता वर्तणांना प्रतिबंध आणि सक्ती निर्माण केली जाऊ शकते.

3) शिक्षेचे किंवा पारितोषिकांचे प्रलोभन -
↳ विशिष्टपणे शासकिय अधिकारी वरीष्ठांच्या आदेशाला दुजोरा देतो यामध्ये बदलीची भिती समाविष्ठ असू शकते.

4) संसाधनांची आणि संधीची उपलब्धता -
↳ उदा - पर्यावरणीय संवर्धनाबाबतीचा दृष्टिकोन (पाणी अडवा पाणी जीरवा)

5) परिस्थितीजन्य घटक किंवा आपतकालीन परिस्थिती -
↳ या अंतर्गत तत्कालीक परिस्थितीचा प्रभाव व्यक्तीच्या अभिवृत्तीवर परिणाम करू शकतो
उदा - जातीय दंगलींमुळे विशिष्ट जातीधर्मा बाबत निर्माण झालेली अभिवृत्ती
- धार्मिक दंगली

6) कौटुंबिक मुल्यांचा अभिवृत्तीच्या निर्मितीवरील प्रभाव -
↳ जसे की लहान मुलांच्या मनात चोरीबाबत नकारात्मक अभिवृत्ती केली जाते (16 संस्कार)

PRAYAAS

7) शैक्षणिक घटकांचा प्रभाव -

↳ या अंतर्गत तुमच्या संज्ञानात्मक मुल्यांमध्ये वाढ होते. जसे की सहिष्णुतेचे मुल्य रूजवले जाते.

8) समकालीन समाजमाध्यमांची वृत्ती निर्मितीतील भुमिका

उदा - दहशतवाद, पर्यावरणवाद, स्त्री संरक्षण अशा घटकांना संवेदनशीलपणे पाहिले जाते

9) आर्थिक घटकांचा प्रभाव -

↳ विवाह व्यवस्थेअंतर्गत आर्थिक देवाण घेवाणांच्या आधारावर निर्णय प्रक्रिया अवलंबून असते.

# अभिवृत्ती मध्ये परिवर्तन घडवण्याची साधणे-

#) सामाजिक प्रभाव - तात्पुरते

↳ सामाजिक प्रभाव ही एक प्रक्रिया आहे ज्याद्वारे एखाद्या व्यक्तिची वृत्ती, विश्वास किंवा वर्तण इतरांच्या उपस्थितीमुळे किंवा कृतीमुळे आकार घेते अथवा ते सामाजिक दबावामुळे. निरिक्षणामुळे सुधारीत होत असते.

#) सामाजिक प्रभावाचे प्रकार

1) अनुपालन -

↳ स्पष्ट दबाव नसतानाही गटाचे नियम किंवा अपेक्षांशी जुळवून घेण्यासाठी एखाद्याचे वर्तन किंवा विचारांचे समायोजन

उदा - औपचारिक प्रसंगी प्रोटोकॉल नुसार पेहराव परिधान करणे.

2) स्वीकृती - complines

↳ थेट विनंतीला प्रतिसाद म्हणून वर्तनात बदल घडवणे या अंतर्गत अनेकदा वैयक्तिक सहमतीशिवाय व्यक्ती कृती करतो

उदा - 1) नागरीकांना वाहतूक पोलिस आवाहन करतात किंवा विनंती करतात तेव्हा नियमांचे पालन होते.

2) ग्रामीण स्तरावर श्रमदानाची विनंती केल्यानंतर नागरिक सकारात्मक प्रतिसाद देतात.

3) आज्ञापालन - obidence

↳ वैयक्तिक मतांचा विचार न करता वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून किंवा व्यवस्थेकडून मिळालेल्या स्पष्ट सुचनेचे किंवा कायद्याचे पालन ~~करण~~ करणे.

उदा - ड्रोनचे रेड झोन मध्ये उडाण न करणे.
- लॉकडाऊन मधील ताळेबंदी - नियमांचे पालन
- बसमध्ये ज्वलनशील पदार्थांचा व प्रवासादरम्यान वापर न करणे

4) अल्पसंख्यांकाचा प्रभाव -

↳ जेव्हा एक लहान गट किंवा व्यक्ती चिकाटी आणि विश्वासाने बहुसंख्याक लोकांना त्यांचे मतांचा पुनर्विचार करण्यास प्रवृत्त करते

उदा - मेधा पाटकर यांचे ~~व~~ नर्मदा बचाओ आंदोलन
- गांधीजींचे उपोषण पद्धत

5) आदर्श सामाजिक प्रभाव -

↳ विशिष्ट गटामध्ये एखादी गोष्ट आवडली किंवा स्विकारली जाणार नाही व गटातून बहिष्कृत होण्याची वेळ येईल या भावनेच्या परिणामी अनुरूप वर्तन केले जाते.

उदा - विद्यार्थी कॅम्पसमध्ये सहकार्यांच्या दबावामुळे राजकीय निदर्शनात सामील होणे

६) माहितीपूर्ण सामाजिक प्रभाव-
↳ विशेषता अनिश्चित परिस्थितीमध्ये अंतर्गत इतरांकडून मिळालेल्या माहितीचा किंवा खात्रीपूर्वक स्त्रोतांच्या माहितीचा उपयोग अभिवृत्ती निर्मितीमध्ये केला जाऊ शकतो.

उदा - कोविड काळातील WHO & डॉक्टरांद्वारे झालेली जनजागृती

~~७) मतपरिर्वत - Persuasion~~

७) मतपरिर्वतन - Persuasion - दिर्घकालीन परिणाम

↳ मतपरिर्वतन म्हणजे व्यक्तीच्या श्रद्धा, दृष्टिकोन आणि वर्तनावर तर्क, भावनिक अवाहान आणि विश्वासार्हता यांद्वारे सक्तीशिवाय हेतू पुरक दीर्घकालीन प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे.

# मतपरिवर्तनाचे मुख्य घटक-

१) स्त्रोत -
↳ कोणता व्यक्ती मतपरिवर्तन करत आहे व त्या व्यक्तीबाबतची असणारी विश्वासार्हता, कौशल्य मतपरिवर्तनावर परिणाम टाकते।

उदा - द्रोणाचार्य - युद्धीष्ठीत आणि ~~अ~~ अर्धसत्य

२) माहिती -
↳ कोणत्या स्वरूपातील माहिती दिली जात आहे

उदा - श्री कृष्णा द्वारे अर्जुनाला प्रधान केलेले ज्ञान

३) माध्यम -
↳ कोणत्या स्वरूपाचे संप्रेषण माध्यम वापरले जात आहे यावरून परिणाम निश्चित होतात

उदा - समाज माध्यम, # & Boycot culture

4) प्रेक्षक -
↳ प्रेक्षकांची पार्श्वभूमी जागृकतेची पातळी मतपरिर्वनावर प्रभाव टाकते

# मतपरिर्वतना अंतर्गत येणारे घटक - (प्रकार)
1) तर्कसंगत अवाहन
2) भावनिक अवाहन - बेटी बचाओ, बेटी पढाओ .
3) नैतिक अवाहान - कर्म करा फळाची अपेक्षा नका करू .
4) ~~सामाजिक~~ - समवयस्क प्रभाव .

# प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या जीवनातील असे प्रसंग जिथे सकारात्मक अभिवृत्ती निश्चित योगदान प्रदान करते .

1) पुर परिस्थिती / आपत्ती स्थिती -
↳ या अंतर्गत अधिकारी प्रत्यक्ष पुरग्रस्त ठिकाणी जाऊन नागरीकांना सुविधा उपलब्ध होतात की नाही याची शहानिशा करतो -

2) एखाद्या आंदोलनाच्या किंवा निषेधाच्या सामना करताना थेट लाठीचार किंवा हिंसक दमनाचा अवलंब न करता निषेध ~~काय~~ कर्त्यांशी संवाद साधुन शांततापूर्ण तोडगा काढण्याचा प्रयत्न करणे

3) दुर्गम अधिवासी भागात बदली झाल्यावर स्थानिकांशी आदरपुर्वक संवाद साधून वेळप्रसंगी स्थानिक भाषा आणि संस्कृती शिकण्याचा प्रयत्न करतो .

4) बेकायदेशीर कार्यासाठी राजकीय दबाव आला तरी देखील बदलीच्या धमक्यांना न जुमानता सकारात्मकरित्या कार्य करत राहतो .

PRAYAAS

5) प्रशासकीय यंत्रणेतील कनिष्ठ कर्मचारी चुकल्यास त्याचा अवमान करण्याऐवजी सुधारणेची संधी उपलब्ध करून देतो.

6) घरगुती हिंसाचाराच्या प्रकरणात अधिकारी संवेदनशीलतेने समुपदेशन करतो आणि पिडीतेला सुरक्षित वातावरणाची व्यवस्था निर्माण करून देतो

7) प्रशासकीय विभागांमधील मतभेद दूर करण्यासाठी संयुक्त बैठक घेऊन समन्वय घडवतो.

8) मध्यान भोजन योजनेचा पाठपुरवठा करताना प्रशासकीय अधिकारी भोजनाच्या दर्जाची खात्री करतो

# सामाजिक

# सकारात्मक वृत्ती विकसित करण्यासाठी समुदाय व व्यक्तिमध्ये वापरता येणाऱ्या अनोख्या पद्धती.

1) संज्ञानात्मक पुनर्रचनेची कार्यशाळा.

→ व्यक्तीच्या विचारांमध्ये एखादा प्रसंग किंवा घटकाला समस्या न मानता आव्हान स्वरूपात पाहण्याचा दृष्टिकोन निर्माण करणे.

2) तक्रार पद्धतीऐवजी उपाय केंद्रीत संवाद निर्माण करणे

3) कार्यालयातील कृतज्ञता फेरी सहकार्यांच्या उल्लेखनिय कामगिरीला सामुहीक स्वरूपात अधोरेखित करणे

4) समुदाया अंतर्गत गोष्टी (कथा), संवाद व प्रेरणा वर्तुळ निर्माण करणे.

5) आदर्श अधिकाऱ्यांचे शॅडोईंग/रोलमोडेलिंग निर्माण करणे.

6) मनशांती व किंवा भावनिक नियंत्रण व्यवस्थांचा अवलंब करणे जसे की श्वसनाचे व्यायाम करणे, लहान ध्यान सत्रे करणे यामुळे संतुलित वृत्ती निर्माण होते.

7) सन्मानपुर्वक प्रतिपुष्ठी - (Feedback with a degnity)

8) समुदाय स्वयम् सेवा दिवस -

↳ उदा - स्वच्छता मोहिम, रक्तदान. अशा कृती मधून सांमुदायिक जबाबदारी व सकारात्मक नागरिकत्व निर्माण करणे

9) लहान विजय गौरवान्वीत करणे - मोठ्या उद्दीष्ट्यांना छोट्या साध्य टप्यांमध्ये विभागणी आणि प्रत्येक छोटा टप्पा साध्य करणे.

10) कर्तणात्मक प्रोत्साहन देणे -

उदा - आदर्श गाव, आदर्श शिक्षक

11) व्हिजिनिंग एक्ससायझ - भविष्यामध्ये आपला समुह कशा स्वरूपामध्ये असू शकतो याचा आराखडा बांधणे.

उदा - उत्कृष्ट कार्यस्थळे किंवा आदर्श किंवा मॉडेल गावाच अनुभव - हिरवे बाजार, राळेगणसिद्धी, मेंडालेखा

12) डिजिटल डिटॉक्स कालखंड = म्हणजे आठवड्यातून किंवा दिवसातून मोबाईलमुक्त राहणे.

* कार्ल मार्क्स

• या अंतर्गत कामगार एकत्र येवून सत्ता चालवतील व संपत्तीचे वाटप करतील → क्रिया चालू आहे

(समाजवाद) — (साम्यवाद) ← कोणतेही राज्य/सत्ता नसेल, कामेरे नसतील, समान संपत्ती असेल - क्रिया पूर्ण झालेले

या विचारधारेचा होता - समानता, मानवी हक्क, मानवी महत्वाकांक्षेची पुर्ती करणे.

- Maoist - चीन ते सत्ता ही त्यांच्या हातात पाहिजे त्यानंतर आम्ही विकास करू.

Q.) Attitude is an important component that goal as Input the development of human have to build a suitable need Attitude for public servant.

↳ Intro - i) व्याख्या, प्रश्नातील keyword घेऊन, यामध्ये आधिक word घेतात.

Heading - प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये अपेक्षित वृत्ती निर्माण करण्याचा मार्ग/

| शासन | सुशासन | नैतिक शासन |
| --- | --- | --- |
| राजकीय व्यवस्थेद्वारे चालवली जाणारी कोणती-ही व्यवस्था शासन या गटात येते. | सुशासन ही व्यवस्था आधुनिक लोकशाहीचा प्रभाव आहे ज्याद्वारे नागरीक केंद्रीत प्रशासन अधिक पारदर्शक, उत्तरदायी आणि नागरि-कांच्या मागण्या पुरक ठरणार असते. | ज्या वेळी नितीशास्त्राच्या मुल्यांचा उपयोग करून एखादी प्रशासकीय यंत्रणा कार्य करते त्यावेळी तिच्या अंतर्गत उच्च मानवी मुल्यांचा अंतर्भाव आढळतो ज्याला आपण नैतिक शासन संबोधतो |



# अभियोग्यता (Aptitude)

१) अभियोग्यता म्हणजे योग्य प्रशिक्षण आणि वातावरण मिळाल्यास एखादया व्यक्तीची विशिष्ट कौशल्य आत्मसात करण्याची किंवा नैसर्गिक साध्यत्यता म्हणजे अभियोग्यता होय.

## अभियोग्यतेचे प्रमुख वैशिष्ट्ये:

१) अभियोग्यता ही जन्मजात किंवा अंतरभुत स्वरूपाची असते तरी देखील शिक्षण आणि अनुभवाद्वारे विकसित किंवा वृद्धिंगत केली जाते.

२) क्षेत्रनिहाय यश संपादन करण्याची क्षमता असते याची भूमिका निर्मितीमध्ये यश संपादन करण्या मध्ये निश्चित प्रभाव असतो

नैसर्गिक क्षमता → (प्रशिक्षण / अनुभव) → अभियोग्यता

## अभिवृत्ती आणि अभियोग्यता यातील भेद-

| तुलनेचा आधार | अभियोग्यता | अभिवृत्ती |
|---|---|---|
| व्याख्या | अभियोग्यता म्हणजे विशिष्ट कौशल्ये आत्मसाद करण्यासाठी ची नैसर्गिक क्षमता किंवा संभाव्यता | अभिवृत्ती म्हणजे व्यक्ती, वस्तू किंवा विशिष्ट परिसंस्था बाबत सकारात्मक किंवा नकारात्मक मानसिकता होय. |
| स्वरूप | जन्मापासून असलेली किंवा आंतरभुत क्षमता जी प्रशिक्षणाने विकसित केली जाऊ शकते | जी तुलनेने सामाजिकीकरण, अनुभव, शिक्षण आणि धार्मिक विश्वासाचे प्रतिबिंब असते. |
| कार्य | विशिष्ट व्यक्ती एखाद्याने क्षेत्रात कुठपर्यंत प्रावीण्य प्राप्त करू शकतो यांची माहिती अभियोग्यतेतून होते. | विशिष्ट व्यक्ती किंवा समूह एखाद्या परिस्थितीला कशा प्रकारे प्रतिसाद देऊ शकतो याचे पुर्वमान अभिवृत्तीतून साध्य करता येते. |

| | | |
|---|---|---|
| स्थिरता | अभियोग्यता तुलनेने अधिक स्थिर असते परंतु काळानुरूप ती वृद्धीगंत होऊ शकते. | अभिवृती ही तुलनेने खुपच लवचिक व अनुभव & ज्ञान यांच्या प्रभावातून परिवर्तित होते. |
| केंद्रीत क्षेत्र | कार्यप्रदर्शन किंवा यश संपादन | अभिमुखता आणि मानसिकता. |

# अभियोग्यतेची बौद्धीक गुणांक सोबत तुलना-

| बौद्धीक गुणांक (IQ) | अभियोग्यता |
|---|---|
| बौद्धिक गुणांक म्हणजे सर्वसाधारण व्यक्तीची सर्वसाधारण बौद्धिक किंवा वैचारिक क्षमता जी सामान्यकृत परिक्षणाद्वारे तपासता येऊ शकते. | अभियोग्यता म्हणजे विशिष्ट कौशल्य आत्मसाद करण्याची नैसर्गिक क्षमता किंवा संभाव्यता. |
| तुलनेने बौद्धिक गुणांक हा व्यक्तीची मुल्यांकन करण्याची क्षमता, तार्किकता आणि समस्या निराकरण करण्याची क्षमता आहे. | अभियोग्यता ही विशिष्ट क्षेत्रात यश संपादन करण्याची क्षमता आहे. |
| बौद्धिक हा सर्वसाधारण स्वरूपाचा आहे. | अभियोग्यता ही विशिष्टकृत आहे |
| बौद्धिक गुणांक मात्र व्यक्तीची प्रदानात्मक क्षमता आहे | अभियोग्यता विशिष्ट क्षेत्राशी निगडीत क्षमतांचे किंवा कौशल्याचे अनुमान आहे. |

| | |
|---|---|
| बौद्धयांक मात्र अत्यंत स्थिर अल्प स्वरूपात बदल दर्शवणारा आणि विकसनशीलता स्थिर असणारा घटक आहे | तुलनेने अभियोग्यता प्रशिक्षणाद्वारे अथवा अनुभवाद्वारे वृद्धिंगत केली जाऊ शकते. |

# अभियोग्यतेचे प्रकार

1) भाषिक अभियोग्यता -

↳ भाषेच्या माध्यमातून प्रभावीपणे इतरांचे मत जाणून घेणे तसेच संवाद आणि धोरण निर्माण करणे.

उदा - आपत्ती व्यवस्थापना दरम्यान इतर प्रशासकीय यंत्रणे सोबत संवाद साधण्याची अधिकाऱ्यांची क्षमता.

2) संख्यात्मक अभियोग्यता -

↳ आकडेवारी हाताळण्याचे माहितीचे विश्लेषण करण्याचे अर्थसंकल्प आणि लेखापरिक्षण यामध्ये तार्किकता दर्शविण्याचे व्यक्तीचे कौशल्य

उदा - IRS अधिकाऱ्यांद्वारे करचोरी तात्काळ ओळखणे

3) प्रशासकीय अभियोग्यता -

↳ निर्णय घेणे, नियोजन करणे, नेतृत्व आणि गतीमान शासन प्रदान करणे ही प्रशासकीय अधिकाऱ्याचे अभियोग्यतेचे वैशिष्ट्ये आहे.

उदा - जिल्हा अधिकाऱ्यांद्वारे कोविड काळातील लसीकरण धोरणाची अंमलबजावणी

PRAYAAS

4) सामाजिक अभियोग्यता -

↳ आंतर वैयक्तिक संवेदनशीलता आणि समानुभूती आणि सार्वजनिक विश्वास निर्माण करण्याची क्षमता तसेच प्रभावी समुदाय यासाठी प्रयत्नशील राहणे.

उदा - अतुल कुलकर्णी यांचे भरोसा सेल.

5) नैतिक अभियोग्यता -

↳ नैतिक आचार संहिता किंवा नैतिक आचरण नियम यांचा प्रशासकीय निर्णयामध्ये अंतरभाव करणे

उदा - तुकाराम मुंडे.

# नागरी सेवा मध्ये अभियोग्यता का आवश्यक आहे ? -

1) गुंतागुंतीच्या परिस्थितीत कार्यक्षम निर्णय घेणे.

2) नेतृत्व आणि कार्य संघटन किंवा व्यवस्थापन साध्य करता येते.

3) अधिकाऱ्यांद्वारे कार्य पद्धतीमध्ये लोकसेवाभिमुखता आणण्यासाठी

4) दबाव आणि नैतिक कोंडी हाताळण्याची क्षमता येण्यासाठी

5) प्रभावी धोरणांची निर्मिती आणि अंमलबजावणी करण्यासाठी

6) आपत्ती व्यवस्थापन आणि पूर्वानुमान निर्माण करण्यासाठी

7) नागरीकांचा विश्वास संपादन करण्यासाठी

8) विविध भूमिकामध्ये जुळवून घेण्याची क्षमता विकसित करण्यासाठी.

# भावनिक बुद्धिमत्ता (Emotional Intelligence)

#→ डग्लस हॉफस्टार्ड - बुद्धिमत्ता

- 1) परिस्थितीला अत्यंत लवचिक स्वरूपात प्रतिसाद देण्याची क्षमता
2) योग्य वेळी योग्य ठिकाणी योग्य गोष्टीतून लाभ प्राप्त करण्याची क्षमता
3) अत्यंत संदिग्ध संदेशातून योग्य अर्थ प्राप्त करण्याची क्षमता
4) भिन्न घटकांमध्ये किंवा भिन्न परिस्थितीमध्ये साम्य शोधण्याची क्षमता किंवा समान स्थितीमध्ये, घटकांमध्ये भिन्नता अधोरेखित करण्याची क्षमता
5) जुन्या किंवा कालबाह्य घटकांमधूनही नवोन्मेषाद्वारे नवीन घटकांची निर्मिती करणे
6) बुद्धीमान व्यक्ती उदात्त विचार अथवा संकल्पनांना गवसणी घालतो
7) बुद्धिमत्तेच्या अभिजात व्यवस्थे अंतर्गत व्यक्तीचा बुद्ध्यांक तपासला जातो ज्या अंतर्गत व्यक्तीच्या तार्किक क्षमता मुल्यांकनाचे कौशल्य आणि भाषा येत कौशल्य येतेच परंतु त्यासोबतच समस्या निराकरण करण्याची क्षमता ही महत्त्वपूर्ण ठरते.

# समस्या निराकरण करण्याचे तीन टप्पे -

1) समस्येचे वर्णन करणे व ओळखणे
2) समस्या निराकरणाचे उपाय सुचवणे
3) उपायांची अंमलबजावणी करणे.

# भावना

↳ भावना या एखाद्या घटनेला किंवा व्यक्तीला दिलेली सहज किंवा तात्काळ प्रतिक्रिया आहे.




ज्या वेळेस तुमच्या भावनिक घटकांचा तुमच्या बौद्धिक घटकांशी समन्वय साधता येईल त्यालाच भावनिक बुद्धिमत्ता म्हणतात.




# भावनिक बुद्धिमत्ता -

↳ म्हणजे स्वतःच्या आणि इतरांच्या भावना जाणण्याची, समजून घेण्याची, नियंत्रित करण्याची आणि योग्यरित्या व्यक्त करण्याची क्षमता होय.

• डॅनियल गोलमन .

1) स्वयं जागृकता
2) स्वयं नियंत्रण
3) समानानुभूती
4) सामाजिक कौशल्य
5) प्रेरणा - सध्या काढलेला आहे.




# डॅनियल गोलमनची संरचना /प्रतिमान -

1) स्वयं जागरूकता

↳ स्वयं जागरूकता म्हणजे स्वतःच्या भावना, अंतर्गत स्थिती आणि त्यांचा विचार आणि वर्तणावर होणारा परिणाम ओळखण्याची आणि जाणण्याची क्षमता

↳ या अंतर्गत आत्मविश्वास वास्तववादी स्वयं मुल्यांकन येणे अपेक्षित आहे.

2) स्वयं नियंत्रण /नियमन -

↳ स्वयं नियंत्रण म्हणजे विस्कळीत भावना आणि आवेग नियंत्रित करण्याची किंवा वळवण्याची आणि कृती करण्यापुर्वी विचार करण्याची क्षमता सामर्थ्य अपेक्षित असते. सदर घटकांतर्गत व्यक्ती स्वतःमध्ये बदल घडवल्यास अत्यंत मुक्तता/खुलेपणा दर्शवितो

3) समानानुभुती-

↳ म्हणजे इतरांच्या भावना समजून त्याच्या तीव्रतेने समजून घेण्याची स्वतःला इतरांच्या ठिकाणी ठेवण्याची आणि प्रतिसाद देण्याची क्षमता होय.

↳ या अंतर्गत व्यक्ती भिन्न समुदायांबाबत किंवा संस्कृतीबाबत संवेदनशीलता दर्शवतो

4) सामाजिक कौशल्य-

↳ म्हणजे सामाजिक संबंध किंवा संबंधांचे जाळे प्रस्थापित करण्याचे आणि त्यांचे व्यवस्थापन करण्याची क्षमता होय

↳ या अंतर्गत संवाद, मतपरीवर्तन, संघर्ष निराकरण आणि प्रभावी नेतृत्व यांचा समावेश होतो

- स्वयं जागरुकता, स्वयं नियंत्रण, समानानुभुती हे घटक व्यक्तीच्या अंतर्गत घटक आहेत तर सामाजिक कौशल्य हे त्यांचे प्रकटीकरण आहे.

# भावनिक बुद्धिमत्तेचे महत्व-

1) भावनिकदृष्ट्या व्यक्तीला स्थिर निर्णय घेण्यास सक्षम करते.

उदा- जनआंदोलनावेळी प्रशासकीय अधिकाऱ्यांची हाताळणी

2) नैतिक आणि सहानभुतीपुर्वक नेतृत्व निर्माण करण्याची क्षमता

उदा- गांधीजी - दांडी यात्रा

3) परस्पर संवाद आणि वादविवादातून संघर्ष निराकरण करण्यास सहाय्य करते

उदा- दोन भिन्न धार्मिक समुदायाअंतर्गत सहिष्णुता निर्माण करणे

- गट कार्याची कार्यक्षमता सुधारेल आणि कार्यालयीन संस्कृती वृद्धिंगत होईल - उदा - गुगल, इनफोसिसची कार्य संस्कृती

किंवा मायक्रोसॉफ्टचे तणाव व्यवस्थापन केंद्र

4) नागरी केंद्रीत प्रशासनाला पाठबळ प्राप्त होते

↳ या अंतर्गत प्रशासन दुर्गम परिस्थितील नागरीकांशी जनसंवाद साधून सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण करते

5) ताण तणाव व्यवस्थापन आणि निर्णय प्रक्रियेतील लवचिकता साध्य करता येते ज्यामुळे दबावमुक्त आणि थकवाविरहीत कार्य केले जाते

- उदा - रोटेशन वर्क

6) समाजाअंतर्गत अनुकुलता आणि सकारात्मक बदलाला प्रोत्साहन प्राप्त होते जसे की जातीवाद विरहीत समाज

~~7) प्रशासन व्यवस्थेअंतर्गत~~

# प्रशासन व्यवस्थेअंतर्गत भावनिक बुद्धिमत्तेचे महत्व -

1) आपत्ती व्यवस्थापन किंवा संकट समयी कार्य करण्याची क्षमता

↳ योग्य भावनिक बुद्धिमत्ता प्रशासकीय यंत्रणेला आपत्ती प्रसंगी अधिक कार्यक्षमता, सुनियोजित आणि संघर्ष विरहीत कार्य करण्याची क्षमता प्रदान करते.

2) तक्रार निवारण यंत्रणा आणि सार्वजनिक सुसंवाद -

↳ संवेदनशील प्रशासनाने समस्या योग्य प्रकारे जाणून नागरीकांच्या रोषामागील कारण लक्षात घेऊन प्रभावी स्वरूपात प्रतिक्रिया देणे आवश्यक असते

3) संघर्षामध्ये मध्यस्थीची भुमिका घेणे, त्याचे निराकरण करणे आणि सामाजिक सलोख्या प्राप्त करणे

↳ या अंतर्गत प्रशासकीय यंत्रणा दोन भिन्न गटांच्या भावनांची योग्य कल्पना घेऊन, सामाजिक कौशल्यांचा अंतर्भाव करून सामाजिक सुसंवाद साध्य करते.

3) प्रशासकीय यंत्रणे अंतर्गत येणारे मानव संसाधन व्यवस्थापन-

↳ प्रशासकीय अधिकारी योग्य कर्मचाऱ्यांची त्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेच्या स्तरानुसार नियुक्ती करून प्रशासकीय यंत्रणा कार्यक्षम पद्धतीने हाताळू शकतो.

[उदा] - तृतीयपंथ्यांच्या भावनिक आणि बौद्धिक विकासाचा आढावा घेऊन कार्यालयामध्ये त्यांची पदनियुक्ती करणे.

4) धोरणांची अंमलबजावणी करताना समुदायांतर्गत वर्तवणूकीतील बदल घडवून आणणे.

↳ समुदायाला एखाद्या योजनेबाबत सकारात्मक भावना विकसित करण्यास प्रेरित करणे आणि त्याद्वारे योजना यशस्वी करणे

[उदा] - योजनेद्वारे भावनिक आवाहन करणे

↳ बेटी बचाओ, बेटी पढाओ

↳ एक पेड माँ के नाम

↳ लाडकी भावना बहीण योजना

5) माध्यम आणि सार्वजनिक व्यवस्था आणि धारणा यांना हाताळणे

↳ अनेकदा प्रशासकीय अधिकाऱ्यांना विशिष्ट परिस्थितीमध्ये प्रेस किंवा जनसंवादाचा सामना करावा लागतो अशा वेळी भावनिक बुद्धिमत्ता महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

[उदा] - एस. जयशंकर

6) नैतिक दुविधा व्यवस्थापन-

↳ प्रशासकीय अधिकारी अनेकदा नियमांविरुद्धवर्तन करताना किंवा अनैतिक वर्तन करताना स्वयं जागरूकतेचा अवलंब करून अनिष्ठ कृती टाळू शकतो.

# भावनिक बुद्धिमत्तेचे घटक हे शिकता येऊ शकते किंवा हे साध्य करता येतात

1) स्वयं जागरूकता -

↳ संरचनात्मक प्रतिसादाची प्राप्ती (मित्र किंवा कौटुंबिक व्यक्तीकडून)
↳ ऐकून घेण्याची क्षमता वाढवून
↳ स्वयं निरीक्षणातून जागरूकता वाढवणे
↳ भावनेला ओळखणे व तीला नाव देणे - लेबलींग थेरी
↳ मुड जरनल तयार करणे - दैनंदिन भावनांची नोंद
↳ Triger mapping - कोणते घटक भावनांना उत्तेजित (Triger) करणारे मुद्दे

2) स्वयं नियंत्रण -

↳ ध्यानधारणा (Meditation)
↳ भावनिक प्रशिक्षण करणे
↳ खेळ खेळणे
↳ 10 सेकंद थांबणे (नियम)
↳ विचारांचे पुनर्मुल्यांकन करणे यामुळे गैरसमज दूर होतात
↳ 1 सीमारेषा आखणे - विशिष्ट वेळी विशिष्ट भावना अनावर झाल्यास चर्चा स्थगित करणे.

## quate based question साठी Part of Answers

- 1) **Intro** -

1) Method of simplification -

1) साध्या सोप्या शब्दामध्ये quate ला Reframe करून मांडणे

2) quate ला स्पष्ट करत असताना त्याच्या नितीशास्त्र विषयातील Key term सोबतचा सहसंबंध निर्माण करणे

    उदा - Agent of socialization

3) Different philosopher च्या key concept / word सोबत Reframing करणे

4) quate with intro - आपल्याकडे असलेल्या वाक्प्रचार, म्हणी व सुविचार यांना quate नंतर लगेच न वापरता सर्वसाधारण स्पष्टीकरणानंतर मुल्यवर्धनाचा भाग स्वरूपात वापरता येऊ शकते

5) व्यक्ती आधारीत Intro - वेळप्रसंगी जर quate लक्षात आला नाहि त्यानंतर Time up होत आलाय अशा वेळी सदर quate / विचार देणारी व्यक्ती आणि तिच्या विचारावर Intro चालू शकतो. ← सर्वात शेवटचा पर्याय.

6) जर quate बद्दल समान अर्थाचा पर्यायी quate उपलब्ध असेल तर त्याचा वापर करू शकता. अर्थ बदलता कामा नये
↳ warning

7) Elabroted intro + quate - जेव्हा उपलब्ध quate पेक्षा अधिकची माहिती तुमच्याकडे असेल तुम्ही त्याची पुर्वपिठीका आणि/ उत्तरपिठीका निर्माण करू शकत असाल तर ती स्वागतार्ह असेल

2) **Headings**

1) जर उपलब्ध quate स्वतःच स्पष्ट Hedding देत असेल तर त्याचा जैसे थे वापर करता येतो.

2) Heading च्या आधी एक जोड परिच्छेद देऊन देखील विस्तार किंवा इतर quate देता येऊ शकतात

3) सगळे quate हे वैश्विक सत्य नसतात त्याला पर्यायी बाजू असू शकते किंबहुना ती असायला हवी किंवा अधोरेखित करायला हवी पण वैश्विक मुल्यांच्या बाजूने असणारे quate आल्यास पर्यायी

PRAYAAS

बाजू टाळावी त्याऐवजी त्रुटी अधोरेखित करू शकता.

- Heading सुचत नसेल तर quate च्या बाजूने लिहताना
1) " विधानांच्या बाजूने युक्तीवाद " 2) " विधानाच्या विरुद्ध युक्तीवाद " 3) " विधानातील समकालीन त्रुटी "
4) " सदर मुद्द्याची मर्यादा अधोरेखीत करणे " 5) " सदर मुल्यांच्या वृद्धीकरणासाठी आवश्यक सुचना "
6) बऱ्याचदा Heading न वापरता संपूर्ण उत्तर लिहू शकतो. फक्त हे करत असताना Ethics च्या quate ला एक निबंधाचा विषय म्हणून पाहता आला पाहिजेत
7) Intro + स्पष्टीकरण + Diagram आणि नंतर Heading
8) Argument हे ~~नैता~~ नितीशास्त्रातील मुल्यांना किंवा युक्तीवादांना अधोरेखीत करणारे असावेत

• Conclusion -

• 1) short & sweet conclusion

उदा - म्हणूनच मातृदेवो भव आणि पितृदेवो भव

2) quate based conclusion करता येऊ शकत पण त्याची भाषा ही समारोपाची असावी आणि ते Intro किंवा दिलेल्या quate च प्रतिबिंब नसावे. यातून नवीन किंवा अतिरीक्त मुल्याकडे निर्देशन (Direction) करता येऊ शकते

3) आंतरराष्ट्रीय करारांचे उपयोजन आणि त्यातून अतिरीक्त मुल्यांचे अधोरेखीकरण

4) ज्या नितीशास्त्राच्या सिद्धांताना आपण मुख्य quate शी जोडू शकतो त्याचाही वापर conclusion मध्ये करणे